मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०८/१०/२०२६

मा. महासभा सुचना क्र. ०६

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ----------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. १६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर महोदया यांच्या मान्यतेने.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा दि. १६/१०/२०२६, सभा सुचना क्र. ०६

विषयपत्रिका

प्र.क्र.	विषय
--	**प्रश्नोत्तरे -**
--	**मागील सभांचे इतिवृत्तांत -**
७८	दि. २२/०६/२०२६ रोजीचे मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.
--	**सर्व निवडणूका - निरंक**
--	**स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव -**
७९	मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रवासी तिकीट दर फेररचनेस मंजूरी देणेबाबत. (मा. परिवहन समिती सभा दि. ०५/१०/२०२६ रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. ०४, ठराव क्र. ०३)
८०	मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.
८१	मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील महापालिका सचिव (गट-अ) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.
८२	मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर दिलेल्या तदर्थ पदोन्नतीस (Ad hoc Promotion) मान्यता मिळणेबाबत.
८३	मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप मुख्य स्वच्छता अधिकारी या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.
८४	महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त बळीराजाच्या मदतीसाठी "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मध्ये आर्थिक मदत म्हणून अदा करण्यात आलेल्या रक्कम रु. १ कोटी च्या कामास मा. महासभेची कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत तसेच "आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था निधी" या लेखाशिर्षात रक्कम रु. १ कोटी महानगरपालिकेच्या अखर्चिक निधीतून पुनर्विनियोजन करणेकरिता पुनर्विनियोजन प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.
८५	केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत सुरु असलेल्या केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारित वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था कामास मुदतवाढ देणेबाबत.
८६	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनि:सारण केंद्र क्र. २,४,५ व ८ ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
८७	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, पाली, लाईट हाऊस, चवळी, काशी, जनता नगर, शांतीनगर सेक्टर ०७, शांतीनगर सेक्टर ११, काशी, धावगी डोंगर, मिरा (एम.आय.डी.सी.) व घोडबंदर येथील पाणी पुरवठा पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
८८	स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या Construction & Demolition Waste या प्रकल्पास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
८९	स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० मा. अभियानाअंतर्गत घनकचरा व्यवस्थपनअंतर्गत (Bioremediation of legacy Waste) या कामाच्या अतिरीक्त मोजमान १३२००० MT यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
९०	भूमी अभिलेख कार्यालयाकरीता भाड्याने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे.
९१	मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा योजने अंतर्गत साकेत व कापूरबावडी ठाणे तसेच फाटक रोड व मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पंपगृहांचे नुतनीकरण व अद्यावतीकरण करणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी मिळणेबाबत.
९२	भुयारी गटार योजना टप्पा II (भाग-III) कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजुरीबाबत.

९३	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आधुनिक जलमापकांची (वॉटर मिटर्स) रचना, पुरवठा बसवणे व कार्यान्वीत करणे, तसेच जलमापक बिलिंग सॉफ्टवेअरची रचना, पुरवठा, होस्टिंग व कार्यान्वीत करणे आणि SCADA व गळती शोधण्याच्या प्रणालीसह 24X7 पाणी पुरवठा यंत्रणेची रचना व अंमलबजावणी करणे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी मिळणेबाबत.
९४	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एकूण १०७ द.ल.ली. क्षमतेचे अस्तित्वातील मलनि:सारण केंद्राचे नुतनीकरण करणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी मिळणेबाबत.
९५	हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत विविध विकासात्मक व लोककल्याणकारी घेतलेल्या कामांना मंजूरी मिळणेबाबत.
९६	हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत मंजुर निधीमधून आरोग्य केंद्र / रुग्णालयाकरीता आवश्यक साहित्य व उपकरणे खरेदी करणेबाबत.
९७	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या गुजराती माध्यमाच्या ४ शाळा व मनपा शाळा क्र. १ उत्तन मराठी व मनपा शाळा क्र. १२ डोंगरपाली या शाळांचे मनपा शाळा क्र. ११ चौक मराठी येथे स्थलांतर करण्याबाबत.
९८	मिरा भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालय अंतर्गत कार्यालयीन वापरासाठी दिलेली इमारत, वाहतुक विभागास जप्त वाहने ठेवण्यासाठी दिलेली जागा, इतर वास्तु यांचे भाडे वसूली करणे, पोलिस उप आयुक्त कार्यालयासाठी इमारत हस्तांतर करणे, वाहतुक विभागास जप्त वाहने ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.
९९	दिव्यांग कल्याणकारी योजनांचे "दिव्यांग धोरण" निश्चित करणेबाबत.
१००	हिन्दु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालन इमारतीचे दैनंदिन संचालन देखभाल व दुरुस्ती बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.
१०१	Video Conferencing Setup करणेकामी ई-निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.
१०२	सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता औषध फवारणी कामगारांचे वेतन व भत्ते यांस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.
१०३	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलातील धोकादायक / विकास कामातील वृक्ष काढणे / पुर्न:रोपण करणे / झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती करणे.
१०४	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या सहा गावांची प्रारुप सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये शासनास सादर करणेकामी मुतदवाढ मिळणेबाबत.
१०५	मौजे घोडबंदर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळया जवळील ६० मीटर रुंद रस्त्यालगत (६० मीटर व १८ मीटर रुंद रस्ता जंक्शन वेस्टर्न हॉटेल शेजारील वळणावरील) सर्व्हे क्र. १३२/१३ ही खाजगी जागा भुसंपादनाद्वारे ताब्यात घेणेसाठी वाढीव रकमेसह खर्चास सुधारीत मान्यता देणे.
१०६	अग्निशमन विभागासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.
१०७	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतींना भोगवटा दाखल प्राप्त झाला नाही अश्या इमारतींना "अभय योजना" तसेच स्वयंपुर्नविकास योजनेकरीता गृहसंकुलांना सवलती लागू करणेबाबत निर्णय घेणे.
१०८	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मालमत्तांना कर आकारणी झाली नाही अश्या मालमत्तांचे सर्व्हेक्षण करुन कर आकारणी करणेबाबत निर्णय घेणे.
१०९	मिरा भाईंदर शहरातील पशु-पक्षी व प्राण्यांना होणारे आजार तसेच त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांचा विचार करून पशुवैद्यकीय रुग्णालय (हॉस्पिटल) उभारण्याबाबत निर्णय घेणे.
११०	महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ३० अन्वये स्थापन केलेल्या विशेष समित्यांना निधी व अधिकार देण्याबाबत निर्णय घेणे.

महापालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०८ ऑक्टोबर, २०२६

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १६/१०/२०२६ रोजी आयोजित केली आहे.
सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

७. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी मा. सदस्य यांनी दि. ०६/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.
१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे मागील दोन वर्षांत किती समाज भवन बांधण्यात आलेली आहेत ?
i) सदर समाज भवनांसाठी कोणती आरक्षणे राखीव करण्यात आलेली होती ?
ii) सदर समाज भवनांच्या बांधकामाकरिता राज्य शासन व महानगरपालिकेकडून किती निधी खर्च करण्यात आला आहे ?
iii) प्रत्येक समाज भवनासाठी वापरण्यात आलेल्या जागेचे क्षेत्रफळ किती आहे ?
iv) प्रत्येक समाज भवनाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी किती खर्च करण्यात आला व तो कोणत्या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आला?
v) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण किती समाज भवन बांधून नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे ?
vi) सदर समाज भवनांना देण्यात आलेली नावे कोणत्या अधिनियम अथवा नियमांनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत ?
vii) सदर समाज भवनांचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी अंदाजे किती कालावधी लागणार आहे ?
viii) सदर समाज भवन संबंधित समाजांना करार पद्धतीने कधीपर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत ?
ix) ज्या समाजांसाठी समाज भवन बांधण्याचे नियोजन आहे, त्या समाजांची नावे उपलब्ध करून देण्यात यावीत.
x) समाज भवन बांधून देण्याच्या नावाखाली कोणत्याही समाजाची दिशाभूल करण्यात आलेली आहे का ? असल्यास त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.
xi) सदर समाज भवनांच्या बांधकामासाठी कंत्राटदारांची निवड कोणत्या निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात आली ? संबंधित कंत्राटदारांची नावे व करार रक्कम काय आहे ?
xii) समाज भवनांच्या वापरासाठी नियम व अटी (Rules & Regulations) काय आहेत? तसेच नागरिक किंवा संस्थांना ते भाडेतत्त्वावर देण्याची प्रक्रिया काय आहे?
xiii) समाज भवनांमध्ये कोणकोणत्या मूलभूत सुविधा (पाणी, वीज, स्वच्छतागृह, पार्किंग, सुरक्षा इ.) उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत?
xiv) समाज भवन बांधण्यासाठी निवडलेल्या जागा विकास आराखड्यानुसार (Development Plan - DP) आरक्षित आहेत का?
xv) काही समाज भवनांबाबत स्थानिक नागरिक किंवा संस्थांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत का? असल्यास त्यावर काय कारवाई करण्यात आली आहे?
xvi) समाज भवनांचे व्यवस्थापन करण्यासाठी कोणती समिती किंवा संस्था नियुक्त करण्यात येणार आहे का? असल्यास त्याची माहिती देण्यात यावी.
xvii) समाज भवनांच्या बांधकामासाठी केंद्र शासन, राज्य शासन किंवा इतर योजनांमधून निधी प्राप्त झाला आहे का? असल्यास त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी.
xviii) समाज भवनांचा वापर केवळ संबंधित समाजापुरता मर्यादित राहणार आहे का, की इतर नागरिकांनाही नियमांनुसार वापर करण्याची परवानगी देण्यात येणार आहे?
xix) समाज भवनांच्या सुरक्षिततेसाठी अग्निसुरक्षा (Fire Safety), आपत्कालीन निर्गमन (Emergency Exit) व इतर आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत का?
८. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी मा. सदस्य यांनी दि. १०/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.
१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेस कोणकोणत्या धरणातून दररोज किती दशलक्ष लिटर (द.ल.लि.) पाणीपुरवठा केला जातो? त्या प्रत्येक धरणातून मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण किती आहे?
i) शहरातील नागरिकांना पाणी पुरवठा किती तासांच्या अंतराने / किती वेळेसाठी दिला जातो?
ii) मिरा-भाईंदर शहरामध्ये पाणी साठवण करण्यासाठी एकूण किती जलकुंभ (Water Tanks) अस्तित्वात आहेत? तसेच त्या प्रत्येक जलकुंभाची साठवण क्षमता किती आहे?
iii) महानगरपालिकेचा पाणीपुरवठा एकूण किती झोनमध्ये विभागलेला आहे ? त्या सर्व झोनची नावे व क्षेत्रमर्यादा कोणती आहेत?
iv) पाणी पुरवठा विभागात सध्या कार्यरत असलेल्या एकूण मिटर रिडर्सची संख्या किती आहे ?
v) महानगरपालिकेतर्फे नागरिकांना पाण्याचे बिल हे पाणी मीटर रिडींगप्रमाणे आकारले जाते का ? असल्यास त्याची कार्यपद्धती काय आहे ?
vi) प्रत्येक पाणीपुरवठा झोनमध्ये किती पाणीपुरवठा अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत ? झोननिहाय त्यांची संख्या किती आहे ?

vii) सोसायट्या तसेच चाळवस्त्यांमध्ये पाणीपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक ठरविण्यात आलेले आहे का ? असल्यास त्या वेळापत्रकाची सविस्तर यादी सभागृहास सादर करण्यात यावी.
viii) शहरामध्ये पाणी गळती (Leakage) चे प्रमाण किती आहे ?
ix) एकूण अनधिकृत नळजोडण्यांची संख्या किती आहेत ?
x) शहरातील सर्व भागांना समान प्रमाणात पाणीपुरवठा होत आहे का ? काही भागांमध्ये कमी पाणी पुरवठा होत असल्यास त्यामागील कारणे कोणती ?
xi) मिरा-भाईंदर शहरासाठी प्रस्तावित सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कधीपर्यंत पूर्ण होणार आहे ? त्यातून शहराला दररोज किती अतिरिक्त पाणी मिळणार आहे ?
xii) शहरामध्ये भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन महानगरपालिकेकडून नवीन जलकुंभ, पाईपलाईन किंवा पाणीपुरवठा प्रकल्प उभारण्याबाबत काही योजना आखण्यात आलेली आहे का ? असल्यास त्याची माहिती देण्यात यावी ?
९. श्रीम. दिपीका पंकज अरोरा मा. सदस्या यांनी दि. १०/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.
१) एम बी एम सी च्या पॅनल मध्ये किती रजिस्टर्ड स्ट्रक्चरल ऑडिटर्स आहेत?
अ) एम बी एम सी च्या पॅनलमध्ये स्ट्रक्चर ऑडिटर म्हणून रजिस्टर करण्याची काय अटीशर्ती आहेत?
ब) रजिस्टर झालेले सर्व ऑडिटर्सने सर्व अटीशर्ती पूर्ण केलेली आहेत का?
क) एम बी एम सी मध्ये रजिस्टर करायला स्ट्रक्चर ऑडिटर्सनी कोणती एक्झाम द्यायला लागते? ही एक्झाम एमबीएमसी घेत आहेत का?
ड) रजिस्टर झालेले सर्व स्ट्रक्चर ऑडिटर्स ला बीएमसी लायसन्स भेटला आहे का?
इ) सर्व स्ट्रक्चर ऑडिटर्सनी बिल्डिंगसला क्लिअरन्स सर्टिफिकेट दिल्यानंतर मीरा-भाईंदर मध्ये काही अप्रिय घटना घडली आहे का?
१०. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी मा. सदस्य यांनी दि. १७/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.
१) प्रलंबित कर थकबाकीची एकूण रक्कम व थकबाकीदारांची संख्या.
i) चालू आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या कर वसुलीची स्थिती व टक्केवारी.
ii) मोठ्या थकबाकीदारांवर करण्यात आलेली कारवाई व त्याचे तपशील.
iii) कर वसुली वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना.
iv) थकबाकीदारांसाठी कोणतीही सवलत योजना (अभय योजना) प्रस्तावित आहे का, असल्यास त्याची माहिती.
v) मनपाची एकूण कर थकबाकी नेमकी किती आहे? मागील ०३ वर्षांची तुलना देण्यात यावी.
vi) रु.५० लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेले मोठे थकबाकीदार किती आहेत? त्यांची यादी सादर करण्यात यावी.
vii) जुन्या अथवा नवीन कर आकारणी करतेवेळी अथवा झालेल्या काही व्यावसायिक (हॉटेल, गॅरेज, तात्पुरते शेड) अशा किती मालमत्तेंना शास्तीसह कर आकारणी करण्यात आलेली नाही याबाबतची सविस्तर माहिती.
viii) शहरातील विविध ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात शेड टाकून त्याचा वापर व्यावसायिक म्हणून करण्यात येत असतो अशा मालमत्तांना मनपामार्फत कर आकारणी करण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबतची सविस्तर माहिती.
ix) शहरातील विविध ठिकाणी असलेल्या काही मालमत्तेंना कर आकारणी का करण्यात आलेली नाही याबाबतची सविस्तर माहिती.
x) शहरातील मालमत्ताधारकांना कर देयके वेळेवर का पाठविली जात नाही ?
xi) मे.कोलोब्रो प्रा.लि यांनी केलेल्या शहरातील विविध मालमत्तेंचा सर्वेक्षणाचा अहवाल का सादर करण्यात आलेला नाही ? याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.
xii) शहरातील अनेक मालमत्तेस शास्ती लागू झालेली असूनही त्याची अमंलबजावणी आजमितीस का करण्यात आलेली नाही ?
xiii) मोठ्या थकबाकीदारांची यादी का जाहीर केली जात नाही ? त्यांच्यावर कठोर कारवाई का केली जात नाही ?
xiv) कर वसुलीचे उद्दिष्ट अपूर्ण राहण्यास जबाबदार अधिकारी कोण ?
xv) थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम का राबविण्यात येत नाही ?
xvi) संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर शिस्तभंगात्मक/कडक कारवाई का प्रस्तावित करण्यात आलेली नाही ?
११. श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह मा. सदस्य यांनी दि. १७/०३/२०२६ रोजी विचारलेला प्रश्न.
१) बांधकाम विभागामार्फत मागील आठ वर्षांमध्ये २०१७ पासून आजपर्यंत कोटेशन मार्फत किती कोणती कामे केली? मंजूर संस्थानी किती व कोणती कामे केली? काळ्या यादीत टाकलेल्या कोणाला व किती कंपन्यांना कामे दिली ?
अ) सन २०१७ पासून कोटेशनद्वारे केलेल्या कामांची रकमेसह सविस्तर यादी, त्यामध्ये कोटेशन नोटीस कुठे प्रसिद्ध केली व किती व कोणाची कोटेशन प्राप्त झाली याबाबतची सविस्तर यादिसह माहिती द्यावी.
ब) आलेल्या कोटेशनमध्ये एकाच हस्ताक्षरात भरलेली कोटेशन किती व कोणत्या कंपनीची होती. सदरची कोटेशन फेटाळली किवा मंजूर केली याबाबतचे सविस्तर यादीसह माहिती द्यावी.
क) मंजूर संस्थांना कोटेशन/निविदा किंवा कामे किती व कोणती दिली? मंजूर संस्थानिहाय कामाची रकमेसह यादी देण्यात यावी.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. महासभा दि. २२/०६/२०२६

सोमवार दि. २२/०६/२०२६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०३ दि. १२/०६/२०२६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

उपस्थित सदस्य

१)	मेहता डिंपल विनोद	महापौर
२)	ध्रुवकिशोर मन्साराम पाटील	उपमहापौर
३)	गेहलोत हसमुख मोहनलाल	सभापती, स्थायी समिती
४)	आफरीन मुझफ्फर हुसेन सय्यद	विरोधी पक्षनेता
५)	शर्मा मानशी रमेश	सदस्या
६)	ॲड. श्रध्दा संदिप कदम	सदस्या
७)	तिवारी अशोक सुर्यदेव	सदस्य
८)	पंकज पांडेय (दरोगा)	सदस्य
९)	मयेकर रजनीकांत पांडुरंग	सदस्य
१०)	गोहील शानू जोरावरसींग	सदस्या
११)	दत्ता जया रथीन	सदस्या
१२)	सिंह मदन उदितनारायण	सदस्य
१३)	दिव्या प्रसाद परब	सदस्या
१४)	योगिता सतीप्रसाद शर्मा	सदस्या
१५)	गणेश गोपाळ शेट्टी	सदस्य
१६)	तरुण सुभाष शर्मा	सदस्य
१७)	स्मिता विशाल पाटील	सदस्या
१८)	प्रेमनाथ गजानन पाटील	सदस्य
१९)	गुप्ता कुसुम संतोष	सदस्या
२०)	पुरोहीत मधुसूदन मनोहरलाल	सदस्य
२१)	वंदना मंगेश पाटील	सदस्या
२२)	प्रियंका करणीदान चारण	सदस्या
२३)	शाह राकेश रतिशचंद्र	सदस्य
२४)	सिंग श्रीप्रकाश जिलेदार	सदस्य
२५)	मेबल नोएल कोरीया	सदस्या
२६)	जैन सुनिता रमेश	सदस्या
२७)	परेश जयंतीलाल शाह	सदस्य
२८)	कोठारी भरतकुमार नथमलजी	सदस्य
२९)	डॉ. भव्या पिपलिया (शाह)	सदस्या
३०)	आभा अमेय पाटील	सदस्या
३१)	ॲड. रवि व्यास	सदस्य
३२)	किमया सुहास रकवी	सदस्या
३३)	कोमल विठ्ठल नावन्धर	सदस्या
३४)	भगवती तुगनचंद शर्मा	सदस्य
३५)	सुरेश खंडेलवाल	सदस्य
३६)	सुनिल चंपालाल चौधरी	सदस्य
३७)	रिजवाना अनवर खान	सदस्या

३८)	सना खलील देशमुख	सदस्या
३९)	जय राजेंद्र ठाकूर	सदस्य, गटनेता
४०)	विरकर आकांक्षा शंकर	सदस्या
४१)	त्रिपाठी कविता सुशील	सदस्या
४२)	सावंत दिपक कल्याणराव	सदस्य
४३)	करुणा किशोर पाटील	सदस्या
४४)	पाटील वंदना विकास	सदस्या
४५)	डोंगरे सचिन सुरेश	सदस्य
४६)	विशाल जगन्नाथ पाटील	सदस्य
४७)	लक्ष्मण गणपत जंगम	सदस्य
४८)	स्नेहा शैलेश पांडे	सदस्या
४९)	रुपाली शिंदे मोदी	सदस्या
५०)	वैती विजया हेमचंद्र	सदस्या
५१)	जैन प्रिती चंद्रकांत	सदस्या
५२)	थेराडे संजय अनंत	सदस्य
५३)	ज्योत्सना जालींदर हसनाळे	सदस्या
५४)	पारधी तुषार यशवंत	सदस्य
५५)	यशोदा अनिल ताटे	सदस्या
५६)	भोसले अनिल बाबुराव	सदस्य
५७)	मोहन गोपाळ म्हात्रे	सदस्य
५८)	सुरेखा प्रकाश सोनार	सदस्या
५९)	मनस्वी प्रमोद पाटील	सदस्या
६०)	मनिष प्रितम पराशर	सदस्य
६१)	जाट प्रतिभा चंदु	सदस्या
६२)	भावसार वंदना संजय	सदस्या
६३)	नवीन गुप्तेश्वर सिंह	सदस्य
६४)	आनंद दत्ताराम मांजरेकर	सदस्य
६५)	अरोरा दिपीका पंकज	सदस्या
६६)	बेलानी हेमा राजेश	सदस्या
६७)	ॲड. मयुरी सचिन म्हात्रे	सदस्या
६८)	नीला सोन्स	सदस्या
६९)	विवेक महेंद्र उपाध्याय	सदस्य
७०)	तारेन वेंचर मेंडोन्सा	सदस्य
७१)	शेख रुबिना फिरोज	सदस्या
७२)	आयरिन पॉल कॉड्रस	सदस्या
७३)	अनिल दिवाकर सावंत	सदस्य
७४)	परमार हेतल रतीलाल	सदस्या
७५)	भट दिप्ती शेखर	सदस्या
७६)	संजय बाळाजी पवार	सदस्य
७७)	जैन दिनेश तेजराज	सदस्य
७८)	कांबळी श्रध्दा सुधीर	सदस्या
७९)	सिमा कमलेश शाह	सदस्या
८०)	दुबे मनोज रामनारायण	सदस्य
८१)	अनिल रवजीभाई विराणी	सदस्य
८२)	रफिक गुलाब पठाण	सदस्य
८३)	रुबिना फैजूल्ला शेख	सदस्या
८४)	अशरफ अहमद मिस्त्री	सदस्य

८५) नयना गजानन म्हात्रे सदस्या
८६) भानुशाली वर्षा गिरधर सदस्या
८७) संजय वसंत थरथरे सदस्य
८८) भोईर जयेश वत्सला भानुदास सदस्य
८९) शॉन लिओ कोलासो सदस्य
९०) बगाजी शर्मिला विन्सन सदस्या
९१) डिमेलो फ्रिडा बर्नड सदस्या

गैरहजर सदस्य —

१) महेश नरेश म्हात्रे सदस्य
२) अनिता जयवंत पाटील सदस्या
३) निर्मला बाबुराव सावळे सदस्या

रजेचा अर्ज —

१) दळवी प्रशांत ज्ञानदेव सदस्य

मा. महापौर :-

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी. सन्मा. सदस्य जयेश भोईर तुम्ही जागेवर बसा.

जयेश भोईर :

मॅडम अतिक्रमणवाल्यांना कारवाईसाठी पाठवणार नाही तोपर्यत मी जागेवर बसणार नाही.

मा. महापौर :-

आपल्या विषय पत्रिकेवर विषय आहे.

जयेश भोईर :-

गेल्या दोन महिन्यापासून आयुक्तांना भेटतो. माझ्या पाच व्हिजीट झाल्या. परंतु आयुक्तांनी ह्या विषयाबाबत दखल घेतली नाही. सुरभी हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय होतो. तो लग्नासाठी हॉल मंजुर केला होता. तिथे लॉजिंग चालू आहे. वारंवार तक्रारी करून देखील त्याची दखल घेतली जात नाही. लोकांची घर झाली की लगेच कारवाई करतात परंतु तिथे वेश्या व्यवसाय होतो तिथे थोडीपण कारवाई केली जात नाही. आम्ही सत्तेत असून देखील आम्हाला प्राधान्य दिले जात नाही. कारवाई करण्याबाबत तुम्ही आता आदेश काढा मी माझ्या जागेवर बसतो.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब ह्या विषयाबाबत आपल्याला माहित आहे त्यांनी सांगितले की वारंवार तक्रारी करून देखील आपण तो विषय घेतला नाही. असे होता कामा नये त्यांचा जो विषय आहे तो मार्गी लावण्यात यावा.

जयेश भोईर :-

ग्रामपंचायत काळातली जी घर आहेत ती तोडायला लगेच जातात. काही विरोधक जावून हे तोड ते तोडा अस करतात ते सुध्दा थांबविण्यात यावे. ज्यांनी परवानगी घेतली नाही त्याची तोडक कारवाई करा. ज्यांचे दोन फुटांचे बांधकाम असते तिथे जे समाज सेवक आहेत ते हे तोडा ते तोडा ते चुकीचे आहे.

नयना म्हात्रे :-

मॅडम जी ग्रामपंचायत कालीन घर आहेत....

मा. महापौर :-

मी आदेश दिलेला आहे सर्वांनी जागेवर बसा. मी कारवाई करायला सांगते.

महापालिका सचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सोमवार दि. २२/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

जय ठाकूर :-

मा. महापौर मॅडम शहर में जिस तरीकेसे मंदिर और मज्जिद में कारवाई हो रही है आपसे बिनती है की पिछली ३ महिनेसे जो क्रिमीनल केसेस बढे है, जो अनधिकृत है उनके उपर कारवाई करे ऐसी हमारी मांग है। किसी प्रतिनिधी या किसी पदाधिकारी के उपर जब गुन्हा दाखल होता है तो उससे पुरा सभा का नाम खराब होता है, शहर का

नाम खराब होता है। आपसे मेरी रिक्वेस्ट है की आप पुलिससे बात करे और जोभी इस विषय में सच्चाई हो वो सामने आना चाहिए ताकी हमारे शहर का और नगरसेवक नाम वारंवार खराब होता है ऐसी हमारी बिनंती है।

हसमुख गेहलोत :-

महापौर मॅडम आपकी परमिशनसे सबसे पहले में जय ठाकूर को धन्यवाद देना चाहता हूँ जिन्होने कहॉ बुलडोझर कारवाई करे तो मुझे इस बात की खुशी है की हमारे चर्चीत यशस्वी मुख्यमंत्री योगीजीके कदम पे चलते है उन्होने कहाँ कारवाई करे पर यह महासभा का विषय नही है। आप कैसे लेते है इस विषय को यह आपका निर्णय है।

अनिल सावंत :-

महापौर मॅडम ह्या विषयाशी संबधीत जो महापालिकेचा विषय आहे त्याच्यावर आपले लक्ष वेधू इच्छितो मॅडम हा जो प्रकार घडला हा प्रकार साधारण ७-८ वर्षापुर्वी घडला आणि त्यावेळी ज्यांच्या विरोधात तक्रारी होत्या ते मनपाचे सिक्यूरिटी गार्ड होते आणि जिथे हा प्रकार घडला ती मनपाची १४ नंबरची शाळा होती. हा विषय गंभीर आहे. मनपाचा स्टाफ आणि मनपाच्या शाळेमध्ये हा प्रकार घडतो त्यावेळी तो प्रकार उघडकीला आल्यानंतर त्या सिक्यूरिटी गार्डवर कारवाई होत नाही. त्याच्यावर काय कारवाई केली जाते तर त्याची बदली शाळेतून स्मशान भूमीच्या सिक्यूरिटीमध्ये केली जाते. त्याच वेळी त्याच्यावर कारवाई केली असती तर पूढचा प्रकार घडला नसता. मनपाच्या ३५ शाळा आहेत त्या शाळेमध्ये लेडीज आणि जेन्टस असे दोन सिक्यरिटी टॉयलेटच्या बाहेर असणे गरजेचे आहे. तसेच शाळा बंद झाल्यावर देखील २४ तास तिथे सिक्युरिटी पाहिजे. कारण त्याठिकाणी काही गैरप्रकार होवू नये. आपल्याला विनंती आहे की ह्या ३५ शाळांचा आढावा घेवून लेडीज आणि जेन्टस सिक्यूरिटी गार्डची नेमणूक करण्यात यावी.

मा. महापौर :-

आपण सर्वानी आपले मत मांडले आहे.

तरूण शर्मा :-

महापौर मॅडम जसे अनिल सावंत साहेबांनी सांगितले की सिक्यूरिटी गार्ड नसल्यामुळे काय घटना घडली आहे. तर आमच्या वॉर्ड क्र. ३ मध्ये सचिन तेंडूलकर मैदान आहे. त्याच्यामध्ये देखील सिक्यरिटी नसल्यामूळे मोठा गुन्हा घडलेला आहे. चार दिवसापूर्वी एक बॉडी मॅग्रोजमध्ये होती ती बॉडी कुत्र्याने खाताना बाहेर घेवून आले. त्यावेळी पोलिसांना समजले की तिथे ५ जुनला तिथे मर्डर झालेला आहे. मनपाचे सीसीटीव्ही बंद आहेत. आरोपीला अटक झालेली आहे. परंतु आपले सिक्युरिटी नसल्यामुळे हा प्रकार घडलेला आहे.

मा. महापौर :-

अनिल सावंतजीने जे सांगितले त्याबाबत पोलिस प्रशासनानी दखल घेतली आहे. गुन्हा दाखल झालेला आहे, योग्य कारवाई करण्याबाबत मी सांगितले आहे. जो पण गुन्हेगार असेल त्याला सजा मिळालीच पाहिजे. असे माझे मत आहे. सिक्युरिटीबाबत माझी आयुक्तांना विनंती राहील की मनपा शाळेमध्ये आपल्या सिक्युरिटीने व्यवस्थित काम करायला पाहिजे सिक्युरिटी व्यवस्थित काम करताना मला दिसत नाही. आज मनपाची सभा होती. लोकांनी ह्याठिकाणी आंदोलन केलेले आहे. तसेच नगरसेवक आणि लोक देखील ट्राफिकमध्ये अडकले आहेत. तिथे देखील सिक्यूरिटीने काम करायला पाहिजे. तसेच तरूण शर्माजीने जो विषय मांडला आहे त्याठिकाणी मी स्वत: व्हिजीट केली होती. तिथे सर्व अधिकारी पण होते आणि मी सिक्युरिटी वाढवण्यासाठी तसेच जाळी लावण्या संदर्भात आदेश दिले होते त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यात यावी. आपल्या शहरामध्ये जे प्रकार घडत आहे त्याला रोखण्यासाठी प्रयत्न व्हायला पाहिजे.

शानु गोहिल :-

महापौर मॅडम आपने आदेश दिया अपने म्युन्सिपल स्कुल गार्डन, मैदान है वहाँ सिक्युरिटी गार्ड होने चाहिए जेसल पार्क चौपाटी में दहिसर से वसई विरार के लोग घूमने के लिए आते है। वहा हमारे पास सिक्युरिटी गार्ड है पर वह सिक्युरिटी गार्ड वहॉ पर बैठते है। हम जब उनके पास शिकायत लेके जाते है, तब वह सिक्युरिटी बोलते है, यह हमारा काम नही है। तो उसके बारे में मनपा क्या कर रही है? हमने वारंवार शिकायत किया है उनके हेडसे हमने मिटींग भी किया है उसके बावजूद कोई सुधार नही है वो अपनी मनमानी करते है। व्हिडीयो गेम खेलते रहेते है।

मा. महापौर :-

हा विषय पुरा मिरा भाईंदर आहे जिथे आपल्या मनपाची वास्तू आहे. त्या सर्व ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. मी आदेश दिलेले आहेत ज्याठिकाणी आपले सिक्युरिटी गार्ड आहेत त्यांना सुचना देण्यात यावी.

(सभागृहात गोंधळ)

अनिल भोसले :-

महापौर मॅडम आयुक्तांनी पोलिसांना पत्र देवून समन्वय साधला तर हा प्रश्न मिटेल अशी माझी सुचना आहे.

महापालिका सचिव :-

प्रश्न क्र.३, श्रीम. आभा अमेय पाटील मा. सदस्या यांनी दि. २३/०२/२०२६ रोजी विचारलेल्या प्रश्नाचे वाचन करण्यात आले.

आभा पाटील :-

मा. महापौर मॅडम मला ह्या प्रश्नाचे उत्तर प्राप्त झालेले आहे. परंतु ह्या बाबत मला खुलासा पाहिजे. राज्य सरकारनी आस्थापना खर्चामधील सामाविष्ठ करावयाचे खर्च ह्यांचा निकष ठरवण्यात आलेला आहे. आस्थापना विभागाची टक्केवारी काढताना शासनाने आस्थापना विभागाचे निकषाबाबत सर्व बाबीचा समावेश आस्थापना बाबीमध्ये केला आहे का? ह्याचा खुलासा करावा मला जे उत्तर मिळाले आहे त्याच्यामध्ये ३५% खर्च आस्थापनावर नियमानुसार करू शकतो तो ४२% झालेला आहे वाढीव खर्च पूढे होवू नये ह्याबाबत प्रशासनाकडून काही नियोजन केले गेले आहे का ह्याचा खुलासा करावा. जेव्हा आम्हाला सांगितले की ४२% खर्च झाला आहे तेव्हा स्टेटमेंट मांडता तेव्हा प्रत्यक्ष दिला गेला आहे का की आपल्या वेतनावर एवढा खर्च झाला स्टेशनरीवर एवढा खर्च झाला ह्याची डिटेल शिट मिळाली तर सभागृहाला बर पडेल की हा जो खर्च वाढतो तेव्हा तो कूठे खर्च होतो हे कळल तर सर्वासाठी लाभदायक होईल.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

सन्मा. महापौर, सन्मा. सभागृह आस्थापना खर्चाची मर्यादा शासन निर्णयानुसार ३५% असते २०२४-२५ चा जो खर्च आहे तो ४२% आहे. आस्थापना खर्च वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे स्थायी आस्थापना आणि अस्थायी आस्थापना. स्थायी आस्थापनेमध्ये आपले जे कर्मचारी आहेत त्यांच्या पगारावरील होणारा खर्च आणि वेतनावरील जो खर्च असतो त्याचबरोबर आपले जे किरकोळ मेन्टेनंस असतात त्याचे खर्च समाविष्ठ होत असतात. तसेच भांडार विषयक खर्च असतो त्याचा समावेश होत असतो. अस्थायी आस्थापनेमध्ये जे कॉनट्रूयाक्टवर जे सर्व विभागात लेबर आहेत म्हणजे अतिक्रमण, उद्यानचे असे वेगवेगळे लेबर आहेत त्यांना मिनिमम वेजेस प्रमाणे वेतन द्यावे लागते त्यामूळे हा आस्थापना खर्च वाढण्याचे प्रमुख कारण आहे. आस्थापना खर्च वाढण्याचे कारण म्हणजे दरवर्षी इन्क्रीमेंट वाढत असते तसेच मिनिमम वेजेसचे रेट दर ६ महिन्याला वाढत असतात. तसेच आपला लाईट बिल आणि मेन्डेटरी खर्चामध्ये वाढ होत असते. ती वाढ त्या खर्चामध्ये झालेली आहे.

आभा पाटील :-

मला अचुक खुलासा दिला आहे तो ४२% दिला आहे शासनाने मानक ठरवले आहे जे शासनानी मानक ठरवले आहे शिर्षक आणि बाबी सेप्रेट हेडस ह्याच्यानुसार खुलासा द्यावा.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम हे जे ३५% मर्यादा म्हटले आहे ते कशावर म्हटले आहे. टोटल बजेटच्या ३५% की कशावर म्हटले आहे.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

बजेटच्या नाही आपण आस्थापना खर्च करत असताना स्थायी आणि अस्थायी आस्थापना ह्याच्यामध्ये डेव्हलपमेंटवर होणारा खर्च ह्याचा समावेश असतो.

अनिल सावंत :-

मी तुम्हाला विचारतो ३५% म्हटले आहे कशाच्या ३५%

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

महसूल उत्पन्न असते त्याच्यावर असते.

अनिल सावंत :-

रेव्हेन्यू मध्ये काय काय पकडता..

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

सर्व प्रकारचा रेव्हेन्यू...

अनिल सावंत :-

सोबत पृष्ठ क्रं १ ते ५ जोडले आहे पण इथे दिसत नाही.

महापालिका सचिव :-

संबधीत सदस्यांना दिलेले आहे.

अनिल सावंत :-

महासभेचा प्रश्न आहे तर सर्व सदस्यांना मिळायला पाहिजे अशी अपेक्षा आहे.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

देतो

महापालिका सचिव :-

ज्या सदस्यांनी प्रश्न विचारलेला असतो त्यांना त्या विभागाकडून उत्तर गेलेले असते त्यामूळे ते सर्व एकत्रीत करून सभासदांना देतो हे द्यायचे असेल तर पुन्हा झेरोक्स करून द्यायला लागेल.

अनिल सावंत :-

एखाद्या सदस्यांनी महासभेमध्ये प्रश्न विचारल्यानंतर तुम्ही त्यांना इंडीव्ह्यूजवल उत्तर देता ते बरोबर आहे परंतु महासभेमध्ये जेव्हा प्रश्न देता तेव्हा उत्तर मिळणे अपेक्षित आहे.

महापालिका सचिव :-

ठीक आहे.

दिनेश जैन :-

ह्याच्यामध्ये जे ४२% जो खर्च दाखवला आहे. तो केलेला खर्च आहे. आपले जे एक वर्षाचे बजेट आहे त्याचा ४२% आस्थापनावर केलेला खर्च आहे. ह्यांनी ६-६ महिने बिल दिलेली नाही ते खर्च कूठून आणणार ते केले तर ५०% वर जाणार ८-८ महिने सिक्यूरिटीचे बिल बाकी आहे. आणि ही सिक्यूरिटी काही काम करत नाही. नानाची सिक्यूरिटी काम करत होती. आपल्या गावातल्या लोकांना बाहेर काढले आणि ह्यांना आपण इथे आणले. सर्वांची तक्रार आहे. सर्व डिपार्टमेंटचे काढा किती पैसे द्यायचे आहे. पेमेंट बाकी आहे त्याचे काय करणार? सभागृहाला गोल गोल फिरवायचे असे चालणार नाही. तुमचे काय मॅनेजमेंट आहे की नाही.

महापालिका सचिव :-

प्रश्न क्र.४, श्रीम. आभा अमेय पाटील मा. सदस्या यांनी दि. २३/०२/२०२६ रोजी विचारलेल्या प्रश्नाचे वाचन करण्यात आले.

आभा पाटील :-

प्रश्न क्र. ४ च्या संदर्भात अतिरिक्त प्रिमियम शुल्क आणि अन्सलरी शुल्काची येणी असलेल्या रकमाची माहिती उत्तरामध्ये दिलेली आहे. परंतु मनपाला २०२४-२५ च्या अखेरीस दिलेल्या माहितीप्रमाणे २०८ कोटी येण आहे. ही बाब आर्थिक बाबीशी निगडीत असल्यामूळे मा. मुख्यलेखाधिकारी साहेब ह्यांनी पुढील प्रश्नाचा खुलासा करावा.

मा. उपमहापौर :-

आभा मॅडम आपला प्रश्न टाऊन प्लानिंग संदर्भात आहे.

आभा पाटील :-

सर मला टाऊन प्लानिंग विभागा कडूनच समजले आहे. आपल्याला २०८ कोटी येणे आहे. जेव्हा बजेट बनवतो त्यावेळी आलेले त्यांनी त्यांचा अर्थविभाग जो आहे ते त्यांच्या स्टेटमेंटमध्ये दाखवायला पाहिजे. आपल्याकडे किती आले आणि किती येण बाकी आहे.

मा. उपमहापौर :-

तुमचा जो प्रश्न आहे त्याच्यावर विचारा हे वेगळ विचारायला लागेल.

आभा पाटील :-

सर त्याच्याच रिलेटेड आहे. स्टेटमेंट सभा पटलावर देता त्याच्यामध्ये आतापर्यत किती येण बाकी आहे. मला उत्तरात काय सांगितले २०२३-२४ चे आम्ही बनवतो. २०२१-२२ चे बजेट स्टेटमेंट बनवले असेल.

मा. महापौर :-

त्यांना ज्या प्रश्नाचे उत्तर पाहिजे ते देण्यात यावे.

शिरीषकुमार धनवे :-

मा. महापौराच्या परवानगीने हा प्रश्न टाऊन प्लानिंग विभागाशी संलग्न होता. दुसरा प्रश्न २०२३-२४ वर्षाची आर्थकि तपशीलवार माहिती देण्यात यावी. त्यासाठी आपण सी ए ची फर्म नेमलेली आहे. त्याच्यानुसार लेखे तयार करत आहोत. त्या लेखेमध्ये आपण मनपाची रिसीट अॅन्ड लायबीलीटी ह्या दोन्हीचे तक्ते त्यात नमुद होतात. आपल्याकडे २०२१-२२ व २०२२-२३ चे लेखे आलेले आहेत ते लेखे तयार करण्याचे काम सुरू आहे. ते झाल्यावर सभागृहात सादर करण्यात येतील.

आभा पाटील :-

मला जे उत्तर दिले त्याच्या २०२३-२४ चे आम्ही बनवतो ते आता सांगता ह्याच्यानुसार असेट लायबिलीटी स्टेटमेंट आहे २०२१-२२ व २०२२-२३ चे रेडी आहे ते देण्यात यावे ही विनंती.

अनिल सावंत :-

ह्या प्रश्नाला उत्तर मिळालेले आहे विकासकाकडून २०८ कोटी रू. शिल्लक आहेत त्यांना कधी ५०%, ८०% सवलती देतो. ह्याच्यामध्ये आपण विकासकांना सवलत देतो. जे घर खरेदी करतात त्यांना सवलत देत नाही त्यांना ॲडव्हासमध्ये पैसे द्यायला लागतात. मार्च महिन्यामध्ये प्रशासनाकडून मालमत्ता वसुलीच्या नावाखाली जो हैदोस घालण्यात आला. कित्येक इमारतीचे भर उन्हाळ्यामध्ये नळ कनेक्शन कट करण्यात आले. आपण विकासकांना सवलत देतो आणि सामान्य नागरिकांना वेठीस धरतो. प्रशासनाने हे काय चालवले आहे. सामान्य नागरिक प्रामाणिकपणे टॅक्स भरतात मागेपूढे झाले युध्दा मुळे काहीजण बाहेर अडकले होते त्यांचे नोटीस न देता नळ कनेक्शन कट केले गेले. त्याचा भुर्दड बिल्डींगला भरावा लागला. आपण नागरिकांची पर्वा करत नाही.

पुरूषोत्तम शिंदे (सहा. सांचालक, नगररचना) :-

सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला बांधकाम परवानगी देताना युडीसीपीआरमध्ये विकासकांना सवलत देण्याबाबत तरतुद आहे. त्याच्यामध्ये ऑप्शन १ आणि ऑप्शन २ आहे. ऑप्शन १ मध्ये १०% प्रथम भरायचे आणि उर्वरित पाच टप्प्यामध्ये आणि ऑप्शन २ हा आहे प्रथम टप्प्यात २०% आणि उर्वरित इमारतीचे ओ.सी. घेताना डिपॉझिट भरायचे आहे. त्यानुसार सवलत देण्यात आलेली आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम माझी आपल्याला विनंती आहे अशी जी सवलत युडीसीपीआर मध्ये आहे ठिक आहे. आपण सुध्दा धोरण ठरवून नागरिकांना अशी सवलत देता येईल का त्या अनुषंगाने कारवाई करण्याची कार्यवाही करावी. अशाप्रकारे प्रशासनाला निर्देश द्यावे की अशाप्रकारे काही करू शकतो का ?

मा. महापौर :-

प्रशासनानी ह्या विषयाची नोंद घ्यावी की आपण काही करू शकतो का त्याप्रमाणे आपण करायला पाहिजे.

महापालिका सचिव :-

प्रश्न क्र. ५, श्री. जय ठाकुर मा.सदस्य यांनी दि. १८/०२/२०२६ (या कार्यालयास प्राप्त दि. ०६/३/२०२६) रोजी विचारलेल्या प्रश्नाचे वाचन करण्यात आले.

जय ठाकूर :-

मा. महापौर मॅडम सदर समिती महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे सुचित मान्यता प्राप्त प्रणाली नसल्याचे एवढा विलंब का झाला ह्या संबधात माहिती देण्यात यावी आणि महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे सुचित मान्यता प्राप्त करण्यासाठी किती दिवस लागतील ह्या संबधीत माहिती देण्यात यावी. ह्याचे उत्तर आहे त्यामध्ये लागू नाही. इसमे समिती बनाने का लागू नही है क्या उसका नियम है की वो कितने टाईम में बननी चाहिए मुझे जानकारी है ४-५ दिन पहले समिती गठीत की गई उसमे और एक विषय था इन्होने एक आदिवासी फेरीवाले पे २३,१०० रू फाईन मारा था। बादमें ठेकेदारने वापस दिया तो मैने इनको यह पुछा था और कितने आदिवासी है इनको आयडेन्टीफाय किया है क्या कितने आदिवासी फेरीवाले है उनकी यादी मुझे नही दि गई।

कविता बोरकर (मा. उपायुक्त) :-

प्रश्न क्र. ५ मध्ये विलंब का झाला ह्याबाबत माहिती मागीतली होती. आपल्याकडून शासनाला वेळेत पत्रव्यव्हार झालेला आहे परंतु शासन स्तरावर समिती गठीत होण्यासाठी अधिसुचीत होण्यासाठी वेळ गेलेला आहे त्यामूळे हा विलंब आपल्याकडून झालेला नाही. त्यामुळे लागू नाही असे लिहीले आहे.

जय ठाकूर :-

शहर में कितने आदिवासी फेरीवाले है उनको आयडेन्टीफाय किया है क्या ?

कविता बोरकर (मा. उपायुक्त) :-

आपण सर्व फेरीवाल्याचे सर्व्हेक्षण केले आहे. त्याच्यात आपण स्पेशल कोणत्या कास्टचे असे सर्व्हेक्षण केलेले नाही. आता आपण आदिवासी फेरीवाल्यासाठी वेगळी कार्यवाही करणार आहोत.

जय ठाकूर :-

महापौर मॅडम में यही कहना चाहता हूँ की एक आदिवासी पे २३१०० रू. फाईन मारा गया और उसको ठेकेदारने वापस किया और भी आदिवासी फेरीवालेसे वो लोग कलेक्ट कर रहे होगे क्योकी आदिवासी को शुल्क माफ है तो और कलेक्ट किया तो कैसे आयडेन्टीफाय होगा।

मा. महापौर :-

आदिवासीचे वेगळे आहे का ?

प्रणाली घोंगे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौराच्या परवानगीने हा विषय बाजार वसूली संदर्भात आहे. आपल्याकडे जी तक्रार होती त्या महिलेला पडताळणी करून त्या ठेकेदारामार्फत तिचे शुल्क परत करण्यात आले. आपण ६ प्रभाग समितीमार्फत सर्व्हेक्षण केलेले आहे. आपल्याला ३४ आदिवासीची यादी प्राप्त झाली होती. ती यादी आपण ठाण्याला अपर आयुक्त आदिवासी विभाग आहे तिथे पडताळणी साठी पाठवली आहे. ती पडताळणी होवून आल्यानंतर जे आदिवसी आहेत त्यांना परत करणार आहोत. त्यांना आपण रिमांयडर दिलेले आहे.

जय ठाकूर :-

महापौर मॅडम इस बात का नोंद किया जाए की इन्होने ३४ आदिवासी आयडेन्टीफाय किया है और उनसे बजार फि वसूला है तो वापस देना चाहिए।

मा. महापौर :-

आपण त्यांना सुचना दिलेली आहे.

प्रणाली घोंगे (मा. उपायुक्त) :-

ठाणे कलेक्टरकडून पडताळणी होवून आल्यावर त्याची अंमलबजावणी करणार.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम ह्या प्रश्नासोबत म्हटले आहे की सोबत माहिती जोडून देण्यात आली आहे. परंतू माहिती काहीच नाही. ती माहिती सभागृहाला द्या.

मा. उपमहापौर :-

ही माहिती आपल्याला नसून ज्या सदस्यांनी प्रश्न विचारला आहे त्यांना दिलेली आहे.

मा. महापौर :-

तुम्हाला दिलेली आहे का ?

जय ठाकूर :-

माहिती बाकी था वो बादमे देनेवाले थे लेकीन नही दिया। थोडा दिया है थोडा बाकी है।

मा. महापौर :-

प्रश्न असेल तर त्याची माहिती देण्यात यावी.

अनिल सावंत :-

सभागृहामध्ये प्रश्न विचारला आहे तर सदस्यांना पूर्ण माहिती मिळाली पाहिजे.

मा. महापौर :-

पहिल्यापासून नियम काय आहे की ज्या सदस्यांचा प्रश्न आहे त्यांनाच माहिती देण्यात येते. सचिव साहेब आपण काय करतो. उत्तर सर्वाना देतो का ?

महापालिका सचिव :-

प्रश्नोत्तराचा जो विषय आहे ते संबधीत विभागाकडून ज्या सदस्यांचा प्रश्न आहे त्यांना उत्तर दिले जाते आणि जेवढे प्रश्न आले आहेत ते एकत्रित करून अजेंड्या बरोबर किती प्रश्न आहेत ते पाठवतो आणि सभेच्या दिवशी प्रशासनाकडून जी उत्तर येतात त्याचा एकत्रित गोषवारा करून सदस्यांना माहितीसाठी देतो. सचिव कार्यालयाने संबधीत सदस्यांना देणे अपेक्षित नाही. ते संबधीत विभाग त्यांना माहिती देते.

मा. उपमहापौर :-

माझी अशी विनंती आहे आपण हा खर्च कशाला करतो वेस्ट होतो ना. माझी अशी विनंती आहे ज्यांनी प्रश्न विचारला त्यांनाच त्याची माहिती दिली पाहिजे.

अनिल सावंत :-

सभाशास्त्रामध्ये असे अपेक्षित नाही. आम्हाला हा जो पेपर देता त्याच्यात लिहिले आहे की सोबत माहिती जोडलेली आहे. माहिती कूठे आहे. आम्हाला माहिती मिळायला पाहिजे.

मा. उपमहापौर :-

प्रशासन आपल्या माहिती करीता देते. आपण खर्च कमी केला पाहिजे.

भगवती शर्मा :-

सदस्य यह बताए की उसके पहले कब दिया था उसका एक उदाहरण बताए। २००२ से आजतक प्रश्न का कभी भी उत्तर सभी सदस्य को नही दिया गया। जिस सदस्य का प्रश्न था उसको ही डिटेल दिया जाता था। आप महापौर मॅडम को रिक्वेस्ट करो उनका आदेश होगा तो दे सकते है इसके पहले कभी ऐसा नही हूवा।

अनिल सावंत :-

आप महासभा का विषय पत्रिका लेके आवो उसमें प्रश्न का उत्तर नही दिया तो आप.....

भगवती शर्मा :-

प्रश्न का उत्तर दिया गया है संबधीत व्यक्ती को उत्तर दिया गया है। सन्मा. सदस्य आप दिशाभूल न करे

मा. महापौर :-

पूढचा विषय घेण्यात यावा.

अनिल सावंत :-

सोबत माहिती जोडून देण्यात आलेली आहे तिकडे संबधीत सदस्यांना माहिती दिली आहे तुम्हाला माहिती देणार नाही असे लिहून देण्यात यावे. आम्हाला खोटे कागदपत्र देवू नका आणि त्याचा पायंडा पाडू नका.

मा. महापौर :-

आपण ह्याच्यामध्ये किती प्रश्न देतो.

महापालिका सचिव :-

मागच्या महासभेला दोन प्रश्न झाले होते आणि ३१ प्रश्न राहिले होते ते आजच्या महासभेच्या अजेंड्यामध्ये दिलेले होते.

मा. महापौर :-

माझे असे मत आहे की अर्ध्या तासाचा प्रश्नोत्तराचा तास आहे तर त्याच्यामध्ये एकूण ५ प्रश्न ठेवले तरी होतील कारण ह्याच्यात आपले पेपर आणि टाईम वाचेल.

महापालिका सचिव :-

आपल्या परवानगीने पुढील महासभेमध्ये जे उर्वरित प्रश्न आहेत त्यापैकी जे पहिले पाच प्रश्न आहेत ते अजेंड्या सोबत आणि सभागृहात प्रश्नोत्तरासोबत दिले जातील.

मा. महापौर :-

ठीक आहे.

महापालिका सचिव :-

आजच्या महासभेसाठी एकून तीन लक्षवेधी आल्या आहेत. १) श्री. शॉन कोलासो यांची लक्षवेधी – पाली-नवीखाडी व देवतलाव-मोठागाव खाडी परिसरातील पूर्वमान्सुन खाडी स्वच्छता कामांची अत्यंत संथ गती, अपूर्ण कामे व संभाव्य पूरस्थितीबाबत. २) श्रीम. सना देशमुख यांची लक्षवेधी – महानगरपालिकेने राष्ट्रीय मानांकन टिकवून ठेवण्यासाठी प्रशासकीय नियोजनाबाबत. ३) श्री. भगवती शर्मा यांची लक्षवेधी – मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करणेबाबत. सदर लक्षवेधी मा. महापौराकडे सुपूर्द करत आहे.

मा. महापौर :-

श्री. भगवती शर्मा ह्याची लक्षवेधी स्विकारली जात आहे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम माझी लक्षवेधी स्विकारल्याबद्दल आपले धन्यवाद पाणी की स्थिती दिन प्रतिदिन मानसून न आने के कारण बिकट परिस्थिती बनती जा रही है। २०११ के अनुसार शहर की लोकसंख्या ८ लाख थी जो आज १४ लाख तक पहूच गई है शहर के जरूरत के अनुसार २४० एम एल डी पाuh की जरूरत है और हमारे पास जलाशय नही है की वहॉ से आपको नियमीत पाणी मिल सकता है हमे जो स्टेमसे पाणी प्राप्त होता है वो ८० एम एल डी है और एम आय डी सी से ११५ एम एल डी पाणी मिलता है हमे मुंबई मनपासे देढ एम एल डी पाणी मिलना चाहिए था उसकी गती ०.३,०.४ ऐसा मिलता है स्टेमसे जो ८६ एमएलडी पाणी मिलना चाहिए वह ८० एम एल डी पाणी मिलता है १२५ एम एल डी पाणी एम.आय.डी.सी. से मिलना चाहिए वह हमे ११० -११५ मिलता है इस स्थिती के अंदर हमारे शहर मे नियमीत पाणी की कमी चल रही थी वह मानसून के देरी के कारन से बीच बीचमें कटौती आ गई है। महापौर मॅडम हमे एम आय डी सी से सुचना मिली थी १५ दिन के अंदर पाणी की कटौती की जाएगी सुर्या धरण का भी बीच बीच में ब्रेकडाऊन हो जाता है उसके कारण हमें पाणी की कमी होती है और उसमे जो पाणी आता है उसका जब डिस्ट्रीब्यूशन करते है तो किसी को भी सम पाणी दे नही पाता है। स्टेम वाले भी हर हप्ते पाणी में कटौती करणे के लिए

महापालिका को सुचना दि गई १५ दिन में एम आय डी सी का पाणी काटौती होगा क्योकी धरण में पाणी नही है हप्ते मे स्टेम और एम आय डी सी की कटौती लागू की गई तो सरासरा अंदाज है की हप्ते मे ३ बार ही पाणी मिल पाएगा बाकी ३-४ दिन पाणी नही मिल पाएगा मानसून की कमी के कारण हम मिरा भाईदर वासी ही परेशान नही है पूरे महाराष्ट्र की यही स्थिती है महापौर मॅडम आपने बिच में एम आय डी सी के साथ एक मिटींग का आयोजन किया था उसमें उपमहापौर स्थायी सभापती और मा. आयुक्त भी थे उसमे आपने निवेदन किया था की हमको हमारा पूरा पाणी मिलना चाहिए मेरी आपसे बिनती है की स्टेम की कटौती हम रद्द कर सकते है क्योकी आप उसकी सदस्य है एम आय डी सी के लिए आप मंत्र महोदयसे रिक्वेस्ट करके उसमे कम कटौती करके हमे पाणी मिले अगर स्टेम की कटौती रद्द की जाएगी तो हमे थोडा बहोत आराम मिलेगा और हम जनता को पाणी दे पाऐगे कटौती होके पाणी आता है तो डिस्ट्रीब्यूशन में तकलीफ हो जाती है पाणी टंकीमें भरता नही है सभी नागरिक बोलते है पाणी छोडो तो जल्दी पाणी छोडने के कारण बिना फिल्टर पाणी छोडते है तो हमे पाणी बराबर नही मिल पाता है तो उसमें ध्यान देना चाहिए की जब पाणी आए तो उसका बिना प्रेशर बिना सफिशियंट पाणी जाए बगैर हमे उसका डिस्ट्रीब्यूशन नही करना चाहिए। कटौती जब करते है तो हमे उपाययोजना तयार करनी चाहिए वह आपके माध्यमसे हो सकती है हमारे शहर मे हमने रहिवासी और कर्मशियल दोनो को पाणी दिया है मेरा आपसे निवेदन है की व्यवसायिक जो नळ कनेक्शन दिया गया है उसमे विचार करके उनको पाणी कम दिया जाए जब तक हमारा पाणी कटौती रद्द नही होता तब तक कुछ उपाययोजना किया जाए एसा करना आवश्यक होगा तब हमे कुछ फायदा मिल सकेगा पूरा मिरा भाईंदर में पूरे बिल्डींग में ५-६ फोर व्हिलर और १०-१५ टू व्हिलर है उसको सूबह धोया जाता है तो उसमे प्रशासन को जनजागृती करना चाहिए की जब तक मान्सून नही आता आप पाणी का दुरूपयोग ना करे अगर करता है तो उसपर दंडात्मक कारवाई क्या कर सकते है वह प्रशासन निश्चित करे। मिरा भाईंदर में जितने कुए है उसकी मानसून के पहले सफाई करते है उस कूओ का भी पाणी अच्छा है उनके माध्यमसे हम जलपूर्ती कैसे कर सकते है उसप भी विचार विर्मश करना चाहिए हमारा सिव्हरेज का भी पाणी फिल्टर होता है वह हम व्यवसायिक वापर में ले सकते है जितनी भी बिल्डीग बनती है तो रेन हार्वेस्टिंग करते है रेन वॉटर हार्वेस्टिंग जब पजेशन देते है तब ओसी तक के लिए सिमित रहता है उसके बाद वो रेन वॉटर हार्वेस्टिग प्रोजेक्ट बहोत कम बिल्डर चालू करते है उसके कारण हमे बहोत कठीनाई होती है अगर पुराणी इमारत को छोड के जो नया इमारत में रेन वॉटर हार्वेस्टिंग रहता तो आज हमे निश्चित रूपमें हमे कम तकलीफ होती महापौर मॅडम जगह जगह पे वॉल्व लिकेज है लाईन लिकेज है महाराजा स्विट के उधर जो वॉल है वह १५ दिन से लिकेज है। ऐसी जो पानी की लिकेज हो रही है उसको हम रोकेंगे तो हमारी पानी की बचत होगी और हम जनता को पानी दे पायेगे। महापौर मॅडम जो उपाया योजना है वह में आपके माध्यमसे उसपे विचार करते हूए हम पानी बचत के लिए क्या क्या उपाययोजना करके लोगो मे जनजागृती लाके कार्य करेंगे तो निश्चित लाभ होगा बाकी कूदरत के आगे हम कुछ नही कर सकते। आपसे एक बिनती है की स्टेम और एम आय डी सी की कटौती एक दिन में की जाऐ क्योकी अलग अलग करने के कारण हमे हप्ते में ३ दिन ही पानी मिलता है इसके लिए आप उचित कार्य करे और इसके लिए आपको सोशल मिडीयो जनजागृती करनी चाहिए और लोगो को आव्हान करना पडेगा जनता को मालूम नही की कितनी कटौती होती है उसमे जनजागृती करनी चाहिए और पाणी की बचत कैसी की जाए उसका प्रसार सोशल मिडीयासी करना चाहिए ऐसा मेरा आपसे निवेदन है।

मा. महापौर :-

सध्या पाण्याचे आगमन लांबल्यामूळे संपूर्ण महाराष्ट्रभर पाणी टंचाईचे संकट उभे आहे. धरणामधील पाणी साठा कमी झाल्याने पाणी पुरवठ्यावर खूप मोठा ताण निर्माण झाला असून भविष्यात परिस्थती गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ह्या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करायची गरज आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून होणाऱ्या पाणी पुरवठया बाबत लोकांमध्ये जनजागृती करण्यात यावी. तसेच पाण्याचा दुरूपयोग टाळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात यावे. त्यामूळे पाणी वाचवणे बाबत सर्व नागरिकांना हा संदेश पोहोचविण्यात यावा तसेच मी प्रशासनाला विनंती करते की सद्यस्थितीत पाणी साठा शहरातील पाणी टंचाई लक्षात घेता पुढील आदेश मिळेपर्यत नविन नळ जोडणी मंजूर करतांना आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी. तसेच गॅरेज रिसोर्टस तरण तलाव, वाहन धुलाई केंद्र तसेच इतर व्यवसायिक आस्थापनाकडून होणाऱ्या पाण्याच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यात यावे. आपल्या शहरात जी २०% कपात झाली आहे त्याची माहिती नानेगांवकर साहेबांनी सदस्यांना द्यावी. तसेच स्टेम प्राधिकरणाची सभा २४ तारखेला ठेवली आहे त्या सभेमध्ये मिरा भाईंदरची जी कपात केली आहे ती कमी करण्याबाबत मी विनंती करणार आहे.

रवि व्यास :-

महापौर मॅडम जितने भी रेन वॉटर हार्वेस्टिंग के एन. ओ. सी. मनपा में विकासक द्वारा सबमीट की गई है उन सभीका ऑडीट और उनका प्रॅक्टीकल इंम्पलीमेंटेशन हो रहा है की नही हो रहा है ऐसा आदेश मा. आयुक्त संबधीत

विभाग को देंगे तो शहर में सहायता होगी इसके बारेमे मेने मा. आयुक्तको पत्र भी दिया है। उसका मुझे जवाब नही मिला।

मा. महापौर :-

आयुक्त साहेब सभागृह नेत्यांनी जो विषय मांडला त्याचे उत्तर देण्यात यावे आणि त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

शर्मिला बगाजी :-

महापौर मॅडम हा विषय खूप गंभीर आहे. भगवती शर्मानी बऱ्याच उपाययोजना सांगितल्या. परंतू मला त्याच्यात ॲड करावेसे वाटते ही समस्या दरवर्षी वाढत जाणार आहे. त्यासाठी आपण उपाययोजना करणे गरजेचे आहे. कारण आपण पूर्णपणे बाहेरच्या शहरावर अवलंबून आहोत. उत्तन, पेणकरपाडामध्ये अनेक तलाव आहेत तर आपल्या शहरामध्ये ज्या इमारती बनतात त्यांना आपण टँकर द्वारे पाणी पुरवठा करतो. त्याच्यासाठी आपण हे जे तलाव आहेत त्याच्यात मे अखेरपर्यत पाणी असते. अशा तलावामध्ये फिल्टरेशनचा प्लान्ट केला आणि त्या गोष्टीची आतापासून उपायायोजना केली तर आपल्याला थोड्या प्रमाणात सोय होईल आणि आपला जो पाणी येतो त्याचा भार थोडा कमी होईल.

शरद नानेगांवकर :-

मा. महापौराच्या परवानगीने मिरा भाईंदरमध्ये स्टेम प्राधिकरणाकडून आपल्याला ८६ एम एल डी रॉ वॉटर सॅक्शन आहे. इंटरनल वॉटर ८० आहे. एम आय डी सी कडून १२५ आहे त्यापैकी ११५ आपल्याला पाणी येते मुंबई मनपामध्ये दीढ एम एल डी आहे परंतु ५ इतके पाणी येते स्टेम कडून आता प्रत्येक आठवडयाला शटडाऊन होणार आहे बुधवारी रात्री १२.०० वाजता ते शुक्रवारी रात्री १२.०० वाजेपर्यत एम आय डी सी ४८ तास शटडाऊन घेणार आहे त्याचे आताच पत्र आलेले आहे. धरणामध्ये २२% पाणी शिल्लक आहे.

मा. महापौर :-

स्टेम प्राधीकरण आणि एम.आय.डी.सी. ला आपण सांगितले पाहिजे की त्या दोघांनी एकाच दिवशी शटडाऊन करावे.

लक्ष्मण जंगम :-

महापौर मॅडम आपण पाण्याच्या विषयावर बोलतो आपण नळाद्वारे पाणी देतो त्याच्यात आपण १०० लिटरवर चार्ज करतो की १००० लिटरवर चार्ज करतो तो वेगळा विषय आहे ज्या इमारतीला पाणी मिळत नाही त्यावेळी टँकरद्वारे पाणी पुरवठा करतो मला असे वाटते एका टँकरला त्याच्या प्रॉफिटसह ९६५ रू. आपण पावती देतो हे खर आहे का ?

शरद नानेगांवकर :-

हो.

लक्ष्मण जंगम :-

हे पाणी नळाद्वारे दिले तर ते पाणी ५० रू.चे असेल आणि टँकरद्वारे दिले तर एवढे पैसे होतात नागरिक आपलेच आहेत महापौर मॅडम मी तुम्हाला पत्र दिले आहे आणि मा. आयुक्तांना देखील पत्र दिले आहे. टाकीवर ज्याची नेमणूक झाली आहे ते टँकरद्वारे पाणी घेवून जातात ते पाणी ५० रू. पाणी आपल्याच नागरिकांना १००० रू. ला टँकर देतो तेच पाणी टँकरवाले १५०० रू.ला विकतात मी तुम्हाला झेरोक्स पाठवल्या आहेत तुम्ही चेक करा. अमर वॉटर सप्लायवाल्यांनी एका इमारतीमधून ६० ते ७०,००० रू. वसूल केले आहेत. ह्या पध्दतीने लोकांना जर भुर्दड होत असेल तर ही वाईट परिस्थिती आहे. एका बाजूला सांगताता ह्या शहरामध्ये अनधिकृत बांधकाम झाले नाही पाहिजे. तुम्ही खऱ्या अर्थाने सर्व्हे केला तर आपण २०% कनेक्शन अनधिकृत दिलेली आहेत नागरिकांनापाणी मिळत नाही म्हणून मा. आमदारांनी मा. मुख्यमत्र्याकडे तक्रार करायची की ह्या शहराला पाणी मिळाले पाहिजे नगरसेवकांनी लोकांची रोज बोलणी खायची तुम्ही अधिकाऱ्यांनी देखील खायची मी सर्व प्रशासनाला दोष देतो. वॉटर सप्लाय वाल्यांनी जी आगाऊ रक्कम वसूल केली त्याच्यावर काय कारवाई करणार ह्या इमारतीला पैसे परत देणार आहेत का ते ह्या सभागृहाला अवगत करा. येणाऱ्या काळामध्ये अनधिकृत कनेक्शन आहेत आपण जर एका साईडला अनधिकृत बांधकाम होवू नये ह्या साठी जी अत्यावश्यक वस्तू आहे पाणी ती जर चुकीच्या मार्गाने सप्लाय होत असेल तर नागरिक जर खऱ्या अर्थाने कर भरणार आहे त्याच्यावर तो भुर्दड येतो. ह्या विषयावर काय करणार आहेत ज्या ज्या ठिकाणी अनधिकृत कनेक्शन दिले आहेत त्यांच्यावर कारवाई करणार का त्याची माहिती देण्यात यावी.

भगवती शर्मा :-

शासन की तरफसे जो नोटीफिकेशन आता है आप हमेशा पानी कितना आता है वह डालते है। लेकीन नोटीफिकेशन भी आता है वह सन्मा. सदस्य तक पहूचना चाहिए। पानी के बारेमें हमारी स्थिती बिकट है हम लोगो को

पानी ऐसे ही नही दे पा रहे है। कोई अर्जन्सी हो तो टँकर देना चाहिए। मानसून जब तक नही आता तब तक यह टँकर बंद किया जाए मेरे को पानी नही आ रहा तो मेंने ऑनलाईन ॲप्लीकेशन किया.....

मा. महापौर :-

सभागृहाने ठरवायला पाहिजे की आपण हे करायचे की नाही मी आदेश देणार आहे सभागृहाचा ह्याच्यामध्ये काय निर्णय आहे.

भगवती शर्मा :-

जिस इमारत का ओ सी हो गया उनका पानी कनेक्शन नही हूवा उनको हम पानी देते थे और किसी इमारत मे धार्मिक कार्य हो तब हम टँकर का पानी देते थे। आज ऐसी स्थिती है ॲप्लीकेशन करो टँकर लेके जावो ।

विजया वैती :-

पाण्याबद्दल काही प्रॉब्लेम असेल ते आम्हाल व्हॉटसॲपवर रिडींग देतात मी त्यांना एक सुझाव दिला की आमच्या गावातल्या ज्या विहिरी आहेत त्या स्वच्छ व्हाव्यात. पाणी काढून नेतात त्याचा गाळ काढून स्वच्छ केल्या तर ते पाणी वापरू शकतो.

दिनेश जैन :-

स्टेम का पाणी आता है वह बाहरसे आता है एम.आय.डी.सी. का पाणी आता वह बाहरसे आता है। हमारे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस और लोकप्रिय आमदार नरेंद्र मेहता के प्रयत्नसे जो २१८ एम एल डी पानी आनेवाला है वह भी बाहरसे आनेवाला है। आज जो पूरे विश्व के अंदर जो ग्लोबल वॉर्मिग चल रही है अगर एक महिना बारीश डिले हो गया तो हमे फ्यूचर के लिए कूछ सोचना जरूरी है। तो हमारा खुदका धरण होना चाहिए आज हम धरण के लिए सोचते है तो ३-४ साल के बाद हमारा खुद का धरण होगा। तो हम हमारे नागरिक के लिए पानी उपलब्ध कर सकेंगे तो हमे इस विषय पे सोचना चाहिए।

मा. महापौर :-

पानी की कपात हो रही है उस विषय पे बात करनी है की हम उसपे क्या उपाययोजना कर सकते है। तसेच जंगम साहेबांनी जो विषय मांडलेला त्याच्यात तुम्ही काय करू शकता ते बघा.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम धन्यवाद चांगली लक्षवेधी ह्याठिकाणी आणलेली आहे. घर चालवायचे असेल तर उत्पन्न वाढवायला लागते किंवा बचत करावी लागते. त्यांनी बचतीचा मार्ग सांगितला त्यांनी जे उपाय सांगितले आहे त्याबाबत आपले ठराव झालेले आहेत मग हा प्रशासनाचा नाकरतेपणा आहे सोलर लावणे कंम्पलसरी आहे हे ओ सी मध्ये कंडीशन आहे. रेनवॉटर हार्वेस्टिंगपण लावण्याबाबत ओ सी मध्ये कंडीशन आहे ते मेन्टेन आहे की नाही ते कोणते डिपार्टमेंट बघते ती इमारत किती पाणी वापरते जर रेन वॉटर हार्वेस्टिंग असेल तर त्यांना ५% मालमत्ता करामध्ये सवलत देतो हे पणआहे. एकदा ओ.सी. मिळाल्यावर तो प्लान्ट बंद पालिकेचे त्याच्यावर कोणताही कंट्रोल नाही. कारण आपल्याला हे पाणी मिळते. काही वर्षापूर्वी आपण चेना मधील ५ एम एल डी प्लान्ट म्हणजे आपल्या शहरातील इनहाऊस जे पाणी मिळेल ह्या दृष्टीने प्रयत्न करणार होतो त्याचे काय झाले. शहरामध्ये ज्या ५५ विहिरी आहेत त्या मेंटेन करण्यासाठी आपण लाखो रू. खर्च केले आहेत त्यातून किती पाणी निघते आणि त्याचा वापर आपण कूठे करतो. शहरामध्ये जे तलाव आहेत. त्या तलावाची परिस्थिती काय आहे? मिरा भाईंदर शहर तलावाचे शहर म्हणून ओळखले जात होते.आपण त्या तलावाच्या मेंटेनससाठी करोडो रू. खर्च केले आहेत त्याचे पाणी फिल्टर करून आपल्याला कसे उपयोगात आणता येईल सिव्हरेज ट्रीटमेंट आपण पाणी रियूज करू शकतो. वृक्ष प्राधिकरण विभागाकडून मी माहिती घेतली ते बोलले ते पाणी आम्ही झाडालापण देवू शकत नाही झाड मरतात. मोठ मोठे प्रोजेक्ट आहेत त्याच्यात सिव्हरेज प्लान्ट कार्यरत असला पाहिजे ही कंडीशन आहे. आमच्याकडे कल्पतरू प्रोजेक्ट आहे कंडीशन होती त्याप्रमाणेचालू केला दोन वर्षानंतर बंद पालिकेला ट्रान्सफर कंडीशन काय होती की रिसायकल करून ते पाणी ते यूज करतील आज परिस्थिती काय आहे . आज उत्पन्न वाढविणे म्हणजे पाणी साठा वाढविण हाच पर्याय आपल्याकडे उरतो. नवि मुंबई महानगरपालिका जेव्हा हा मतदार संघ एक होता ५४ बेलापूर तत्कालीन पालकमंत्र्यानी एक कमिटमेंट केली होती की आम्हाला मोरवी डॅमचे पाणी येते त्यामुळे त्यांचा जो एम आय डी सी कडे २० एम एल डीचा पाण्याचा कोटा होता तो आपल्याला मिळणार होता त्याचा पाठपुरावा सुरू होता ते पाणी एम आय डी सी कडे स्पेअर आहे. नवि मुंबई मनपा हे पाणी वापरत नाही कारण त्याचा डॅम आहे त्यांना पाणी सफिशियंट आहे. ते पाणी मिळवण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे ह्या शहरामध्ये आपण जेव्हा म्हाडाला परमिशन दिले त्यावेळी मुंबई मनपा कंडीशन टाकली होती की ते आपल्याला पाचा एम एल डी पाणी देणार होते.म्हाडा झाल लोक राहायला आले परंतू आज आपल्याला एक ते दीड एम एल डी पाणी कसे तरी करू मिळते ते पाच एम एल डी पाणी आपण त्याच्यासाठी करोडो रू. खर्च केले आहेत ते पाणी मिळणे गरजेचे आहे त्यादृष्टीने आपले चांगले संबंध

असतील मुंबई महानगरपालिका आयुक्तांशी कम्युनिकेशन करुन ते पाणी आपल्याला घ्यायला पाहिजे जे आपण करु शकतो एमआयडीसी आणि स्टेम जवळून इतर महानगरपालिकांची परिस्थिती वेगळी आहे मुंबई मध्ये जरी ५ टक्के, १० टक्के पाणी कपात झाली तर ती पेपर न्युज होते आपल्याला ऑलरेडी पाणी कमी मिळत आहे आणि डीस्ट्रीब्यूशनचे गघा ४८ ते ५० तासा वर आपण पाणी देतो २१५ एमएलडी पाणीची गरज आहे ह्या ४८ तासामध्ये ४०० एमएलडी पाणी शहरामध्ये येत आहे मग ते पाणी कुठे जाते ? महापौर मॅडम, त्यांनी जो सुझाव दिलेला आहे कर्मशियल यांना कनेक्शन देवू का म्हणजे २ महिने बंद करा त्यातुन शाळा आणि हॉस्पीटल यांना वगळा कारण अहाकार शहरामध्ये माजेल मुलांना पाणी नसेल किंवा हॉस्पीटलमध्ये पाणी नसेल ह्या गोष्टींचा विचार करा २०० एमएलडी सुर्या डॅम प्रकल्प अजित पवार साहेब असते वेळी त्या महाविकास आघाडीच्या काळामध्ये सॅक्शन झालं ते अजून आपण आणू शकलो नाही.

मा. उपमहापौर :-

मिरा-भाईंदर पालिकेकडून सन २०२३ मध्ये करण्यात आलेल्या फेरीवाला सर्वेक्षणानुसार शहरातील ७,२२१ फेरीवाले पात्र आहेत तर ३,१५० फेरीवाले अपात्र ठरवण्यात आले आहेत. त्यावेळी एकूण फेरीवाल्यांची संख्या १३,४२७ इतकी नोंदवण्यात आली होती. त्यानंतर गेल्या काही वर्षात फेरीवाल्यांच्या संख्येत सुमारे 5 हजारांची वाढ झाली असावी. त्यामुळे शहरात सध्यास्थितीत एकूण १८ हजारांहून अधिक फेरीवाले कार्यरत असण्याची शक्यता आहे.

असे असताना, फेरीवाला शुल्क वसुलीचे काम बोली पद्धतीने कंत्राट मिळवण्यात आलेल्या ODS Protective Services Pvt. Ltd. कडून महापालिकेच्या निधीत दरमहा केवळ सुमारे एक कोटी रुपये जमा केले जात आहेत. जुन्या फेरीवाला पावतीनुसार २.५ चौरस मीटर जागेसाठी ८९ रुपये शुल्कानुसार पावती आकारल्यास १३ हजार फेरीवाल्यांसाठी दरमहा साडेचार कोटींचे उत्पन्न प्राप्त होणे अपेक्षित आहे. मात्र, सध्याच्या कंत्राटामुळे महापालिकेच्या उत्पन्नावर मोठा परिणाम होत असल्याची बाब गंभीर आहे.

मिरा-भाईंदर पालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती विचारात घेता, उत्पन्नाचे सर्व स्त्रोत अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. त्यामुळे फेरीवाला शुल्क वसुलीच्या विद्यमान कंत्राटाची संपूर्ण चौकशी करून ते महापालिकेच्या आर्थिक हितास बाधक आढळल्यास तात्काळ कंत्राट रद्द करण्यात यावे. तसेच फेरीवाल्यांकडून प्रत्यक्ष शुल्क वसुली करण्यासाठी प्रति फेरीवाला कंत्राटदारालेला सेवा शुल्क देण्याच्या तत्वावर निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

या बदलामुळे महापालिकेच्या उत्पन्नात दरवर्षी ४७ कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल प्राप्त होईल. पालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करून प्रशासनाने या विषयावर तातडीने निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी. त्यामुळे वरील विषयास महासभेची मान्यता देण्यात यावी, असा मी ठराव मांडत आहे.

शर्मिला बगाजी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव महोदय दोन ठराव आलेले आहेत मतदान करा.

महापालिका सचिव :-

प्रकरण क्र.३१ करीता दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव आहे सुचक श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदक श्री. अशोक तिवारी तसेच दुसरा ठराव आहे सुचक श्री. शॉन कोलासो आणि अनुमोदक श्रीम. शर्मिला बगाजी प्रथम मी दुसरा ठराव मतदानाला टाकत आहे. सुचक श्री. शॉन कोलासो यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी कृपया हात वर करावेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करावेत कृपया हात खाली घ्यावेत. सुचक श्री. सुरेश खंडेलवाल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करावेत कृपया हात खाली घ्यावेत ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करावेत.

मा. महापौर :-

सुचक सुरेश खंडेलवाल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ७२ विरोधात १६ तटस्थ ०० इतकी मते पडलेली आहेत श्री. सुरेश खंडेलवाल यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजुर करण्यात येत आहे, पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र ३१ :-

मा. महासभा ठराव क्र. ११, दि. १८/०२/२०२६ बाबत फेर विचार करुन निर्णय घेणे. दि. १ एप्रिल २०२६ पासुन बाजार फी वसुली दर कमी करणे व सद्यस्थितीत सुरु असलेल्या ठेक्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र. ३३ :-

मिरा भाईंदर शहरातील फेरीवाल्यांकडून वसुल करण्यात येणाऱ्या बाजार फी मध्ये दि. १८/०२/२०२६ रोजीच्या महासभेत फेरबदल करण्यात आले होते. फेरबदल केल्यानंतर बाजार फी वसूली करणाऱ्या ठेकेदाराने फेरबदल मान्य न केल्यास नवीन निविदा प्रसिद्ध करण्याकरीता मंजुरी दिली होती.

सदयस्थितीत बाजार फी वसुली करणारा ठेकेदार मे. ODS Protective Services Pvt. Ltd. यांनी मा. महासभेने पारीत केलेल्या ठरावानुसार कमी केलेल्या दराप्रमाणे बाजार फी वसूली करून महापालिकेने निश्चित केलेला मासिक हफ्ता मनपा फंडात जमा करण्याचे मान्य केल्याबाबत पत्र महापालिकेला दिले आहे. प्रशासनाने फेरविचारार्थ दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे सदयस्थित संबंधित ठेकेदाराकडून ठेक्याची मुदत संपेपर्यंत बाजार फी वसुली चालु ठेवण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. अशोक तिवारी

अ.क्र.	ठरावाच्या बाजूने	अ.क्र.	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१	मेहता डिंपल विनोद	१	आफरीन मुझफ्फर हुसेन सय्यद	निरंक
२	ध्रुवकिशोर मन्साराम पाटील	२	जय राजेंद्र ठाकूर	
३	अँड. रवि व्यास	३	अनिल दिवाकर सावंत	
४	सिंह मदन उदितनारायण	४	पाटील वंदना विकास	
५	भगवती तुगनचंद शर्मा	५	बगाजी शर्मिला विन्सन	
६	गेहलोत हसमुख मोहनलाल	६	शेख रुबिना फिरोज	
७	ज्योत्सना जालींदर हसनाळे	७	सौ.रुबिना फैजूल्ला शेख	
८	गोहील शानू जोरावरसींग	८	आयरिन पॉल कॉड्रस	
९	भानुशाली वर्षा गिरधर	९	रिजवाना अनवर खान	
१०	वंदना मंगेश पाटील	१०	सना खलील देशमुख	
११	तिवारी अशोक सुर्यदेव	११	डिमेलो फ्रिडा बर्नड	
१२	सिंग श्रीप्रकाश जिलेदार	१२	सुनिल चंपालाल चौधरी	
१३	भट दिप्ती शेखर	१३	तारेन वेंचर मेंडोन्सा	
१४	नयना गजानन म्हात्रे	१४	रफिक गुलाब पठाण	
१५	गणेश गोपाळ शेट्टी	१५	अशरफ अहमद मिस्त्री	
१६	प्रेमनाथ गजानन पाटील	१६	शॉन लिओ कोलासो	
१७	भोसले अनिल बाबुराव			
१८	सुरेश खंडेलवाल			
१९	मोहन गोपाळ म्हात्रे			
२०	जैन दिनेश तेजराज			
२१	भोईर जयेश वत्सला भानुदास			

२२	शाह राकेश रतिशचंद्र		
२३	स्नेहा शैलेश पांडे		
२४	अरोरा दिपीका पंकज		
२५	सिमा कमलेश शाह		
२६	गुप्ता कुसुम संतोष		
२७	पंकज पांडेय (दरोगा)		
२८	लक्ष्मण गणपत जंगम		
२९	थेराडे संजय अनंत		
३०	आनंद दत्ताराम मांजरेकर		
३१	दुबे मनोज रामनारायण		
३२	अनिल रवजीभाई विराणी		
३३	मयेकर रजनीकांत पांडुरंग		
३४	परेश जयंतीलाल शाह		
३५	परमार हेतल रतीलाल		
३६	जैन सुनिता रमेश		
३७	सुरेखा प्रकाश सोनार		
३८	भावसार वंदना संजय		
३९	बेलानी हेमा राजेश		
४०	वैती विजया हेमचंद्र		
४१	रुपाली शिंदे मोदी		
४२	तरुण सुभाष शर्मा		
४३	सावंत दिपक कल्याणराव		
४४	डोंगरे सचिन सुरेश		
४५	मनिष प्रितम पराशर		
४६	नवीन गुप्तेश्वर सिंह		
४७	विवेक महेंद्र उपाध्याय		
४८	संजय बाळाजी पवार		
४९	पारधी तुषार यशवंत		
५०	कोठारी भरतकुमार नथमलजी		
५१	विशाल जगन्नाथ पाटील		
५२	नीला सोन्स		
५३	करुणा किशोर पाटील		
५४	शर्मा मानशी रमेश		
५५	दिव्या प्रसाद परब		
५६	योगिता सतीशचंद्र शर्मा		
५७	प्रियंका करणीदान चारण		
५८	स्मिता विशाल पाटील		
५९	मेबल नोएल कोरीया		
६०	डॉ. भव्या पिपलिया (शाह)		
६१	आभा अमेय पाटील		
६२	किमया सुहास रकवी		
६३	विरकर आकांक्षा शंकर		
६४	यशोदा अनिल ताटे		
६५	जैन प्रिती चंद्रकांत		
६६	ॲड. श्रध्दा संदिप कदम		
६७	दत्ता जया रथीन		

६८	त्रिपाठी कविता सुशील		
६९	जाट प्रतिभा चंदु		
७०	ॲड. मयुरी सचिन म्हात्रे		
७१	कांबळी श्रध्दा सुधीर		
७२	मनस्वी प्रमोद पाटील		

ठराव बहूमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव :-

प्रकरण क्र. ३२, मनपा शाळांमध्ये डिजिटल क्लास रुम तयार करुन E-Learning द्वारे शिक्षण देणेकामी ई-निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

श्रध्दा कदम :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मराठी, हिंदी, गुजराती, उर्दू व सेमी इंग्रजी माध्यमाच्या एकूण ३६ शाळा कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी डिजिटल क्लासरूम व E-Learning प्रणाली प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने मनपा शाळांमध्ये एकूण किती वर्गखोल्या आहेत, सध्या किती वर्गांमध्ये डिजिटल क्लासरूम व E-Learning सुविधेद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते, कोणत्या इयत्तांतील विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ दिला जातो तसेच किती वर्गखोल्यांमध्ये डिजिटल क्लासरूमची सुविधा उपलब्ध करून देणे शिल्लक आहे, तसेच शाळा दत्तक योजना राबविण्याचा महापालिकेचा मानस आहे, त्या संदर्भात मिरा भाईंदर शहरातील नामांकीत शैक्षणिक संस्था यांच्यासमवेत बैठक झाली असून सर्वच शैक्षणिक संस्थांनी या उपक्रमास सकारात्मक भुमिका दर्शविली आहे. प्रशासनाने या संपुर्ण बाबींचा विचार करून डिजिटल क्लासरूम तयार करुन E-Learning द्वारे शिक्षण देणेकामीचा सविस्तर अहवाल व प्रस्ताव तयार करून माहितीसह फेर प्रस्ताव सादर करण्यास मा. महासभा मंजुरी देत आहे.

दिपीका अरोरा :-

माझे अनुमोदन आहे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम, याच्यामध्ये माझी एक सुचना आहे शिक्षण विभाग महाराष्ट्राचा आहे त्याच्यामध्ये ह्यासाठी डायरेक्ट आपल्या शाळेमध्ये फ्रीमध्ये ई-लायब्ररी करुन देत आहेत तरी आपल्याला शिक्षण विभागाला सांगायला पाहिजे की तिकडे आयुक्तांनी शासनाकडे जर विनंती केली तर आपला हा खर्च वाचू शकतो.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम आमचा ठराव आहे, एकाबाजूला आपण पालिकेतील शाळेमधील मुलांना चांगले शिक्षण मिळावे अत्यधूनिक शिक्षण मिळावे ह्या साठी आपण प्रयत्नशिल आहात आपण व्यक्तिश: हा जो प्रस्ताव प्रशासनाने दिलेला आहे त्याच्यामध्ये सविस्तर माहिती आहे कशा प्रकारे करणार आहात काय करणार आहात किती शाळांमध्ये करणार आहेत कुठचा रुट करणार आहेत याची माहिती आपण शिक्षण विभागाला बोलवून आपण स्व:त घेऊ शकतो. ही मंजुरी दिल्या नंतर आपण लगेच काही खर्च करणार नाहीत ती माहिती आपण घेऊ शकता पण ह्यायोगे आपण हा जो प्रस्ताव आपण फेर सादर करायला सांगत आहोत हा टाईम कंझूमिंग आहे आणि विद्यार्थांना त्या ई-लर्निंग शिक्षणा पासून कुठेतरी आपण वंचित ठेवणार आहोत. प्रायव्हेट शाळा व्हिजीट करतील आपला प्रस्ताव देतील ही नंतरची गोष्ट आहे तो सुध्दा वेळकाढू पणाच आहे पण जर महानगरपालिका तयार असेल अशा प्रकारे ई लर्निंगची फॅसिलिटी आपल्या विद्यार्थांना द्यायलात तर आपण त्यांना ती मान्यता द्यायला पाहिजे असे आमचे स्पष्ट मत आहे. आणि त्याअनुषंगाने आम्ही ठराव करत आहोत.

मा. उपमहापौर :-

सावंत साहेब, जो प्रस्ताव आला होता तो ऐज्यूकेशन डिपार्टमेंट, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, ह्या लोकांशी कोऑर्डीनेशन करुन हा परफेक्टली प्रस्ताव दिला होता. माहिती व तंत्रज्ञान विभागाने दिला होता ह्या दोघांचे कोऑर्डीनेशन होते म्हणून महापौर मॅडमने सांगितले की तूम्ही एकत्र बसा की वर्गात आपले डिजीटल क्लास रुम लागलेले आहेत किती वर्गात नादुरुस्त झालेले आहेत आणि किती वर्गात आपल्याला लावायचे आहेत याचे संपुर्ण

व्यवस्थिती स्टडी करुन मग तुम्ही एकत्र बसा आणि काम करा म्हणून महापौर मॅडमने हा प्रस्ताव आपण फेरसादर करायला सांगितलेला आहे.

अनिल सावंत :-

कूठला गोषवारा प्रशासन सविस्तर देतो साहेब ?

मा. उपमहापौर :-

म्हणून तर आम्ही फेरसादर करण्यासाठी सांगितले आहे.

अनिल सावंत :-

आम्ही काय करतो ठरावामध्ये ह्याला मान्यता देत आहोत आणि महापौरांना अधिकार देत आहोत की त्यांनी शिक्षण विभाग, आयटी विभाग ह्यांना लवकरात लवकर बोलावून ह्या खर्चाला आम्ही मान्यता देत आहोत आणि लवकरात लवकर ती फॅसिलीटी चालू करा परत फेरप्रस्ताव नको.

मा. महापौर :-

नक्की.

अनिल सावंत :-

मग ठराव मागे घ्या ?

मा. उपमहापौर :-

तशी तुम्ही सुचना द्या.

अनिल सावंत :-

मान्यता द्या आणि महापौरांना अधिकार द्या विषय संपला परत फेर प्रस्ताव कशाला एका महिन्यामध्ये महासभा लागणार त्याच्या नंतर प्रस्ताव येणार त्यापेक्षा.....

मा. महापौर :-

हा विषय आला त्यावेळी शिक्षण विभागातून जे अधिकारी आहेत ते म्हणतात की आमचा शिक्षणचा विषय आहे आणि ह्याठिकाणी त्या लोकांनी कसा मांडला म्हणून तो विषय आम्ही मांडणार म्हणून त्या ठिकाणी त्या एक दुसऱ्यांना कोऑर्डीनेट केले नाही विषय सांगितला नाही म्हणून आपण ह्या ठरावात असे म्हटलेले आहे की त्याच्यामध्ये सविस्तर प्रस्ताव फेरसादर करावा हाच विषय आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, तुमच्यावर आमचा पुर्ण विश्वास आहे म्हणून आम्ही ह्या खर्चाला मान्यता देत आहोत आणि त्या दोन्ही डिपार्टमेंटला तुम्ही बसवा आणि तो ताबडतोब त्याचे इम्प्लीमेंटेशन करा एवढच आम्ही सांगतो तुम्हाला पुर्ण अधिकार आहेत.

मा. उपमहापौर :-

दिनेशजी यांनी चांगला प्रस्ताव दिला की शासनाकडून पण आपल्याला ई-लॅब्ररीसाठी फंड मिळत आहे. जी शाळा दत्तक योजना आपण करता आहोत महापौर मॅडमने जी बैठक बोलवली होती त्याच्यामध्ये भरपूर प्रिंन्सीपल आणि शाळेचे संचालक आले होते त्यांनी सांगितले की आमच्या सीएसआर फंडामधून सुध्दा आम्ही चांगला क्लासरुम तयार करुन महापालिकेला देवू शकतो आणि म्हणून महापौरांनी सांगितले की एकत्रित सगळ्यांनी बसा आणि त्या प्रमाणे आपण निर्णय घेऊ अन्यथा आपला पैसा वेस्ट जाणार नाही पाहिजे आपल्या पैशाची बचत झाली पाहिजे म्हणून आपण हे करत आहोत.

अनिल सावंत :-

मग तस ठरावामध्ये म्हणा तुम्ही ?

मा. उपमहापौर :-

त्याच्यामध्ये म्हटले आहे शाळा दत्तक योजना सीएसआर सर्व म्हटलेले आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजुर पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ३२ :-

मनपा शाळांमध्ये डिजिटल क्लास रुम तयार करुन E-Learning द्वारे शिक्षण देणेकामी ई-निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्र. ३४ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मराठी, हिंदी, गुजराती, उर्दू व सेमी इंग्रजी माध्यमाच्या एकूण ३६ शाळा कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी डिजिटल क्लासरूम व E-Learning प्रणाली प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने मनपा शाळांमध्ये एकूण किती वर्गखोल्या आहेत, सध्या किती वर्गांमध्ये डिजिटल क्लासरूम व E-Learning सुविधेद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते, कोणत्या इयत्तांतील विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ दिला जातो तसेच किती वर्गखोल्यांमध्ये डिजिटल क्लासरूमची सुविधा उपलब्ध करून देणे शिल्लक आहे, तसेच शाळा दत्तक योजना राबविण्याचा महापालिकेचा मानस आहे, त्या संदर्भात मिरा भाईंदर शहरातील नामांकीत शैक्षणिक संस्था यांच्यासमवेत बैठक झाली असून सर्वच शैक्षणिक संस्थांनी या उपक्रमास सकारात्मक भुमिका दर्शविली आहे. प्रशासनाने या संपुर्ण बाबींचा विचार करून डिजिटल क्लासरूम तयार करुन E-Learning द्वारे शिक्षण देणेकामीचा सविस्तर अहवाल व प्रस्ताव तयार करून माहितीसह फेर प्रस्ताव सादर करण्यास मा. महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- ॲड॰ श्रध्दा कदम अनुमोदन :- श्रीम. दिपीका अरोरा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव :-

प्रकरण क्र. ३३, मिरा भाईंदर महानगरपालिका मनपा. मुख्य कार्यालय इमारत व प्रभाग कार्यालय १ ते ६ इमारत, मनपा शाळा व मनपा इतर इमारती मधील दैनंदिन साफसफाई (हाऊस किपींग) करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबत.

वंदना पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिका मनपा. मुख्य कार्यालय इमारत व प्रभाग कार्यालय १ ते ६ इमारत तसेच मनपा. शाळा व मनपाच्या इतर इमारती मधील दैनंदिन साफसफाई (हाऊस किपींग) करणेकामी निविदेची मुदत दि.१३/०३/२०२६ रोजी संपुष्टात येणार होती. मुदत संपण्यापुर्वी प्रशासनाने नवीन निविदा प्रकिया करणे गरजेची होती पण तसे केले नाही, प्रशासनाने या कामात विलंब करुन संबधित ठेकेदारास सहकार्य केले.

तसेच सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेकामी दि.२७/०३/२०२६ रोजीच्या महासभेत ठरावाव्दारे आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली होती. आजतागायत प्रशासनातर्फे निविदा प्रक्रिया पुर्ण झाली नाही. सदरचे काम अत्यावश्यक सेवेत येत असताना प्रशासनातर्फे दिरंगाई झाल्याची पुन्हा दिसून येत आहे. नवीन निविदा प्रक्रिया लवकरात लवकर आणि युद्धपातळीवर पूर्ण करण्याबाबत तातडीने कार्यवाही करणेस ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम ह्या विषयावर आमचा ठराव आहे एक तर त्या ठरावामध्ये जी मुदत म्हटलेली आहे १३/०६/२०२६ ला मुदत संपत आहे ती ॲक्च्यूअली गोषवाऱ्यामध्ये १३/०३/२०२६ आहे नक्की कधी ठेका संपलेला आहे ?

मा. महापौर :-

नक्की काय आहे, १३/०३/२०२६ ठिक आहे.

अनिल सावंत :-

मॅडम आपण २७ मार्च ला ठराव करुन त्याची ऑलरेडी मुदत संपलेली आहे फेर निविदा सादर करावी असा ठराव पास झाला त्याला आज ३ महिने झाले ह्या ३ महिन्यामध्ये हा स्वच्छतेचा अत्यावश्यक सेवेची निविदा प्रक्रिया पुर्ण का होऊ शकली नाही का परत परत आपल्याला मुदतवाढ द्यावी लागते ? प्रशासनाने याचे उत्तर द्यावे काही तरी बांधिलकी आहे की नाही प्रशासनाची महासभेचा ठराव झाल्या नंतर ३ महिने झाले हाऊस किपींग त्याची मुदत संपलेली आहे आता त्याला आपण मुदतवाढ देत आहोत मग महासभेने ठराव केल्या नंतर ह्या ३ महिन्यामध्ये प्रशासनाने ते का केले नाही निविदा प्रक्रिया का पुर्ण केली नाही म्हणजे त्यांना मुदत किती पाहिजे ? ठराव झाल्या नंतर निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी प्रशासनाला किती मुदत पाहिजे हे एकदा कळू दे.

मा. महापौर :-

अधिकाऱ्यांना बोलवा त्या विषयाचे त्यांना उत्तर द्या.

अनिल सावंत :-

प्रत्येक वेळी आम्ही ठराव करायचे प्रशासन काही कारवाई करणार नाही परत आम्ही मुदतवाढ द्यायची त्याच्यावर चर्चा होणार.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

सन्मा. महापौर सन्मा. सभागृह हाऊस किपींग कामाचा मागे जो ठराव झाला त्यावेळेस मुदतवाढ आणि नविन निविदा प्रक्रिया करणे कामी आपण त्यावेळेस सादर करण्यात आले होते परंतु त्यावेळी नविन निविदा प्रक्रिया करणेस मंजुरी दिली परंतु मुदतवाढला मंजुरी त्यावेळेस भेटलेली नव्हती आपली मुदत ही १३ मार्च २०२६ ला संपलेली आहे. आणि त्यानंतर आपण आता निविदा प्रक्रिया केलेली आहे त्यानंतर टेक्निकल सॅक्शन घेणे रेट मागविणे हे काम करताना आपण १० जून ला ऑलरेडी निविदा प्रसिध्द केलेली आहे ती निविदा अंतीम होईपर्यंत आपण आहे त्याच जे काही कंत्राटदार आहेत त्यांनाच ते काम आत्ताची निविदा अंतीम होईपर्यंत त्यांना मुदतवाढ मागितलेली आहे.

अनिल सावंत :-

महासभेचा ठराव झाल्या नंतर तुम्हाला किती वेळ अपेक्षित आहे निविदा प्रक्रिया पुर्ण करायला ? हा एकच विषय मी म्हणत नाही.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

१०/०६/२०२६ ला आपण आता दिलेली आहे मध्ये मॉडल कोर्ड ऑफ कंडक असल्यामुळे आपण ती पब्लिश करु शकलो नव्हतो.

अनिल सावंत :-

ते तर संपले ती निवड बिनविरोध झाली.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

एक ते दिढ महिन्यामध्ये १०/०६ ला आपण लगेच पब्लिश केली.

अनिल सावंत :-

त्याच्या अगोदर आपण का केली नाही ? तुम्हाला आचारसहिता कधी लागली ?

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

त्याला टेक्निकल सॅक्शन घ्यायला त्याच्यात वेळ गेला त्याच्यामध्ये त्याचे रेट मागविणे, कोटेशन मागवणे.....

अनिल सावंत :-

महासभेची मंजुरी झाल्या नंतर तुम्हाला टेक्निकल सॅक्शन कलेक्टरचे घ्यावे लागते का ?

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

सिटी इंजिनियरकडून आपण घेतो पंरतु याच्यामध्ये काही जे रेट असतात ते आपले समजा मटेरीयल आहे.

अनिल सावंत :-

त्याचे तर स्टँडर्ड रेट ठरलेले असतात ते तुमच्याकडे पाहिजे.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

जे कोटेशन आपण घेत असतो त्याच्यामध्ये आपल्याला ते घेतल्या नंतर पुन्हा आचारसहिता लागल्यामुळे ते थांबले होते आता आपण त्याला दिलेले आहे.

अनिल सावंत :-

साहेब, हे जे रेट आहेत मला सांगा हाऊस किपींग मध्ये कुठचे कुठचे रेट तुम्ही बघितले आहेत ?

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

त्याच्यामध्ये मेजर लेबरचे अनस्कील रेबरचे मिनिमम व्हेजेस नुसार जे रेट आहेत ते रेट आहेत त्यानंतर जे मटेरीयल लागते हाऊस किपींग कामी त्याच्यामध्ये तुमचा झाडू असेल, फिनाईल असेल बरेच आहेत २० प्रकारचे मटेरीयल आहेत.

अनिल सावंत :-

ते रेट काय प्रत्येक महिन्याला आपण १५ दिवसाला रेट चेंज होत राहतात का ?

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

बदलले तरी आपल्याला कोटेशन करुनच मंजुर करुन घ्यावे लागतात डायरेक्ट आपण ओपन मार्केट मधले रेट तसे घेणार नाही.

अनिल सावंत :-

मार्केट मधले नाही साहेब त्यामध्ये तूम्ही म्हणता कलेक्टर परमिशन तर त्यांचे टेंडर रेट ठरलेले असतील ना अन स्कील लेबर्सचा एवढा रेट.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

त्यांचा विषय नाही.

अनिल सावंत :-

साहेब अत्यावश्यक सेवा आहे काय झाले आहे की महापौर मॅडम ह्या अडीच वर्षा मध्ये प्रशासन सुस्त झालेले आहे सगळ आरामशीर करायचे महानगरपालिकेने तुम्हाला एवढा ठराव करुन दिला तरी सुध्दा त्याच्यावर तुम्ही कार्यवाही करत नाही मुदतवाढ घेता मग तिथे कूठे संशयाचे वातावरण पेरले जाते. तुम्ही तुमची काम करत नाही इथे आम्हाला वेगळा विषय मांडावा लागतो पुढच्या वेळी काळजी घ्या आणि ताबडतोब ही निविदा प्रक्रिया सुरु करा. आता तुमची पेपर नोंटीस निघाली मग ही निविदा प्रक्रिया कधी पर्यंत पुर्ण होईल ?

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

१ महिन्यात पुर्ण होईल.

अनिल सावंत :-

पुढच्या महासभेच्या अगोदर ?

मा. महापौर :-

आपण प्रयत्न करावे की लवकरात लवकर ते पुर्ण व्हायला पाहिजे.

अनिल सावंत :-

मॅडम, प्रयत्न नाही ६० टक्के खर्च वाढला आहे आस्थापनाचा खर्च ४२ टक्के गेला आहे त्यांना काम करु द्या जरा. तुम्ही आदेश द्या प्रयत्न नाही.

मा. महापौर :-

नक्की.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम, याच्यामध्ये सुपरवाईजरचे प्रत्येक नागरीका वरती ९७ रुपये देतात हे यांनी अजुन सांगितले नाही. ह्या ठरावाची कॉपी माझ्याकडे आहे. याच्यामध्ये ९७९ रुपये मिनिमम व्हेजेस आहेत ५० रुपये यांचे मटेरीयलचे आहेत आणि ९८ रुपये पर परसन वरती सुपरवाईजर ठेवलेले आहेत म्हणजे हे टोटल ११२७ रुपये एका माणसाला देतात आणि ९७ टोटल माणस आहेत सफाई साठी परंतु प्रभाग कार्यालयाला सफाई होत नाही फक्त सकाळी पोछा मारतात आणि कुठे जातात माहित नाही मी जिकडे प्रभाग समितीमध्ये बसतो तिकडे बाहेर बऱ्याच वर्षा पासून डेब्रीज पडलेले आहे आज ३ महिने तिकडे साफसफाई होत नाही. एवढे आपले ४ कोटी रुपये जे आहेत ते फुकटचे जातात म्हणून हा ठराव केलेला आहे ते पण प्रॉपर आहे चांगली कंपनीला व्यवस्थित तुम्ही द्या आणि सर्व अटीशर्तीचे पालण करुन द्यावे.

रिजवाना खान :-

महापौर मॅडम, अनूमती से मे अपनी बात रखना चाहती हूँ, मे प्रभाग-९ की नगरसेविका हूँ, मे इस विषय पे सदन को सुचित करना चाहती हूँ, की मा. विशेष महासभा दि.२७/०३/२०२६ का प्रस्ताव क्र.३२ के अनुसार संबंधित कार्य की नई निविदा जारी करने के साथ साथ ४ करोड रुपये की आर्थिक ऐवं प्रशासनीक मंजुरी दी गई है ऐसा होने के बावजूद क्या पालिका को नया टेंडर निकालने के लिये कोई शुभ महूरत ही नही मिला क्योकी इसके पहले भी सार्वजनिक शौचालय की दैनिक साफसफाई के लिये इन ठेकेदार को लगातार मुदतवाढ दे कर काम सौपा जा रहा है लेकीन जब नई निविदा निकालने की बात आती है तो पालिका को कोई महूरतही नही मिलता है यह अत्यंत गंभीर मामला है इस विषय पर मे मा. आयुक्त महोदय से कहना चाहती हूँ की आप इस मुदतवाढ को तत्काल रोके और...

मा. महापौर :-

मै आपकी भावना समज गई हूँ आप क्या कहना चाहती है आयुक्त साहब सर्वांच्या वतीने आपण ह्या ठिकाणी हाऊस किपींगसाठी किती खर्च करतो परंतु सर्वांचेच ह्या ठिकाणी म्हणणे आहे की ते लोक व्यवस्थित काम करत नाही आपण सर्वांना निर्देश द्यावेत की तूम्ही व्यवस्थित काम करावे. दिनेश जैन यांनी मांडले की त्यांचे प्रभाग समितीचे कार्यालय आहे त्याची व्यवस्थित साफसफाई होत नाही असे बऱ्याच नगससेवक नगरसेविकांचे मुद्दे आहेत

ह्याठिकाणी त्यांनी प्रॉपर काम करायला पाहिजे त्याठिकाणी त्या लोकांनी साफसफाई करायला पाहिजे. आपण ह्या ठिकाणी एवढा खर्च करतो तसे काम त्यांचे दिसत नाही तर आपण ह्या ठिकाणी मुदतवाढ देत असताना त्यांना निर्देश द्यायला पाहिजे आयुक्त साहेब.

नयना म्हात्रे :-

महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलते माझ्या वॉर्डामध्ये २२ आणि ३३ नंबर शाळा आहे त्याठिकाणी एवढी मोठी शाळा आहे दोन तीन माळ्याची शाळा आहे त्याठिकाणी एकच माणूस साफसफाईला आहे ती एवढी मोठी इमारत ती बाई साफ करु शकत नाही तर त्याच्यासाठी बांगर साहेबांनी तिकडे माणस वाढवून द्यायला पाहिजे तरच ती साफसफाई होईल नाही तर होणार नाही.

मा. महापौर :-

मी सर्वांच्या वतीने आयुक्त साहेबांना निर्देश दिलेला आहे सर्व ठिकाणी अशा प्रकारे करा ज्याठिकाणी जास्त लागेल त्याठिकाणी हाऊसकिंपींग द्या ज्याठिकाणी कमी लागेल त्याठिकाणी कमी ठेवा व्यवस्थित पणे त्यांनी काम केले पाहिजे आपण ह्याठिकाणी एवढे पैसे खर्च करतो त्यांनी चांगल्या प्रकारे साफसफाई केली पाहिजे.

अनिल भोसले :-

परिसर खुप वाढला आहे कर्मचारी कमी आहेत त्यामुळे साफसफाईला खुप अडचण होत आहे आयुक्त महोदयांकडे पण बऱ्याचशा तक्रारी त्यामध्ये ठोस निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर :-

हा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

नयना म्हात्रे :-

महापौर मॅडम, आपण ज्या स्मशान भूमीचे उद्घाटन केले आहे त्याठिकाणी कर्मचारी दिलेले नाहीत बांगर साहेब आहेत म्हणून मी विषय काढला ह्या गोष्टीला दोन महिने झाले.

जयेश भोईर :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो आपण आदेश दिला होता की अतिक्रमण तोडायला पाठवा कोणी गेले नाही तिथून प्रभाग अधिकारी बोलतात की हेरींग घ्या आज हेरींगचा विषय कसला आला.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब उत्तर देतील.

मा. आयुक्त :-

ह्या बाबत मी ॲडीशनल श्री. पानपट्टेंना बोलवतो. तुम्हाला बारकाईने डिटेल्स उत्तर देतील. नंतर मी तुम्हाला सांगतो.

जयेश भोईर :-

साहेब ह्या गोष्टीला दोन महिने झाले.

प्रकरण क्र. ३३ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका मनपा. मुख्य कार्यालय इमारत व प्रभाग कार्यालय १ ते ६ इमारत, मनपा शाळा व मनपा इतर इमारती मधील दैनंदिन साफसफाई (हाऊस किपींग) करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबत.

ठराव क्र. ३५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका मनपा. मुख्य कार्यालय इमारत व प्रभाग कार्यालय १ ते ६ इमारत तसेच मनपा. शाळा व मनपाच्या इतर इमारती मधील दैनंदिन साफसफाई (हाऊस किपींग) करणेकामी निविदेची मुदत दि.१३/०३/२०२६ रोजी संपुष्टात येणार होती. मुदत संपण्यापुर्वी प्रशासनाने नवीन निविदा प्रकिया करणे गरजेची होती पण तसे केले नाही, प्रशासनाने या कामात विलंब करुन संबधित ठेकेदारास सहकार्य केले.

तसेच सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेकामी दि.२७/०३/२०२६ रोजीच्या महासभेत ठरावाव्दारे आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली होती. आजतागायत प्रशासनातर्फे निविदा प्रक्रिया पुर्ण झाली नाही. सदरचे काम अत्यावश्यक सेवेत येत असताना प्रशासनातर्फे दिरंगाई झाल्याची पुन्हा दिसून येत आहे. नवीन निविदा प्रक्रिया लवकरात लवकर आणि युद्धपातळीवर पूर्ण करण्याबाबत तातडीने कार्यवाही करणेस ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. वंदना मंगेश पाटील **अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव :-

प्रकरण क्र. ३४, मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१९ मध्ये बदल करणेबाबत.

मा. उपमहापौर :-

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो, महापालिकेचा जो सेवा प्रवेश आहे आकृतीबंध आहे सेवा प्रवेशामध्ये नियुक्ती करताना प्रशासनाने अनेक चुकीच्या नियमबाह्य पध्दतीने पदोन्नती दिलेली आहे. काही अधिकारी जे आहेत ते पात्र नाहीत अपात्र आहेत पण त्यांना सुध्दा पदोन्नती दिलेली आहे आणि जे अपात्र अधिकारी आहेत साहेब त्यांना पण वरच्या पदावरती देवून ज्या पदावरती योग्य अधिकारी आहेत पात्र अधिकारी त्यांना डावललेलं आहे म्हणजे नियमबाह्य पध्दतीने अनेक कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे.काही कर्मचारी जे आहेत त्यांना हेतूपुरस्कर डावलण्यात आले आहे आणि याच्यामध्ये कसे आहे की २० वर्ष सेवाकाळ पुर्ण झालेला आहे काही लोकांचा काही लोक २० वर्ष २५ वर्ष १५ वर्षा पासून सेवा करतात परंतु त्यांना आजही पदोन्नती नाही ते त्याच पदावरती काम करत आहेत. काही अधिकारी वेतन श्रेणी त्या वरच्या पदाची घेतात पण त्यांना काम कुठले करायचे आहे खालच्या पदावरती मग साहेब त्यांना वेतन श्रेणीचा फायदा काय ? त्यांना वेतन श्रेणी पण लागु होऊ शकते त्यांना पदोन्नती पण लागू होऊ शकते परंतु त्यांना पदोन्नती दिलेली नाही. साहेब शासनाचा जीआर आहे ०७ मे २०२१ त्याच्यामध्ये क्लियर कट म्हटलेले आहे की २५/०५/२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजी झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवा जेष्ठते नुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील परंतु महापौर मॅडम, प्रशासनाने ह्या जीआर चे सरळ सरळ उल्लंघन केलेले आहे. महापालिके तर्फे अधिकाऱ्यांची अंतीम सेवा जेष्ठता यादी तयार केलेली आहे त्याच्यामध्ये त्या अधिकाऱ्यांची नाव सुध्दा आहेत कर्मचाऱ्यांची नाव आहेत पण त्याच्यामध्ये कर्मचाऱ्याला डावलून त्याचा क्रम डावलून खालच्या अधिकाऱ्याला पदोन्नती दिलेली आहे आणि एक तेवढा सिनियर अधिकारी आहे त्याचा गोपणीय अहवाल प्रशासनाने प्रशासनाच्या अधिकाऱ्याने दिलाच नाही त्याच्यामुळे त्याला पदोन्नती भेटली नाही त्याचे खालचे लोक होते ते वरच्या पदावरती बसले. मॅडम, विभागीय चौकशीची कार्यवाही पुर्ण झाली काही लोकांची पण तरी सुध्दा त्यांची पदोन्नती झाली नाही. आणि काही लोकांची कार्यवाही चालू आहे आणि त्यांना पदोन्नती दिलेली आहे म्हणजे एकच नियम दोन्ही अधिकाऱ्यांना वेगळे लावण्यात आले आहेत. आयुक्त साहेब ह्या सेवा जेष्ठता यादीमध्ये सुध्दा काही खालच्या लोकांना वरती टाकले वरच्या लोकांना खाली टाकले आणि अजून पर्यंत काही लोकांना पदोन्नती पण दिलेली नाही. तसेच साहेब एक जीआर आहे २३ ऑगस्ट २००४ कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना महापालिकेत कायमस्वरुपी सामावून घेणे म्हणजे जवळ जवळ १२ लोकांना कायस्वरुपी सामावून घेतलं आणि शासन निर्णय मध्ये शासनाने अट टाकली की ह्यापुढे मिरा भाईंदर महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता तसेच इतर संवर्गातील पदांवर कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात येवू नये तसे केल्यास आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका हे व्यक्तिश: जवाबदार असतील म्हणजे एवढ क्लियर कट जीआर मध्ये असून सुध्दा पालिकेने प्रशासनाने आणि आयुक्ताने कार्यवाही नाही केली अनेक लोक कंत्राटी पध्दतीने नियुक्त केले आणि जसा आस्थापना खर्च वाढला यामध्ये हे पण चालू झाले आहे. प्रत्येक वेळी प्रशासन महापौर मॅडम, सांगते की जीआर आहे निर्णय आहे याच्या बदल आपण काही करु शकत नाही पण हा तर जीआर आहेना मग एवढ क्लियर कट जीआर असताना हे कस केलं. त्याच्या नंतर मॅडम आपण ठराव करतो त्याच्यावर सिरियल नंबर असतो अबकड असतं का परंतु एक असा ठराव आहे स्थायी समितीचा त्याच्यामध्ये १६६ (अ) नंबर चा ठराव आहे म्हणजेच आता सिनियर नगर सेवक आहेत त्यांना माहित आहे कधीही कोणताही ठराव अबकड चा नसतो त्या नंबरचा असतो पण त्याच्यामध्ये अ नंबर म्हणजे हा स्थायी समितीचा ठराव घूसवला. त्याच्या नंतर हाईट म्हणजे काय आहे मॅडम की हा जो ठराव आहे हा इतिवृत्तांत मंजुर करताना हा ठराव वगळून इतिवृत्तांताला मंजुरी दिली म्हणजेच हा ठराव ॲटोमेटीकली ॲबोलीश झाला आणि ह्याच ठरावाचा कोर्टामध्ये उदाहरण देवून कोर्टामध्ये ह्या ठरावाची कॉपी देवून त्या कर्मचारी अधिकाऱ्यांना प्रमोशन दिलं अणि त्या कर्मचारी अधिकाऱ्यांना जुना बॅकडेट इफेक्ट दिला. उदाहरण सांगतो दिनेश कानगुडे साहेब कॉंट्रॅक्ट पध्दतीने लागले समजा २००५ ला आणि ते परमनंट झाले २००९ ला तर त्यांची सेवा २००९ पासून केली पाहिजे तर ह्यांची सेवा २००५ पासून धरण्यात आली ४ वर्ष बॅकडेट गेला. परंतु कैलास आहे दुसरा अधिकारी तो पण तसाच लागलेला आहे कॉंट्रॅक्टमध्ये परंतु त्याला तो बॅकडेट इफेक्ट दिला नाही फक्त दिनेशची सेटींग चांगली होती म्हणून दिनेशला देण्यात आले हे उदाहरणा सहीत मी ते द्यायला तयार आहे महापौर मॅडम. त्याच्या नंतर १ मार्च २०१८ चा जीआर आहे त्या जीआर मध्ये विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्या पासून

सुट देण्या संदर्भीत तरतुदीमध्ये सुधारणा करण्या बाबत याच्यामध्ये क्लियरकट म्हटले आहे की जी अट ४५ वर्षाची होती ती ५० वर्षाची केली वयाच्या ५० वर्ष पुर्ण केल्या नंतर त्याला त्या विभागीय परिक्षे मधून सुट मिळू शकते हा जीआर दाबून जे लोक ५० वर्षाच्या खाली आहेत त्यांना हा बेनिफीट देवून त्यांना पदोन्नती दिलेली आहे. म्हणजे अशा प्रकारची अनेक उदाहरण आहेत. तुम्हाला आणखीन सांगतो मॅडम याच्यामध्ये की जो अपात्र आहे जो पदोन्नतीस पात्र नाही त्याने विभागीय परिक्षा दिली नाही त्यांचे दुसरे प्रॉब्लेम्स आहेत त्यांना सुध्दा पदोन्नती दिली. याचे इव्हीडन्स याच्यामध्ये आहेत बघा विभागीय परिक्षा उत्तीर्ण नाही परंतु त्या व्यक्तिला पुढचं पद दिले आहे. त्याच्या नंतर खालचा माणूस आहे तो वरिष्ठ पदासाठी लागणारी शैक्षणिक अहर्ता पुर्तता करीत आहे आणि विभागीय परिक्षा उत्तीर्ण नाही पण त्याला डावलले आहे. आणि त्याच्या खालच्या अधिकाऱ्याचं विभागीय परिक्षा उत्तीर्ण नाही आणि त्याला प्रमोशन दिलेले आहे म्हणजे अशा तऱ्हेच कामकाज ह्या महानगरपालिका प्रशासनाने सोयी नुसार केलेले आहे. काही लोक कामावरती नंतर लागली परंतू ते आज उच्च पदावरती आहे आणि काही लोक २० वर्ष पण त्याच पदावरती कार्यरत आहेत हा कुठेतरी काही कर्मचारी अधिकाऱ्यांवरती अन्याय झालेला आहे. आणि भेदभाव पण झालेला आहे तर माझी अशी विनंती आहे मॅडम की प्रशासनाने आज जो गोषवारा दिलेला आहे याच्यामध्ये आपल्याला बदल सुचविण्यासाठी सांगितलेला आहे परंतु जे अधिकारी आता मी दिनेश कानगुडे यांचे उदाहरण दिले होते परंतु मी आता फॅक्ट सांगतो की दिनेश कानगुडेना सचिव पदावरती पदोन्नती देण्यासाठी अजुनही ऑर्डर काढलेली नाही. किती महिन्यां पासून दिनेश कानगुडे प्रयत्न करत आहेत परंतु महापालिकेत असे काही कर्मचारी आहेत त्यांचा कालावधी काल संपला आणि आज लगेच पत्र की ह्यांची पदोन्नती झालेली आहे म्हणजे एवढे फास्ट काही लोकांवरती मेहरबानी केलेली आहे आणि काही लोकांवरती अन्याय केलेला आहे. असच एक प्रशांत जाणकर नावाचा पण इंजिनियर आहे त्यांच्यावरती पण अन्याय केलेला आहे तसेच एक श्रीकृष्ण मोहिते नावाचा पण इंजिनियर आहे त्याच्या वरती पण अन्याय केलेला आहे असाच एक यशवंत देशमुख आहे त्याच्या वरती पण अन्याय केला म्हणजे असे किती अनेक उदाहरण आहे. काही ऑडिट डिपार्टमेंट मधले पण माणसं आहेत तर काही आरोग्य विभागातील माणस आहेत आणि हाईड म्हणजे मॅडम एक तर वैदयकिय आरोग्य विभागामध्ये एक स्टाफ आहे त्या स्टाफ ला पदोन्नती देवून त्या स्टाफ ने जवळ जवळ १५ ते १६ लाख रुपयाचा फरक सुध्दा महानगरपालिकेतून घेतला आहे आणि अजूनही पदोन्नती करण्या करीता त्याच्यामध्ये बदल सुचविण्याकरीता चालू आहे म्हणजे अशा प्रकारचे कामकाज प्रशासनामध्ये चालू आहे. आणि याच्यामध्ये कधी कधी आपली जी निवड समिती आहे त्यांनी सुध्दा महापालिका प्रशासनाची दिशाभूल करुन चूकीची माहिती पुरविली आहे आणि त्या आधारे काही लोकांना पदोन्नती पण दिलेली आहे. तसेच मॅडम ह्या लोकांचे जे गोपणीय अहवाल आहेत हे अहवाल सुध्दा वरचे अधिकारी येतात पण कधी कधी काही लोकांचे अहवाल ते निगेटीव्ह करतात आणि काही लोकांचे अहवाल ते देत नाही म्हणून पदोन्नती देण्यास अडचण निर्माण होतात. तसेच तपासणी सुचीची पण अनुक्रमणीका असते त्याच्यात जो फॉर्म असतो त्या मध्ये सुध्दा जी पदोन्नती निवड समिती आहे त्या निवड समितीने माहिती प्रशासनाला खरी पुरवली नाही आणि त्याच्यामुळे काही अधिकारी कर्मचारी पदोन्नती पासून वंचित राहिलेले आहेत. काही लोकांना १०,२०,३० चा लाभ दिलेला आहे तर काही लोकांना १०,२०,३० चा लाभ दिलेला नाही तो म्हणजे काय जी १० वर्ष त्यांची सेवा पुर्ण झाली की त्यांना एक लाभ मिळतो २० वर्ष सेवा झाली की त्यांना दुसरा लाभ मिळतो परंतु काही ठिकाणी हा लाभ काही कर्मचाऱ्यांना दिलेला आहे पण काह कर्मचाऱ्यांना दिलेला नाही. आश्वासीत सेवा योजनेचा लाभ सुध्दा देतांना पण ह्या लोकांनी पैसे दिलेले आहेत म्हणजे अशा अनेक प्रकारच्या त्रूटी ह्या सेवा जेष्ठता यादीमध्ये, सेवाजेष्ठता नियमामध्ये म्हणा काही अधिकाऱ्यांवर अन्याय झालेला आहे आणि काही अधिकाऱ्याना सपोर्ट केलेला आहे. महापौर मॅडम माझी आपणास अशी विनंती आहे की याची चौकशी केली पाहिजे आणि जे बीचारे अधिकारी कर्मचारी त्यांच्या वरती अन्याय झलेला आहे त्यांना पदोन्नती लवकरात लवकर दिली पाहिजे आणि ज्या लोकांनी चुकीच्या शिफारशी केल्या आहेत चुकीची पदोन्नती घेतली चुकीचा लाभ घेतलेला आहे सेवा जेष्ठता यादीमध्ये त्यांचे नाव डावलण्यात आले आहे तर ह्याची तपासणी करुन संबंधितावरती कार्यवाही होणे अशी माझी आपणास विनंती आहे. जी माहिती दिली आहे ती अतिशय खरी आहे आणि याच्यामध्ये सगळे इव्हीडन्स आणि सगळे पुरावे आहेत. तर आपण चौकशी करण्या करीता संबंधितांना आदेश द्यावेत.

भगवती शर्मा :-

मा. महापौर मॅडम की परवानगी से मा. उपमहापौर साहब श्री. ध्रुवकिशोर पाटीलजीने इस विषय पे सविस्तर कब कब क्या घटना क्रम हूवा कब कब किन किन लोगो के साथ मे अन्याय किया, कैसे कायदा का दुरुपयोग किया इस विषय मे विस्तृत जाणकारी दिया है। वाकई यह गंभीर बात है की प्रशासन ने अंधेरे मे रखते हूये यह सब कार्य किये है और सबसे जादा कार्य मे बाता देता हू महापौर मॅडम यह जो प्रशासनिक काल जैसे बंपर होते है बंपर टाईप के अंदर

मे यह पदोन्नती वगैरे दि गई है। कभी कभी बिच मे सभागृह मे बात हूई थी इस विषय मे श्वेत पत्रिका भी जारी होनी चाहिये। क्योकी बहूत काम इन्होने ऐसे किये है प्रशासनिक कार्यकाल मे ठिक है मे ठराव पढता हूँ।

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये पदोन्नती संदर्भात नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमबाह्य पद्धतीने पदोन्नती देण्यात आलेली असून अनेक पात्र अधिकारी व कर्मचारी यांना हेतुपुरस्सर पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

निलंबनाच्या कार्यकाळात वेतन, भत्ते व फरक देताना भेदभाव करण्यात आलेला असल्याचे आढळून येते. तसेच पदोन्नती प्रक्रियेत वेगवेगळे व सोयीस्कर निकष लागू करून. विशेषतः श्री. दिनेश कानगुडे, श्री. यशवंत देशमुख, श्रीकृष्ण मोहिते, श्री. प्रशांत जानकर व इतर अधिकारी/कर्मचारी यांना अद्यापही पदोन्नती देण्यात आलेली नाही. काही कर्मचारी अनेक वर्षे एकाच पदावर कार्यरत असून इतरांना उच्च पदांवर नियुक्त करण्यात आलेले आहे, यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

निवड समितीमार्फत पदोन्नती देताना चुकीचे अहवाल सादर करून प्रशासनाची दिशाभूल करण्यात आलेली असून भ्रष्टाचार व अनियमितता झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, सेवा प्रवेश नियमामध्ये दुरुस्ती करणाऱ्या गठीत समितीने प्राप्त निवेदनांची योग्य चौकशी व कागदपत्रांची पडताळणी न करता चुकीच्या शिफारशी करून नियमबाह्य पदोन्नती दिल्याचे दिसून येते.

पालिकेच्या विविध विभागामार्फत सेवा प्रवेश नियमामध्ये आवश्यक बद्दल सुचविण्याचा प्रस्ताव सेवा प्रवेश नियमामध्ये दुरुस्ती करणाऱ्या गठीत समितीने विचारात घेतला नाही.

कालबद्ध पदोन्नती काही कर्मचारी अधिकाऱ्यांना दिली आहे, काहींवर अन्याय करून त्यांना कालबद्ध पदोन्नती दिली नाही आजही ते खालच्या पदावर काम करीत आहे.

१०, २०, ३० चा लाभ अनेक अधिकारी, कर्मचारी यांना देण्यात आला परंतु काही कर्मचारी / अधिकारी यांना या लाभापासून यापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

काही दबंग अधिकाऱ्यांना मागील तारखेपासून (Back Date Effect) पदोन्नती देण्यात आलेली असताना इतरांना तोच लाभ देण्यात आलेला नाही.

प्रशासकीय काळात आयोजित करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी भरती प्रक्रियेत अनियमिता आढळून आलेली होती. भरती प्रक्रियेत पालिकेचे नियंत्रण नव्हते मोठ्या प्रमाणावर गैर व्यवहार, भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सदर भरती प्रक्रिया रद्द करून सेवा प्रवेश नियमांमध्ये आवश्यक दुरुस्ती केल्यानंतर नवीन भरती प्रक्रिया करावी.

प्रशासनाने श्री दिनेश कानगुडे श्रीकृष्ण मोहिते श्री. यशवंत देशमुख श्री. प्रशांत जानकर व इतरांच्या प्रलंबित पदोन्नती द्याव्यात तसेच निलंबन कार्यकाळात काही अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे भते । पगार / फरक देणे बाकी असल्याने त्यांना देण्यात यावे त्यानंतर प्रशासनाने सेवा प्रवेश नियम २०१९ मध्ये आवश्यक दुरुस्ती करून सुधारित प्रस्ताव सुधारणा करण्या करिता महासभेपुढे सादर करण्यात यावा. असा मी ठराव मांडत आहे.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, प्रशासना बाबत हा जो सेवाशर्ती नियम आणि पदोन्नतीचा विषय आहे अतिशय गंभीर विषय आहे जस उपमहापौर यांनी सांगितले की आज जवळ जवळ पालिकेमध्ये २०-२२ वर्ष काम करणारे आहेत त्यांच्या जवळ शिक्षण आहे अनुभव आहे तरी सुध्दा त्यांना पदोन्नती दिली जात नाही या उलट काय होते बाहेरुन डेप्यूटेशनवर अधिकारी येतात पदोन्नती घेऊन इथे सहाय्यक आयुक्त बनून ३ वर्षाचा कालावधी असतो डेप्यूटेशन ७-८ महिने त्यांना जातात प्रश्न आणि शहर समजून घेण्यामध्ये उरलेले ३ वर्षा पूर्वीचे ७-८ महिने जातात त्यांना नंतर माझे तर ट्रास्फरच होणार आहे मग मी करुन फायदा काय आणि काही काही अधिकाऱ्यांचे असे अनुभव आहेत ह्या शहराने बघितले आहेत ज्यांनी ह्या शहराची पुर्ण वाट लावली. आज आपली ४ पद उपायुक्त म्हणून आहेत महानगरपालिकेमध्ये सॅक्शन ५० टक्के पदोन्नती आहे ५० टक्के सेवा डेप्यूटेशनवर बाहेरुन घ्यायचे आहेत. ४ पैकी ३ आज बाहेरुन आहेत आणि एकाला किती रखळून रखळून आपण पदोन्नती दिली आणि आज तो ठराव झाला. अधिकारी येतात पदोन्नतीने येतात सर्व बरोबर आहे आयुक्तां सारखे कमी अधिकारी असतात जे लवकरच शहराचा वगैरे अभ्यास करुन प्रशासन सांभाळून घेतात समजून घेतात त्यांना दांडगा अनुभव आहे. पण इतर अधिकाऱ्यांचे तसे नाही मॅडम काही त्यांना विचारायला गेले तर एक तरी ह्या शहराची जाण नसते प्रशासकीय अनुभव नसतो शहरातील कामकाज ह्या विषयी जाण नसते. असे असते वेळी त्या बाबतीत आता पानपट्टे साहेब उद्या सेवानिवृत्त होतील दोन पद आहेत अतिरिक्त आयुक्तांची एक बाहेरुन भरायचे आहे आणि एक जेष्ठते नुसार पदोन्नती सरकार जर असा जीआर

काढत असेल आणि जर मनपाचे नुकसान होत असेल तर त्या दृष्टीने पालिकेने नियम बनवून फायदा काय ? एक जानवरकर साहेब आले होते उपायुक्त म्हणून होते अतिरिक्त आयुक्त म्हणून गेले कधी गेले काय गेले त्यांनी शहरासाठी काय केले काहीच कळले नाही. मॅडम असा विषय आहे तुम्ही ज्यावेळी सदस्य येतो ह्या ठिकाणी प्रश्न मांडतो अधिकाऱ्यां जवळून प्रश्न मांडतो त्यावेळी अपेक्षा ही असते की अधिकाऱ्याने तो प्रश्न समजून घेऊन त्याअनुषंगाने कार्यवाही करावी त्यादृष्टीने ज्यावेळी हा पुढील महासभेमध्ये विषय आणाल त्यावेळी ह्या ठिकाणी २०-२५ वर्ष काम केलेले आहे शहराची त्याला जाण आहे कामाचा अनुभव आहे अनुभव आहे शैक्षणिक पात्रता आहे अशा लोकांना प्राधान्याने त्याठिकाणी वाव मिळावा ह्या दृष्टीने त्या कमिटीला इंस्ट्रक्शन द्यावेत आणि त्या दृष्टीने तो अहवाल ह्या महासभेपूढे सादर करावा.

रवि व्यास :-

महापौर मॅडम आपकी परमिशन से मॅडम आप जानते है की कोविड काल के अंदर हमारे पास मे तत्कालिन आयुक्त एक आय.ए.एस. आयुक्त थे डॉ. राठोड जी लेकीन उसके बाद आपात काल के स्थिती मै उनकी बदली कर दि गई और एक नॉन आय.ए.एस. जो की इस एम.एम.आर. रिजन के कमिश्नर पोस्ट के लिये कॉम्पीनेट ऑथॅरीटी नही थे फिर भी उन्हे आय.ए.एस. हटा के नॉन आय.ए.एस. को हमारे मिरा भाईंदर शहर का कमिश्नर बनाया गया। पिछले ३ साल के उनके कार्यकाल के अंदर हमने देखा की कई सारे घोटाले हूये जिसकी चौकशी अँटी करप्शन डिपार्टमेंट के माध्यम से चल रही है उसी के अंदर एक कारनामा जो अभी सन्मा. उपमहापौर साहब इन्होने अभी दिखाया की किस तरीके से सेवा नियम के अंदर इतना जादा घालमेल किया गया और अन कॉलिफाईड लोगो को इन कॉपिटेंड लोगो को मौका दिया जा रहा है और जो कॉपीटेंड लोग है जो कॉलीफाईड लोग है उन्हे कहीना कही वंचीत रखा जा रहा है। तो आखीर के अंदर मे मॅडम जो नुकसान हो रहा है वो मिरा भाईंदर शहर के आम जनता का हो रहा है की इन कॉपीटेंड लोग जो है असक्षम लोग है वो आज इस पालिका को चला रहे है और निश्चित इसके अंदर जनता का बढा नुकसान हो रहा है। आज भगवती भाई साहब ने प्रस्ताव रखा आप लोगो के सामने अनिल सावंतजीने भी इस गंभीरता को समजा लेकीन मॅडम हमारे शहर का सौभाग्य है की मा. मुख्यमंत्री देवेद्रजी फडणवीसजीने हमारे राधाबिनोदजी शर्मा जो की एक यंग डायनामिक डायरेक्ट आय.ए.एस. ऑफीसर है इन्हे इस मिरा भाईंदर शहर के अंदर नियुक्त किया तो निश्चित ही मॅडम, प्रशासन के साथ साथ मे हमारी जनता किभी और सरकार किभी यह अपेक्षा है की आयुक्त साहब आप कुछ महानगरपालिका मे ऐसा कर के दिखाऐंगे जिस से यह हम साबित कर सके की जब एक आय.ए.एस. ऑफीसर जब किसी म्युन्सीपालटी का चार्ज लेता है तो जिस तरीके से करप्शन के उपर कंट्रोल हो की इस तरीके से अपने अधिकारीयो के जो इनके मीस कंडक्ट है जो कर्तव्य कसुरी इनके माध्यम से किये जारही है जो घोटाले उनके माध्यम से किये जा रहे है जिस तरीके से उपमहापौर साहब ने जोभी आपके सामने मुद्दे रखे हूये है उन सभी के उपर इनवेस्टीगेशन करना है यह इनवेस्टीगेशन होते रहेगा फिर ६ महिने के बाद एक नया ठराव आयेगा यह सारी चिजे तो सिस्टम मे चलती रहेगी लेकीन साहब आपसे जनता उम्मीद करती है सभागृह उम्मीद करता है की आप ऐसे अधिकारीयो के उप्पर रिस्पॉन्सीबिलीटी फिक्स करेंगे और एक स्ट्रक्ट ॲक्शन लेंगे जिसके माध्यम से एक ऐसा प्रिन्सीपल सेट हो मिरा भाईंदर कार्पोरेशन के अंदर की हाँ अगर एक आय.ए.एस. ऑफिसर आता है तो कहीना कही प्रशासन का चेहरा और दिशा जरुर बदलती है धंन्यवाद महापौर मॅडम।

सुनिल चौधरी :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने उपमहापौर साहेबांनी छाण पणे मांडले की कोणावर अन्या होतो त्यावर माझी एक सुचना आहे महापालिकेतील अनेक कर्मचारी मागिल अनेक वर्षा पासून एकाच पदावर कार्यरत असून त्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी सेवा प्रवेश नियमावली मध्ये आवश्यक बदल करण्यात येत आहे मात्र दुसरीकडे वाढीव पदांचा आकृतीबंध सन-२०२३ पासून राज्य सरकारकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे वाढीव पदांच्या आकृतीबंधला मंजुरी मिळाल्या शिवाय किंवा सेवाप्रवेश नियमावलीतील बदल करुन वरीष्ठ पदावर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे शक्य होणार नाही मागिल काही महिन्या पासून अंतीम मंजुरीच्या प्रक्रियेच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या नगर विकास विभागाकडून महापालिकाकडे आकृतीबंध संदर्भातील सादरीकरण करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत त्याअनुषंगाने संबंधित सादरीकरण तातडीने तयार करुन राज्य शासनास सादर करावे जेणे करुन सेवा प्रवेश नियमावलीतील बदल व वाढीव पदांचा आकृतीबंध ह्या दोन्ही बाबींना मंजुरी मिळून कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर पदोन्नतीचा लाभ देता येईल ही माझी सुचना आहे.

मा. महापौर :-

ह्या ठिकाणी मला प्रशासनाची काय भूमिका आहे ती मला सांगावी. आपण सर्व सदस्य इकडे बोलत आहात परंतु प्रशासनाची त्यांची काय भूमिका आहे नेमके काय करणार आहेत त्यांची स्पष्ट भूमिका ह्या ठिकाणी मांडावी.

नवीन सिंह :-

महापौर मॅडम के आदेशा नुसार मॅडम मे ३ महिने से कम्प्लेंड कर रहा हूँ कर्मचारी मुकादम है सफाई डिपार्टमेंट के अंदर २००७ से हमारे वॉर्ड मे काम कर रहा है पर वो पंचिंग करता है और घर पे चला जाता है वही पे घर है और तो और महानगरपालिका का फिता और कार्ड लगा के सारे स्टूल से कमिशन लेता है डेली कलेक्शन करता है, हम प्रतिनिधी के नाम खराब हो रहा है की यह महानगरपालिका का कलेक्शन कर रहा है।

मा. महापौर :-

कोण आहेत ?

नवीन सिंह :-

विनोद जाधव कर के नाम है सचिन साहब को भी मेने तक्रार की, पानपट्टे साहब को भी की। लेकीन आज तक कोई भी सुनवाई नही हूवा और उसकी सॅलरी ८ तरीख को डिपॉझीट हूवा अकाऊंट मै वोभी मेने चेक किया उसका कंटीन्यू पेमेंट हो रहा है। ६ बजे पंचिंग करता है घर मे जाता है ढाई बजे आता है पंचिंग कर के किसी भी प्रकार का काम सफाई का नही करता है।

मा. महापौर :-

वो कोनसे डिपार्टमेंट से बोला आपने ?

नवीन सिंह :-

सफाई मुकादम।

मा. महापौर :-

ओके.

नवीन सिंह :-

एक और रिक्वेस्ट है महापौर मॅडम, जो ६ बजेका टाईमिंग है उसको ७ बजे किया जाये सारे ५०-५५ लोग आते है पता नही टाईम पास करते है सफाई नही करते है ७ से ३ बजे तक टाईमिंग होता है तो हम लोग भी चेकिंग कर सकते है यह हमारा पब्लिक का टॅक्स का पैसा है कोनार्क कंपनी बोलता है की आपको क्या तो ऐसा लगता है की महानगरपालिका के अंदर मे कोनार्क नही है कोनार्क के अंदर मे महानगरपालिका चल रही है एसा मै तीन महिना से देख रहा हूँ।

मा. महापौर :-

ही सर्वांची तक्रार असेल पण मला असे वाटते प्रशासनाने ह्या ठिकाणी काम करायला पाहिजे आपण इतके पैसे खर्च करतो ते आपल्याला रिझल्टच देत नसतील तर आपण इथे कशासाठी बसलो आहोत कशासाठी ठराव करतो ठराव पाठवतो पण काम झीरो करतात.

नवीन सिंह :-

आप सुपरवाईजर हो आपके अंडर मे सारे कर्मचारी है नही सुनेगा तो फिर काम कर के फायदा क्या हमने क्लिनिंग के लिये रखे हूये है काम करने के लिये नाकी कलेक्शन करने महानगरपालिका का आय.डी. लगा के कलेक्शन कर रहा है।

मा. महापौर :-

असे करत असेल तर तात्काळ निर्देश देवून कारवाई करावी, तो असा करत असेल तर दुसरे देखील असे करतील.

सचिन डोंगरे :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने आपला विषय सेवा पदोन्नतीचा चालला होता इथे जे अधिकारी कर्मचारी आहेत ह्या एक-एक अधिकाऱ्याकडे चार-चार, पाच-पाच खाती आहेत आणि जेव्हा आम्ही त्यांच्याकडे विषय घेऊन जातो आज आम्ही पक्षाचे सत्ताधारी नगरसेवक आहोत किती लोक त्यांच्याकडे आले आहेत त्यांनी आम्हाला सांगाव कि किती आमची आतापर्यंत काम केली. आम्हाला अधिकाऱ्यांनी किंवा इथल्या कर्मचाऱ्यांनी आम्हाला निवडून दिले नाही आम्हाला पब्लिकने निवडून दिले आहे एक काम यांच्याकडून होत नाही महापौर मॅडम.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब, आपण काम बघून सर्वांची पदोन्नती करतो पण त्यांचा रिझल्ट आपल्याला काय मिळतो हा मोठा प्रश्न ह्या ठिकाणी पडलेला आहे.

सचिन डोंगरे :-

मॅडम मी स्व:त ह्या विषयी आयुक्त साहेबांना पण भेटलो मी त्यांना माझे सर्व पत्र दाखवले त्याच्यामधून अद्याप एक पण काम झाले नाही. आपण ह्या विषयाला पुढे घेऊन चाललो आहोत पण जे कॅपेबल परसन आहेत त्यांनी थोळा तर काही विचार करा आमचा नाही पब्लिकचा तर करा.

मा. महापौर :-

प्रशासनाने पदोन्नती बद्दल कशा प्रकारे विचार विनिमय केला आहे त्यांनी सांगाव.

डॉ. संभाजी पानपट्टे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो सन्मा. सदस्यांनी जो विषय काढला जाधव म्हणून मुकादम आहे त्याची ऑलरेडी बदली केलेली आहे बदली करुन जर पब्लिक करत असेल तर त्याला बडतर्फ करणार तसे मी अवगत पण केलेले आहे तो ठेक्यावर आहे ऑलरेडी सुचना दिलेल्या आहेत. तसेच दुसरा विषय होता सकाळी ७ वाजता पंचिंग करा उन्हाळ्याचे दिवस आहेत सकाळी ६ वाजता दिवस उजाळतो सकाळी उन जास्त असल्यामुळे सकाळी ६ पासून सफाईचे काम चांगल्या प्रकारे होते म्हणून आपण ६ ला ठेवले आहे. ७ ला केल्या नंतर उन होते उन्हामुळे काम कमी होते म्हणून याचा विचार करुनच ६ ची वेळ ठेवलेली आहे. ऑलरेडी आपण पंचिंग करतो.

सचिन डोंगरे :-

सर मी तुम्हाला पुरावे देतो माझ्या ऐरियामध्ये किती डमी आहेत पंचिंग करुन घरी जातात काम पण करत नाहीत.

डॉ. संभाजी पानपट्टे :-

तो वेगळा विषय आहे काम करत नसेल त्याच्यावर आम्ही कारवाई करु पण सकाळी ६ वाजता असू द्या उन्हाळ्याचे दिवस आहेत सकाळी काम लवकर होते जर की ७-८ वाजले उन झाले की काम करत नाही ही वस्तुस्थिती आहे म्हणून सांगतो ६ वाजता असू द्या.

सचिन डोंगरे :-

सर आम्ही ६ वाजता फिल्डवर असतो.

नयना म्हात्रे :-

महापौर मॅडम, माझ्या वॉर्डामध्ये एक सफाई कामगार हजेरी लावून ५ वर्षा पासून पळून जातो. पानपट्टे साहेबांना सांगितले, सचिन साहेबांना सांगितले ऐकतच नाही. मग असे असेल तर माझ्या घरी दोन बायका कामाला पाठवा. माझ्या घरी कुत्र्यांचे काम भरपुर असते. मग माझ्या घरी पण साफसफाईला पाठवा. पानपट्टे साहेब तुम्ही तुमची जबाबदारी नाकारता असे कसे चालेल. महानगरपालिकेचा तो पगार खावून मस्तपैकी ऐश करतो. मिटींग अटेंड करतो त्याने त्याचा खाडा करावा आणि कुठे जायच असेल तिकडे जावे. तो कामच करत नाही हजेरी लावून पळून जातो.

मधुसूदन पुरोहीत :-

महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बांगर साहेब इथे उपस्थित आहेत मला वाटते मागच्या दोन महिन्यामध्ये मी तुम्हाला चार-पाच वेळा भेटलेलो तुमचे असे म्हणणे आहे की शहरात असलेल्या समजा एखाद्या प्लॉट वर कचरा आहे किंवा रॅबीट आहे काही असेल ते महापालिकेच्या वतीने उचलण्यात येणार नाही त्याचे काय कारण आहे ? आता आयुक्त महोदय आहेत महापौर मॅडम आहे उपायुक्त आहेत तर कृपया त्या संदर्भात तुम्ही सांगा. हा जो कचरा एखाद्या प्लॉट वर पडलेला असतो आमच्याकडे बजेट नाही आमच्याकडे माणस नाहीत आम्ही हे उचलू शकत नाही हा कचरा येतो कूठून शहरातून येतो टाकतो कोण इकडे राहणारी लोक टाकतात मग त्याला टॅक्स कोण देतो इकडे राहणारी लोक देतात स्वच्छता कर कोण दोते राहणारी लोक देतात मग तूम्ही असे कसे म्हणता की आम्ही उचलणार नाही. आणि हेही गोष्ट तुम्हाला माहिती आहे मी तुम्हाला त्या कॉंट्रॅक्टरला नोंटीस द्यायला लावली तिथे जावून फक्त आयव्हा गाडीने तो कचरा उचललेला आहे अजुन त्याच्यावर कचऱ्याचा ढीगारे कमित कमी ३०-४० ट्रक कचरा तिकडे पडलेला आहे. अशा परिस्थितीत आपण जर ह्या शहराच्या आरोग्य बद्दल बोलत असाल तर हे कुठे तरी चुकीचे आहे. तुम्ही कृपया ह्या संदर्भात आता ह्याचा खुलासा द्यावा.

डॉ. सचिन बांगर :-

याच्यामध्ये सन्मा. सदस्यांनी जी सुचना मांडली आहे मी स्व:त त्या साईटवर जावून आलेलो आहे.

मा. महापौर :-

तो ओपन प्लॉट आहे का ?

ओपन प्लॉट आहे आपण जे आहे पब्लिकची प्रॉपर्टी आहे म्हणजे रस्ते असेल किंवा पब्लिक प्रॉपर्टी असेल त्या ठिकाणचा आपण कचरा उचलतो ओपन प्लॉटवरचाही उचलू नये असे नाही सांगितलेलं परंतु मी स्व:ता त्या साईटवर गेलो एस.आय. होते आमचे सहा. आयुक्त त्याठिकाणी होते.

मधुसूदन पुरोहीत :-

मला माहिती आहे तुम्ही साईटवर आले होते तो बर्फींगचा कचरा आहे त्याच्यामुळे लोकांना अस्थमा होऊ शकतो कमित कमी ५० गाडी तो कचरा आहे प्रत्येक घरात तुम्ही जावून बघितले तर पायाच्या खाली दिवस भर जर माणूस घरी फिरत असेल तर त्याचे पाय काळे होतात कारण तो बर्फींगचा कचरा उडून त्यांचा घरी येतो. तुम्हाला ती परिस्थिती त्या दिवशी देखील सांगितली मागील ४० दिवस उजाळून गेले पण तुम्ही अजुन पर्यंत त्याच्यावर काही कारवाई केली नाही आणि मी जेव्हा तुम्हाला भेटायला आलो तेव्हा तुमचे जे उत्तर होते ते उडवा उडवीचे होते तुम्ही इथे लोकांच्या सेवेसाठी आहात मी जनप्रतिनिधी आहे मी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देणे तुमचे काम आहे, आणि ह्या शहरात काम करुन घेणे ही तुमची जबाबदारी आहे जर होत नसेल तर निश्चित पणे तुम्हाला जयश्री राम बोलणे हे गरजेचे आहे. आणि तुम्हाला आज थेट बोलतो जर ४८ तासात तुम्ही जर नाही उचलले त्याच्यावर कारवाई नाही केली तर १९४९ ॲक्ट मध्ये काय आहे नाही आहे ते मला पण कळतं ?

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

ठिक आहे.

मधुसूदन पुरोहीत :-

काय आहे नाही मला समजते मागिल काही वर्ष मी पण नगरसेवक ह्या शहरात राहिलेलो आहे तर उत्तर थेट आणि काम करणारा असेल असेच मला द्या.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

ह्याच्या संदर्भात आपण त्यावेळी जो कचरा असेल बर्फींग वेस्ट प्लस जो कचरा आहे तो कचरा उचलून घ्यायला सांगितला होता तिथे फक्त जे डेब्रीज असेल आता डेब्रीज बऱ्याच ठिकाणी प्रायव्हेट प्लॉटवरती राहते त्याला नोंटीस देवून आपल्या मार्फत उचलता येईल का ते बघा कारण त्याचे बजेट आणि हे डेब्रीजचे काम आहे.

मधुसूदन पुरोहीत :-

साहेब तूम्ही तुमची कारवाई करा त्या लोकांचा काय गुन्हा आहे जे तिथे टॅक्स देत आहेत त्या नागरीकांचा काय गुन्हा आहे त्यांना अस्थमा होत आहे निमोनिया होत आहे त्याचा जबाबदार कोण ?

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

आपण बर्फींग वेस्ट आणि कचरा जो आहे तो तात्काळ उचलून घ्यायला लावला होता जर नसेल झाले तर दोन दिवसात ते पुन्हा एकदा .....

मधुसूदन पुरोहीत :-

तुम्हाला आता १० मिनिटात एक फोटो पाठवायला लावू का ? मला त्याच्यावर कारवाई पाहिजे कारवाई होणार की नाही तेवढे सांगा ? तुम्ही तो कचरा उचलणार की नाही सन्मा. आयुक्त महोदय इथे उपस्थित आहेत मला जनतेला उत्तर द्यायचे आहे ज्यांनी मला निवडूण द्यायचे आहे त्यासाठी मी जबाबदार आहे.

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

बर्फींग वेस्ट आणि जो कचरा आहे तो उचललाच जाईल आपल्याच डंफर मार्फत उचलला जाईल.

मधूसुदन पुरोहीत :-

किती दिवसात दिवस सांगा ४० दिवस उलटून गेले तुमच्याकडे बजेट नाही तुमच्या कॉंट्रॅक्टर आहे तो काम करत नाही हे लक्षात ठेवा. कधी गाडी नसते कधी त्याच्याकडे जेसीबी नसतो मी लोकांना उडवा उडवीची उत्तरं देवू शकत नाही तूम्ही मला थेट सांगा किती दिवसात करणार ?

डॉ. सचिन बांगर (मा.उपायुक्त (मु.)) :-

आता किती राहीले आहेत ते बघून मी एस.आय. ला विचारुन तात्काळ उद्या पासून उचलायला लावतो.

मधूसूदन पुरोहीत :-

ठिक आहे तुम्हाला ८ दिवसाची वेळ देतो.

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. आपल्या प्रभाग समिती क्र.३ चे प्रभाग अधिकारी आम्ही त्या दिवशी नगर सेवक सर्वांनी पुर्ण वॉर्डमध्ये निरिक्षण केलं. काही ठिकाणी जे इंडस्ट्रीयलमध्ये आहेत त्याच्यामध्ये काही छप्परे टाकलेली आहेत. ते त्यांना दाखवले आणि एक महत्वाचा प्रश्न असा आहे की आपल्या प्रभागात नगर बिल्डींग आपल्या वॉर्डात आहे त्या वॉर्डात लास्टचा जो रुम आहे त्यांनी काय केले आपले जे गटर जाते त्या गटारावरती त्याने ते ३ झाकण पुर्ण पॅक करुन त्याला लॉक लावून ठेवला आहे. आम्ही त्या ऑफीसरला दाखवले जितेंद्र कांबळे यांना त्यांनी कुठलीच कारवाई केली नाही. मी आयुक्तांना उपायुक्त मुख्यालयाला पत्र देखील दिले की ह्यांची बदली करुन टाका तरी देखील होत नाही. आणि बीपी रोडला पाणी भरले तर त्याचा जबाबदार हे सर्व राहणार आहेत मॅडम

त्यासाठी तुम्ही ह्यांची बदली तरी करुन घ्या आणि त्यात एक मोठा प्रश्न काय आहे जे जे आम्ही काम दाखवले त्याचे त्या लोकांनी हप्ते लावून घेऊन आले आहेत. म्हणजे महिन्याला माझी फिक्स अमाऊंट फीक्स करुन आले आहेत आणि आपण विचारायला गेलो तर उत्तर देत नाहीत.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम माझी विनंती आहे कारण की हा विषय सर्वांचा महत्वाचा विषय आहे त्याच्यासाठी स्पेशल महिन्यामध्ये एक महासभा नाही दोन तीन पण लावू शकतो कारण की असे जे विषय आहेत सर्वांनाच बोलायचे आहे.

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम, कांबळेचा आणि सतिश सुर्वे यांचे काय करायचे आहे ते आयुक्त साहेबांना विचारुन घ्या मॅडम.

मा. महापौर :-

आपला पदोन्नतीचा विषय आहे तुम्ही वेगळ्या विषयावर बोलत आहात ज्या पण तक्रारी आहेत ते पेसिफीक अधिकारी यांना द्या आपले प्रतिनिधी, नगरसेकव जे पण तुम्हाला पत्र देतील त्यांचे तुम्ही त्यांना उत्तर द्यावे तुम्ही कशासाठी उत्तर देत नाहीत किती दिवसामध्ये काम होणार किती दिवस लागणार आहेत तुम्ही कुठे नोंटीस दिली ते नगरसेवकांना सांगा तुम्ही कशाला उत्तर देत नाहीत त्यांना उत्तर द्यायला पाहिजे ते आता विचारतात त्याचे तुम्ही पहिलाच उत्तर दिले असते तर त्यांनी विचारले नसते.

मधुसूदन पुरोहीत :-

साहेब काम केले नाही तर जशास तस उत्तर तुम्हाला देवू.

मा. महापौर :-

सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदन :- श्री. मनोज दुबे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव :-

प्रकरण क्र. ३९, मिरा भाईंदर शहराच्या विकास योजनेतील, विकास योजना रस्ते (DP रस्ते) विकासहक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात विकसीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

रवि व्यास :-

मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील विकास योजना रस्ते (डी.पी. रस्ते) विकसित करण्यासाठी UDCPR मधील विनियम क्र.११.२.५ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना विविध अडचणी निर्माण होत असून रस्ते विकासाची गती मंदावलेली आहे.

डी.पी. रस्ते सिमेंट काँक्रीट स्वरूपात विकास हक्क प्रमाणपत्र (TDR) यांच्या मोबदल्यात विकसित केल्यास महानगरपालिकेवर येणारा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. त्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी –

१) विकासकाच्या मालकीच्या जागेत डी.पी. रोड आरक्षित असल्यास, UDCPR मधील तरतुदीनुसार संबंधित विकासकास सिमेंट काँक्रीट रस्ता विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी देण्यात यावी.

२) विकासकाच्या जागेसह महानगरपालिकेकडे हंस्तातरीत केलेल्या जागेत डि.पी रोड आरक्षित असल्यास संबंधित विकासकास सिमेंट कॉक्रीट रस्ता विकास हक्क प्रमाण पत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी देण्यात यावी.

३) विकासकाच्या जागेसह इतर खासगी मालकांच्या जागेत डी.पी. रोड आरक्षित असल्यास, सर्व संबंधित जागामालकांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास त्या विकासकास सिमेंट काँक्रीट रस्ता विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी देण्यात यावी.

४) विकासकाच्या जागेसह व इतर खाजगी मालकांच्या जागेत डि.पी रोड आरक्षित असल्यास, त्याजागा मालकांनी ना हरकत प्रमाण पत्र देण्यास नकार दिल्यास महापालिकेने मध्यस्थीची भुमिका घेऊन समन्वय साधून विकासकास सिमेंट कॉक्रीट रस्ता विकासहक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी द्यावी.

तसेच, बांधकाम विभागाने सिमेंट काँक्रीट रस्त्यांचे सविस्तर अंदाजपत्रक (Estimate) तयार करून संबंधित विकासकास कार्यादेश द्यावा. रस्त्याच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने विकास हक्क प्रमाणपत्र (TDR) देण्यात यावे.

विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यात येणाऱ्या डी.पी. रस्त्यांबाबतचा सविस्तर अहवाल मा. स्थायी समितीसमोर वेळोवेळी अवलोकनार्थ सादर करण्यात यावा. असा मी ठराव मांडत आहे.

रजनीकांत मयेकर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो सदरचा विषय जो आणलेला आहे आपल्या शहरातील विकास योजने मध्ये जे डीपी रोड आहेत ते डीपी रोड बांधण्या करीता फंड लागतो आणि महापालिकेची आर्थिक स्थिती महापालिकेचे उत्पन्न हे जर बघितलं तर हे थोळस डिफीकल्ट आहे तसेच १०० कोटी लोन करीता सुध्दा आपण प्रयत्नशिल आहोत पण अजुन पर्यंत लोन आपल्याला भेटलेले नाही. जय विकासहक्क प्रमाण पत्र टीडीआर च्या माध्यमातून जर आपण डेव्हलप केले तर महापालिकेचा भार अधिक कमी होईल आणि विदाऊट पैसे आपले डीपी रोड बनवून तयार होतील आणि शहराच्या नागरीकांना याचा उपयोग होऊ शकतो. ते डीपी रोड जे आपण बनवतो एखाद्या विकासकाकडे समजा उदाहरण एक बिल्डर आहे त्याच्याकडे स्व:ताच्या मालकीची जागा आहे त्याच्यामध्ये तो डीपी रोड जर जात असेल तर त्याला महानगरपालिका तो डीपीरोड बांधण्या करीता परवानगी देईल. उदाहरण एका विकासकाकडे समजा ७० टक्के स्व:तची जागा आहे त्याच्या मध्ये डीपी रोड आहे आणि उर्वरित ३० टक्के जागा जर महानगरपालिकेची असेल तर संपुर्ण रस्त्यावर त्या विकासकाची इच्छा असेल तर त्या विकासकाला महानगरपालिका डीपी रोड बांधण्या करीता परवानगी देईल टीडीआर च्या माध्यमातून. उदाहरण घ्या एका विकासकाकडे ६० टक्के जागा आहे आणि ४० टक्के जागा विविध मालकीची असेल तर महानगरपालिकेने त्या मालकीच्या जागा मालकाला बोलवून त्याला समजावून सांगूण मध्यस्थी करुन त्याला टीडीआर देवून त्या संबंधित विकासकाला तो संपुर्ण डीपीरोड बांधण्या करीता परवानगी देईल. आता उदाहरण देतो एक रस्ता आहे त्याच्यामध्ये एका विकासकाकडे समजा ५० टक्के जागा असेल ३० टक्के महानगरपालिकेची जागा असेल आणि २० टक्के जर दुसऱ्या मालकीच्या जागा असेल तर महानगरपालिका याच्यामध्ये मध्यस्थितीची भूमिका घेईल समन्वयाची भूमिका घेईल त्या जागा मालकाला बोलवेल की हा डीपी रस्ता मिरा भाईंदर महापालिका विकसित करायचा आहे तूझी ही जागा जी जात आहे त्या जागेच्या मोबदल्यामध्ये महापालिका तुला टीडीआर देईल तुझे कागदपत्र सादर कर आणि त्याला समजवून सांगेल त्याची जागा महापालिकेची जागा ती संबंधित जागा त्या विकासकाला सांगेल की ह्या संपुर्ण जागेमध्ये डीपी रोड

बनविण्या करीता तुला आम्ही परवानगी देत आहोत तू डीपीआर बनवून दे आणि हे जे काम झालं तर ह्याचे एसटीमेट जे आहे हे बांधकाम विभाग करेल आणि बांधकाम विभाग ज्या प्रमाणे कॉंट्रॅक्टरला डीपी रोड बांधताना पेमेंट करते त्याच प्रमाणे टप्या टप्याने रस्त्याची प्रगती बघून काम बघून टप्या टप्याने त्याला टीडीआर देईल. अशा प्रकारचा हा विषय आहे हा विषय मांडण्याचा फक्त एकच उद्देश आहे की महानगरपालिकेचे पैसे वाचवून आपण लोकांना मॅक्झीमम डीपी रोड कसा बनवू शकतो हा त्या मागचा उद्देश आहे.

विजया वैती :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, उपरोक्त विषयानुसार वॉर्ड क्र.१३ मधील काशिमीरा चर्च झोपडपट्टी दर्म्यान असिफ पटेल बंगला सेंट ऑल हॉस्पीटल पर्यंत वाहतूकीसाठी नव्याने ब्रिज बनविण्यात येणार आहे हा ब्रिज बनविताना काही घरे बांधीत होणार आहेत हा ब्रिजसाठी स्थानिक रहिवाशांचा विरोध परंतू त्यांची अशी मागणी आहे की आम्हाला विस्तापीत करणार आहात त्या अगोदर जवळ पास राहण्यासाठी कायदेशीर मार्गाने कायमस्वरुपी घरांची व्यवस्था करावी अशी त्यांची विनंती आहे.

मा. महापौर :-

विषय काय आहे आणि तुम्ही काय मांडत आहात.

विजया वैती :-

डीपी रोडचा विषय चालू आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे तुम्ही एक पत्र द्या आपण खांबित साहेबांना सांगू.

निला सोंस :-

महापौर महोदय टीडीआर के बदले मै रस्ते डेव्हलपमेंट यह होता आ रहा है और हमारे प्रभाग मै चार रस्ते ऐसे बने है लेकीन मुझे थोडीसी जानकारी चाहिये इस विषय पर अगर हमारे टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंटसे कोई हो अभी हम जो प्रस्ताव ला रहे है टीडीआर के बदले मै रस्ता रस्ता डेव्हलप करना है तो ऑलरेडी हमने सीसी रोड तकरीबन हजार करोड से जादा के किये हूये है तो जो काम चालू है उसके पेमेंट के लिये कर रहे है की कोई नया काम आने के लिये हम कोशीश कर रहे है ?

मा. उपमहापौर :-

शायद मेरी बात आप बराबर से समजे नही बाय डीफॉल्ट युनिफाय डीसी रुल मै टीडीआर के मोबदले के अंदर रोड बनायेंगे लेकीन एक्झांपल लो आप विकासक है और आपके सामने डीपी रोड है आपकी उसमे से ५० टक्के जगा है और ५० टक्के जगा मेरी है तो मै वो रोड बनाने के लिये आपको परमिशन या एनओसी नही देता हूँ, और तबतक आप वो डिपीरोड नही बना सकते तो हमने कहा की महानगरपालिका कमिश्नर इसमे मध्यस्थिती की भूमिका ले और मुझे बूलाये की यहा पर निला मॅडम डीपी रोड बनाने मै इंट्रेस्टेड है और वह बनने के बाद इस शहर को फायदा होगा तो आप उनको एनओसी दिजीये आपका जो प्रॉपर्टी है उसक प्रॉपर्टी का टीडीआर.....

निला सोंस :-

उपमहापौर महोदय, यह आपका विषय मै समज गई हूँ क्यो की टीडीआर के बदले मे रस्तो का डेव्हलपमेंट ऑलरेडी हेाता आ रहा है ५ साल जो हमारा कार्यकाल था उसमे कनकीया मै चार रोड हूये है आप खांबितजी से पुछ सकते है तो मै वो प्रक्रिया नही समजना चाहती क्यो की मुझे उसकी आयडीया है मै सिर्फ आपसे यह जानना चाहती हूँ की हजार करोड के सीसी रोड ऑलरेडी जो प्रस्तावित थे जिसमे से कुछ रोड अभी तक शुरु नही हूये है क्या हम उस रोड के लिये हम बँक से लोन के लिये ऑलरेडी प्रक्रिया चालू किये थे और अभी तक शायद बँक से नही मिला है तो उन रोड को जिसका निविदा पास हो गई है वर्क ऑर्डर दे दिया क्या उसके फंड के लिये हम यह व्यवस्था कर रहे है या हम नये डीपी रोड या और कार्यो की निविदा निकालने वाले है मेरा स्पष्ट सवाल यह है मुझे डीपी रोड का आपका जो प्रकिया वो तो मुझे आयडीया है।

मा. उपमहापौर :-

हनमे यह जो प्रस्ताव लाया है अभी एक्झांपल लो की आपके वॉर्ड का एक रोड बनाना बाकी है और उसमे से हम है हजार करोड का फंड जो है वो बँक से नही मिला ना गव्हर्नमेंट से मिला तो अभी वो डीपी रोड वैसेही रहेगा फिर हम क्या करेंगे वहाका जो विकासक है उसकी प्रॉपर्टी है अगर वो विलींगली इंट्रस्टेड है या कोई बिल्डर अगर इंट्रस्टेड है तो उसको हम परमिशन देंगे।

निला सोंस :-

मुझे यही जानकारी चाहिये थी की जो हम हजार करोड के सीसी रोड बनाने के लिये निविदा निकाल चुके है और हम वर्क ऑर्डर दे चूके है उन निविदावो का पेमेंट देने के लिये क्योकी हमारी जो प्लानिंग थी की बँक से हमे लोन

मिलेगा वो नही मिल पा रहा है इस लिये हम इसे प्रस्तावित कर रहे है अब यह कोनसे रोड होगे किसके लिये होगा क्या इसका निविदा इसकी जानकारी वापीस महासभा मै आयेगी ?

मा. उपमहापौर :-

मॅडम, देखो ऐसा है की यह प्रशासनिक पार्ट है प्रशासन का काम है हमने पॉलिसी डिसाईड की की निला मॅडम के वॉर्ड मै रोड है और वो प्रॉपर्टी भी निला मॅडम की है.....

निला सोंस :-

आय गॉट ईट मै उसी पॉलिसी पे सिर्फ इतना कहना चाहूँगी.....

मा. महापौर :-

सवाल जवाब न करते हूये पुरी जानकारी शिंदेजी आये हूये है वो दे देंगे।

निला सोंस :-

वैसी जानकारी मिली सिर्फ यही जानकारी मे चाहूँगी सन्मा. नगररचना शिंदेजी से की हम जो टीडीआर के बदले मै अधिकतर अपणे मिरा भाईंदर महानगरपालिका मै अधिक्तर राशी रस्तो पे युज की गई है क्या हम किसी भवन कोभी बना सकते है ? जैसे ऑलरेडी लता मंगेशकर नाट्य सभागृह उसी से बना हूवा है टीडीआर फंड सेही बट ऐसा हम अभी कई ॲसेट क्रियेट कर सकते है क्यो की हजार करोड हमने सिर्फ रोड बनाने के लिये डाल दिये है जिसका ॲसेट व्हॅल्यू नही होता रोड होने चाहिये लेकीन कितना ॲव्हरेड कितना अमाऊंट होना चाहिये वो अलग विषय है तो हम टीडीआर को स्कूल खडा करने के लिये, हॉस्पीटल खडा करने के लिये या सभागृह जिसमे हम बिओटी सिस्टीम मै मार्केट खडा करते ५० लाख का यह सभागृह जिसमे हम करोडो रुपये लगाते है क्या टीडीआर से यह सारी वस्तूवो भी खडी की जा सकती है बनाई जा सकती है ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

मा. महापौर मॅडमच्या मान्यतेने मी सांगु इच्छीतो रस्त्यांची जी तरतुद आहे ती फक्त नविन प्रस्तावित रस्त्या साठीच कंट्रक्शन टीडीआर आहे आणि जे आरक्षना मधले जे भुखंड विकसीत करायचे आहेत त्याच्या मधले जे बांधकाम असेल त्याच्या साठीच कंस्ट्रक्शन टीडीआर ची तरतुद आहे.

निला सोंस :-

मतलब अभी जो हम प्रस्ताव ला रहे है वो सिर्फ नविन रस्ते के लियेही है ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

प्रस्तावित रस्त्यासाठीची तरतुद आहे मॅडम.

निला सोंस :-

प्रस्तावित रस्त्यासाठी तरतुद आहे तो मै सिर्फ सन्मा. महोदय से सिर्फ यही कहना चाहूँगी क्योकी टीडीआर के बदले मै यह पेहल अच्छी है यह मेने पहले भी कहा था क्योकी हमारे वॉर्ड मै ऐसी चार रोड बन चुके है बट इस पेहल का उपयोग जादा से जादा हम ॲसेट क्रियेट करें महानगरपालिकाके हम रोड पे हजार करोड डालना मुझे नही लगता यह कहातक सही था लेकीन ठिक है अभी वो सवाल हो चुका जो बित गया सो बात गई लेकीन प्लीज इस चिज पर ध्यान दिया जाये की टीडीआर के बदले मै हम महानगरपालिका मै जादा से जादा ॲसेट क्रियेट करें धंन्यवाद।

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, या विषयाच्या अनुषंगाने माझी आयुक्त महोदयांना, आणि टाऊन प्लॅनिंगला विचारायचे आहे की आपण ह्या ठिकाणी टीडीआर च्या बदल्यात प्रस्तावित रस्ते हा ठराव केला पण युडीसीपीआर मध्ये प्रस्तावित विकास योजनेतील रस्ते डेव्हलप करण्याचे पुर्ण अधिकार आयुक्तांना आहेत म्हणजे आपल्याला आहेत महासभेमध्ये आम्ही ठराव केला मग त्या अनुषंगाने आपण कार्यवाही करणार आहेत का ? पुर्ण आपले अधिकार आहेत युडीसीपीआर मध्ये तसं म्हटलेले आहे की आयुक्तांनाच पुर्ण अधिकार आहेत मग आमच्या ठरावाला अर्थ उरतो की नाही तेच मला म्हणायचे आहे.

सुरेश खंडेलवाल :-

परत तुम्ही दिशाभूल करत आहेत मला सांगा ठरावा मध्ये असे काहीच म्हटलेले नाही त्याच्यामध्ये हेच आहे जे गोषवाऱ्यामध्ये आहे साहेब तुम्ही गोषवारा वाचत नाही.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, आपण ह्या ठिकाणी ठराव करतो लोकांच्या हिताच्या दृष्टीने पण प्रशासन त्यांना पाहिजे तेच करते आपण ठिक आहे टीडीआर घेणार, रस्ते विकसीत करणार पण पुर्ण अधिकार आयुक्तांचे आहेतना आयुक्त त्या ठरावाचे काय करणार आहेत त्यांची मान्यता त्या ठरावाला आहे का ?

मा. महापौर :-

ते अंमलबजावणी करणार ना त्यांचा अधिकार असेल तर ते अंमलबजावणी करणार नाही असेल तर ते शासनाला पाठवणार जे पण असेल काही तर करणार ना.

अनिल सावंत :-

आयुक्त साहेब काही बोलत नाहीत ते म्हणत आहेत की माझे अधिकार आहेत आणि आपण इथे ठराव करत आहोत. तुम्हाला ठराव करण्यासाठी ह्या शहराचा विकास व्हावा म्हणून आम्ही विरोधात ठराव करत नाही आम्ही सरळ मान्यता देत आहोत.

मा. महापौर :-

तूम्हाला लागेल तर मान्यता द्या. ठराव सर्वानुमताने मंजुर पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ३९ :-

मिरा भाईंदर शहराच्या विकास योजनेतील, विकास योजना रस्ते (DP रस्ते) विकासहक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात विकसीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ४१ :-

मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील विकास योजना रस्ते (डी.पी. रस्ते) विकसित करण्यासाठी UDCPR मधील विनियम क्र.११.२.५ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना विविध अडचणी निर्माण होत असून रस्ते विकासाची गती मंदावलेली आहे.

डी.पी. रस्ते सिमेंट काँक्रीट स्वरूपात विकास हक्क प्रमाणपत्र (TDR) यांच्या मोबदल्यात विकसित केल्यास महानगरपालिकेवर येणारा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. त्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी –

१) विकासकाच्या मालकीच्या जागेत डी.पी. रोड आरक्षित असल्यास, UDCPR मधील तरतुदीनुसार संबंधित विकासकास सिमेंट काँक्रीट रस्ता विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी देण्यात यावी.

२) विकासकाच्या जागेसह महानगरपालिकेकडे हंस्तातरीत केलेल्या जागेत डि.पी रोड आरक्षित असल्यास संबंधित विकासकास सिमेंट कॉक्रीट रस्ता विकास हक्क प्रमाण पत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी देण्यात यावी.

३) विकासकाच्या जागेसह इतर खासगी मालकांच्या जागेत डी.पी. रोड आरक्षित असल्यास, सर्व संबंधित जागामालकांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास त्या विकासकास सिमेंट काँक्रीट रस्ता विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी देण्यात यावी.

४) विकासकाच्या जागेसह व इतर खाजगी मालकांच्या जागेत डि.पी रोड आरक्षित असल्यास, त्याजागा मालकांनी ना हरकत प्रमाण पत्र देण्यास नकार दिल्यास महापालिकेने मध्यस्थीची भुमिका घेऊन समन्वय साधून विकासकास सिमेंट कॉक्रीट रस्ता विकासहक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी द्यावी.

तसेच, बांधकाम विभागाने सिमेंट काँक्रीट रस्त्यांचे सविस्तर अंदाजपत्रक (Estimate) तयार करून संबंधित विकासकास कार्यादेश द्यावा. रस्त्याच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने विकास हक्क प्रमाणपत्र (TDR) देण्यात यावे.

विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यात येणाऱ्या डी.पी. रस्त्यांबाबतचा सविस्तर अहवाल मा. स्थायी समितीसमोर वेळोवेळी अवलोकनार्थ सादर करण्यात यावा. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- ॲड रवि व्यास अनुमोदन :- श्री. रजनीकांत मयेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव :-

प्रकरण क्र. ४०, मिरा भाईंदर शहराच्या विकास योजनेतील आरक्षणे विकसीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम, यह ठराव पढने से पहले मै इसके बारे मै कुछ पार्श्वभूमी रखना चाहता हूँ की मिरा भाईंदर के अंदर करीबन ३३१ आरक्षण है उसके अंदर से बहूत से आरक्षण हमारे ताबे मे आये हूये है लेकीन वह डेव्हलप नही होपा रहे है क्योकी हमारे पास फंड नही है तो बहूत से आरक्षण जो पडे हूये है उसके अंदर कही पेभी कुछ इललिगल

बांधकाम हो जाता है और हमारा आरक्षण किती काम का नही रहता है, और हमारे पास मै आने वाले टाईम मैभी १० सालो मैभी इतना फंड नही जुटा पायेंगे की हम मिरा भाईंदर के जितने आरक्षण है उनको डेव्हलप कर सके तो इस माध्यम से आय यह युडीसीपीआर के अंदर जो कायदा गव्हर्नमेंट का है, उसके हिसाब से हम अगर यह डेव्हलप सारे हमारे जितने भी आरक्षण करने है उसको अगर हमको प्रॉपर मिरा भाईंदर के लिये हर आरक्षण सुरक्षित रखना यहा की जनता के लिये और हमारे ताबे मे रहे और डेव्हलप होये तो जो युडीसीपीआर के अंदर जो कायदा है उसके हिसाब से हमको यह ठराव करना पडेगा क्यु की जोभी यह आरक्षण का जो पार्ट है जोभी आरक्षण हमारे पास मै ५० टक्के करीबन आये है वो आरक्षण हम कोई भी जो बिल्डरके पास मे जो ५० टक्का आरक्षण रहेगा उसको हम यह आरक्षण देंगे ताकी वो हमको यह ५० टक्का आरक्षण करके दे और जो उनके ताबे के अंदर है ओभी आरक्षण का फायदा हमको मिले तो पुरा आरक्षण हम को यहा से विकासक से डेव्हलप कर के लेना है और जो हमारा ५० टक्का जो आरक्षण हम उसको डेव्हलप करने के लिये देंगे उसका भी हम चार्ज उस से लेने वाले है और उसके अंदर यहभी हम मेंशन करने वाले है की अगर उन्होने ३ महिने के अंदर यह काम शुरु नही किया तो यह हम आरक्षण उनके साथ मै कँसल भी करने वाले है तो कुल मिरा के यह मिरा भाईंदर के लिये बहूत ही विषय अच्छा है महापौर मॅडम आपके हिसाब से यह विषय यहापे आया हूवा है आपको मै बधाई देता हूँ क्यो की कितने आरक्षण इस मिरा भाईंदर के जो वंचित है लोगो के खेलने से वो डेव्हलप हो जायेंगे और बच जायेंगे इसके लिये मै यह ठराव रख रहा हूँ, फिर इसमे कोई राजनिती नही करें बस इतनाही मेरा कहना है।

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, याच्यामध्ये आणखीन थोळस स्पष्टीकरण करतो समजा १० ऐकर जागा आहे आणि एका विकासकाकडे ५ ऐकर जागा आहे आरक्षणा मधली तर १० ऐकरचे आरक्षण आहे आणि ५ ऐकर जी जागा आहे ती जर समजा महानगरपालिके कडे आहे आणि तो विकासक ती जागा डेव्हलप करु इच्छीतो तर महानगरपालिकेत आपल्या सोसायटीची ५० टक्के जागा आहे ती त्याला ॲस पर निविदा प्रक्रिया म्हणजे शासनाचा जो निर्णय आहे जे धोरण आहे त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया करुन ती जागा त्या माणसाला विकेल आणि ती जागा शंभर टक्के डेव्हलप करेल आणि ती डेव्हलप केल्या नंतर ती सुविधा मिळेल आणि पुन्हा महानगरपालिकेला त्याची जागा सुध्दा मिळेल. उदाहरण देतो समजा गार्डन रिझर्व्हेशनचा जर तो प्लॉट असेल तर त्यामध्ये तो ७० टक्यामध्ये गार्डन बनवणार आणि ३० टक्यामध्ये बिल्डींग बनवणार आणि ७० टक्केमध्ये गार्डन बनवून पुन्हा ती ७० टक्के जागा जी आहे ती महापालिकेला मिळेल आणि महापालिका ती जनतेसाठी खुली करेल हे एक प्रकरण झाले. त्यानंतर परत एक उदारण देतो एका माणसाकडे ५१ टक्के जागा आहे १० टक्के जागा महापालिकाकडे आहे आणि ४० टक्के जागा दुसऱ्या माणसाकडे आहे पण तो माणूस ती जागा हँडओव्हर करत नाही आणि ती जागा म्हणजे तो डेव्हलप पण करु शकत नाही पण ती हँडओव्हर पण करु शकत नाही आणि जर समजा पाहिजे असेल तर भुसंपादनाचा खर्च महापालिकेला करावा लागेल आणि भुसंपादन करणे महापालिकेला डिफीकल्ट आहे इनकम सोर्स नसल्यामुळे मग महापालिका काय करेल तो विकासक सांगेल साहेब ही जागा तुम्ही भुसंपादन करा आणि भुसंपादन केल्या नंतर त्याचा जो खर्च आहे तो महापालिकेला तो माणूस देईल. म्हजणे महानगरपालिकेची जागा त्या भुसंपादनाची जागा ती संपुर्ण जागा त्या माणसाला देईल आणि पुन्हा तो माणूस विकासक जो आहे तो आरक्षण डेव्हलप करेल आणि आरक्षण डेव्हलप केल्या नंतर पुन्हा ती जागा महापालिकेला मिळू शकेल आणि पैसे पण देईल. ह्याच्यामध्ये जर समजा त्या माणसाने ते आरक्षण टाईम फ्रेममध्ये जर डेव्हलप केले नाही तर आपण त्याला अट टाकलेली आहे ती जागा ३ महिन्याच्या आत विकासकाने सुरुवात नाही केली आणि ठराव कालावधीत पुर्ण नाही केला तर ती जागा आपण महापालिकेला जाप्त करेल तिथे त्यांना बांधकाम जरी केले असेल तर ते बांधकाम सहीत जप्त करेल आणि जी अमाऊंट आपण त्यांच्याकडून घेतलेली आहे आपण विक्री करुन घेतलेली आहे त्याच्यातील ५० टक्के जागा ५० टक्के रक्कम महापालिका फंडात जमा होईल आणि ५० टक्के आपण ते पण करु असा एक चांगला पर्याय आपण दिलेला आहे प्रशासन याच्यावरती जर काटेकोर पणे अंमलबजाणी केली तर महापालिकेचा आर्थिक भार जो भार पडणार आहे तो कमी होईल आणि आपल्या आरक्षणामध्ये जे काही १० टक्के २० टक्के ३० टक्के आरक्षण जागा आपल्याकडे आलेल्या आहेत त्या जागेमध्ये अतिक्रमण होणार नाही आणि आरक्षणे डेव्हलप होतील. तुम्ही जर बघितले युडीसीपीआर अनेक असे चांगले नियम आहेत तरी सुध्दा जस पाहिजे तस आरक्षण महापालिकेच्या हद्दीमध्ये विकसीत झालेले नाहीत पंरतु ह्या प्रकरणामध्ये महानगरपालिकेने मध्यस्ती केली समन्वयाची भूमिका केली तर शंभर टक्के हे आरक्षण विकसीत होणमध्ये काही अडचणी निर्माण होणार नाहीत म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे पार्श्वभूमी तुम्हाला सगळ्यांना सांगितलेली आहे आणि ह्याच्यामध्ये समजा आपल्याला काही गोष्टी समजल्या नसतील तर त्यांनी कृपया विचारावे. याच्या मागच्या इंस्टेन्शन चुकीचा नाही दिशाभूल करुन घेऊ नका जर समजल नसेल तर कृपया पुन्हा विचारा तुम्हाला आम्ही पुन्हा समजून सांगण्यास तयार आहोत.

दिनेश जैन :-

मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील विविध प्रकारची आरक्षणे अद्याप मोठ्या प्रमाणात विकसित झालेली नाहीत. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती व मर्यादित उत्पन्न यामुळे सर्व आरक्षणे स्वखर्चाने विकसित करणे शक्य होत नाही. अनेक ठिकाणी आरक्षणाच्या जागा अपूर्ण ताब्यात असून त्या रिक्त पडून असल्याने अतिक्रमणे होण्याची शक्यता वाढत आहे.

नवीन UDCPR नियमांनुसार उपलब्ध पर्याय असूनही मागील काही वर्षांत आरक्षण विकासाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. या पार्श्वभूमीवर, आरक्षणे जलद गतीने विकसित होण्यासाठी व महानगरपालिकेवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेणे आवश्यक आहे.

१. मार्केट, पार्कींग व बेघरांसाठी घरे - सदर प्रकारची आरक्षणे समावेशक आरक्षण अंतर्गत विकसित न करता महानगरपालिकेने स्वतः विकसित करावीत. यासाठी संबंधित जागा विकास हक्क प्रमाणपत्र (TDR), खाजगी वाटाघाटी किंवा भूसंपादनाद्वारे ताब्यात घेण्यात याव्यात.

२. महापालिकेकडे आराक्षणातील ५०% पेक्षा कमी जागा ताब्यात असल्यास - महापालिकेने शासन निर्णयानुसार सदर जागेची विक्री निविदा प्रक्रिये द्वारे करावी. निविदाधारकास सदर आरक्षण तीन महिन्यांच्या आत विकसित करण्याचे काम सुरु करण्याच्या अट टाकण्यात यावी. ठरावीक कालावधीत काम पुर्ण न केल्यास अटीचे उल्लघंन मानून जागा बांधकामसह असल्यास (असेल त्या स्थितीत / जैसे तेथे स्थितीत / वर्तमान परिस्थितील जागा) जप्त करावी व पालिकेला विक्रीच्या मोबदल्यात मिळालेल्या रक्कमेची ५०% रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम परत करावी.

३. विकासकाकडे ५०% पेक्षा जास्त जागा असल्यास - आरक्षणातील उर्वरित जागा महानगरपालिका व इतर खासगी मालकांकडे असल्यास, विकासकास या दोन्ही जागा आरक्षण विकसित करण्याकरीता आवश्यक आहे. विकासकाने भूसंपादन खर्च महापालिकेत भरण्याची तयारी दर्शविल्यास महानगरपालिकेनी आपली जागा नियमानुसार विक्री करून त्याची पूर्ण रक्कम मनपा निधीत जमा करावी. उर्वरित खासगी जागा भूसंपादनाद्वारे मिळवून त्याचा खर्च विकासकाकडून वसूल करावा. संपूर्ण जागा उपलब्ध झाल्यानंतर विकासकास आरक्षण विकसित करण्यास परवानगी द्यावी. ३ महिन्यांत काम सुरू करून ठराविक कालावधीत काम पूर्ण करण्याची अट घालावी. अटींचे उल्लंघन झाल्यास सदर जागा बांधकामासहित असल्यास (असेल त्या स्थितीत / जैसे तेथे स्थितीत / वर्तमान परिस्थितील जागा) पालिकेने जप्त करावी व पालिकेला विक्रीच्या मोबदल्यात मिळालेल्या रक्कमेची ५०% रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम परत करावी.

ज्या प्रकरणांमध्ये जागा ताब्यात येत नाही, त्या ठिकाणी महानगरपालिकेने वाटाघाटी, भूसंपादन व समन्वयाची भूमिका घेऊन विकासकांना सहकार्य करावे. त्यामुळे आरक्षण विकासाला गती मिळेल व मनपाला उत्पन्न प्राप्त होईल. विकास योजनेतील जास्तीत जास्त आरक्षण विकसित करणेकरीता आवाहन करून विकासकांना व इच्छुकांना सहकार्य केल्यास नागरीकांना जास्तीत जास्त विविध आरक्षणातील सेवासुविधांचा लाभ घेता येईल. या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुरेश खंडेलवाल :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, ५० टक्के ताब्यात असल्यास काय करावे ५० टक्के ताब्यात नसल्यास काय करावे हा जो विषय आहे उपमहापौर सांगतील नंतर आपण ठरवू ठराव मांडायचा आहे की नाही जस आपण समाज कारणात राजकारणात आहोत काही काही वेळा शब्द वापरते वेळी आपण सहज बोलून जातो परंतु त्या शब्दाचा अर्थ आपल्याला माहित नसतो. मगाशी आमचे सदस्य ते मित्र आहेत दिनेश जैन यांनी सांगितले की इसमे कोई राजनिती ना करे राजनिती तो हम करेंगे भाई राजनिती राजकारण या शब्दाचा खरा अर्थच आपण समजून घेतला तर त्या शब्दाचा जेवढा दुरुपयोग होतो तो होणार नाही. राजकारण म्हणजे काय समाज किंवा देश चालविण्यासाठी आणि सार्वजनिक हिताचे निर्णय घेण्यासाठी सत्तेचा वापर करण्याची प्रक्रिया होय. देश चालविण्यासाठी आणि सार्वजनिक हिताचे निर्णय घेण्यासाठी इथे आपण सर्व बसलो आहोत अपने को राजकारण करना चाहिये ऐसा किसी को मत बोलो राजकारण मत करो.

दिनेश जैन :-

राजकारण करना चाहिये लेकीन समाजकारण मै राजकारण नही आना चाहिये हम यहा समजा के लिये बैठे है राजकारण हम सभागृह के बाहर करेंगे।

अनिल सावंत :-

इसके लिये आपको राजकारण का मतलब मालूम होना बहूत जरुरी है।

दिनेश जैन :-

आप विषय पे फोकस करोंग।

अनिल सावंत :-

मै विषय पे फोकस कर रहा हूँ इसके लिये राजकारण का मतलब यही है देश चालविण्यासाठी आणि सार्वजनिक हिताचे निर्णय घेण्यासाठी सत्तेचा वापर करण्याची प्रक्रिया. सार्वजनिक प्रश्न सोडविणे आणि मानव हिताचे संवर्धन करणे हे त्यामध्ये अभिप्रेत आहे. हम अगर किसको बोलते है इसमे राजकारण मत करो वो गलत वर्ड है इसमे बोलने का राजकारण करो तो वो देश हीत के लिये होयेगा समाज हितके लिये होयेगा। साहेब टीडीआर चा विषय आहे परत हाच विषय आहे आयुक्त महोदय युडीसीपीआर मध्ये याच्या बाबतीत सर्व अधिकार आयुक्तांना आहेत आम्ही इथे काही ठराव करु सर्व अधिकार शेवटी आयुक्तांना आहेत. त्यामध्ये मला एक कळले नाही की ज्यावेळी आरक्षण समजा ४० टक्के महापालिकेकडे असेल आणि एक गार्डन रिझर्व्हेशन असेल आपण एकच ऐक्झांपल घेऊ गार्डन रिझर्व्हेशन आहे ४० टक्के महापालिकेकडे आहे ६० टक्के इतर विकासकाकडे आहे ते दोन विकासक आहे असे आपण समजू ४० टक्के महापालिकेने ते घेतले टीडीआर दिल मग त्या आरक्षणाचे आपण काय करणार ? पुर्ण आरक्षण गार्डनचे आहे ते काय करणार आहोत.

सुरेश खंडेलवाल :-

आपण सांगत आहोत की शिंदे साहेब पण मागे बसले आहेत ते जे ६० टक्के तुम्ही जे बोलत आहेत की आपल्याकडे ६० टक्के आहेत पालिकेकडे त्याच्यामध्ये असे आहे की ६० टक्के ज्याच्याकडे आहे तो स्व:ता पण ॲकोमेंडेशन रिझर्व्हेशन खाली तो डेव्हलप करु शकतो कारण ते ४० टक्के जर पालिकेची जागा आहे त्याला वाटते की पालिकेला द्यायची तर द्यावे नाही तर पालिकेने स्व:त ४० टक्के डेव्हलप करु शकतो.

अनिल सावंत :-

समावेशक आरक्षण हा वेगळा विषय आहे. आज समजा गार्डन रिझर्व्हेशन ४० टक्के महापालिकेकडे आहे ६० टक्के विकासका कडे आहे आपल्याला डेव्हपमेंट करायचे आहे मग त्यावेळी आपल्या जवळ पर्याय काय ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

मा. महापौर महोदय, यांच्या मान्यतेने बोलतो युडीसीपीआर मध्ये जे काही रिझर्व्हेशन डेव्हलप करायची तरतुदी असतील त्याच्या नुसार आम्ही कार्यवाही करु.

अनिल सावंत :-

काय तरतुद आहे ती सांगा.

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

आर.जी किंवा प्ले ग्राऊंडच जे आहे ते ७० टक्का प्लानिंग ऑथॅरीटीला हँडओव्हर करायचे आहे आणि ३० टक्यावर डेव्हलपरला कंस्ट्रक्शन अलाऊड आहे.

अनिल सावंत :-

मग आता ह्या ठरावामुळे काय होईल, काय फरक पडेल ? आता जो ठराव झालेला आहे हा तुमचा युडीसीपीआर झाला आता ठराव काय झालेला आहे ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

ठराव आल्या नंतर आम्ही इम्पीमेंट करण्यासाठी काही असेल ते कार्यवाही करु.

अनिल सावंत :-

उपमहापौर साहेब, आता ठरावामध्ये काय झाले आहे.....

मा. उपमहापौर :-

साहेब ऐका ही जागा आहे ही ६० टक्के जागा तुमची आहे आणि ४० टक्के जागा महापालिकेची आहे म्हणजेच तुमच्याकडे जास्त आहे ४० टक्के जी जागा महापालिकेची आहे ती महापालिका विकसीत करु शकत नाही म्हणून ४० टक्के जागा महापालिकेने निविदा प्रक्रिया करुन तूम्हाला द्यायची आहे तुम्हाला दिल्या नंतर तुम्ही त्याचे पैसे द्यायचे आणि ४० टक्के महापालिकेला जगा करायचे आहेत आणि ह्या संपुर्ण जागेचं टीडीआर कोटेशन तुम्ही जर गार्डन असेल तर ७० आणि ३० त्या ३० टक्के जागेमध्ये तुम्ही याची बिल्डींग बांधायची ह्या दोघांचे कोटेशन तुम्ही युज करायचे आणि ७० टक्के जागेमध्ये गार्डन बांधून तुम्ही पुन्हा महापालिकेला हँडओव्हर करायचे आहे.

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

नियमानुसार जे असेल ते आम्ही तपासून हे करु.

सुरेश खंडेलवाल :-

साहेब, ह्यांचे म्हणणे असे आहे की माझे रिझर्व्हेशन कुठले आहे समजा माझ्याकडे गार्डन रिझर्व्हेशन आहे, शाळेचे आहे यांचे म्हणणे असे आहे की ६० टक्के माझ्याकडे आहे आणि ४० टक्के पालिकेकडे आहे तर मी ६० टक्के मध्ये काही करु शकत नाही का ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

करु शकतो युडीसीपीआर नुसार.....

सुरेश खंडेलवाल :-

मी तेच सांगतो सांगत आहे ते जे ४० टक्क आहे गार्डनचे ते पालिका पण डेव्हलप करु शकतो द्यायचे असेल तर देवू पण शकते पण मी माझे ५० टक्केच्या वर जर माझ्याकडे रिझर्व्हेशन आहे तर मी त्याच्यामध्ये डेव्हलप करु शकतो.

मा. उपमहापौर :-

ह्यांनी असे म्हटले की ह्या ६० टक्के जागेमध्ये तुझी आहे ह्याच्यामध्ये बिल्डींग बांधू शकतो आणि जी त्याच्यामध्ये ऐक्झांपल ७० आणि ३० होईल म्हणजे ६० टक्के जागेमध्ये फक्त तुला ३० टक्का मिळेल आणि ७० टक्का तुला पुन्हा महापालिकेला हँडओव्हर करावी लागेल महापालिकेला ह्या ४० टक्के जागेचे काहीच मिळत नाही मी तुला असा प्रस्ताव दिला की तुला ही ४० टक्के जागा देतो ह्यामध्ये जी काही निविदा प्रक्रिया होईल तु जो रेट भरशील ऑक्शन करशील त्या रेडीरेकनर प्रमाणे बाजार भावा प्रमाणे ही जागा तु विकत घेशील ती घेतल्या नंतर महापालिकेला पैसे भेटतील त्याच्या नंतर ह्या संपुर्ण जागेचा तु प्लांट टाकशील आणि ही फक्त ३० टक्के जागेमध्ये तु बिल्डींग बांधशील आणि उर्वरित ७० टक्के जागेमध्ये तु गार्डन बांधशील आणि पुन्हा महापालिकेला हँडओव्हर होईल म्हणजे काय होईल महापालिकेला ही ४० टक्के जागा होईल तुझी पण इमारत बांधली जाईल आणि महापालिकेला पैसे पण मिळतील हा आमचा इंटेनशन आहे.

अनिल सावंत :-

वेरी गुड चांगला इंटेशन आहे.

मा. उपमहापौर :-

म्हणजे आम्ही महापालिकेचा फायदा बघत आहोत.

सुरेश खंडेलवाल :-

साहेब चांगला विषय आहे आता हे युडीसीपीआर प्रमाणे होणार आहे याच्यामध्ये तुम्ही काही टेंशन घेऊ नका फक्त याच्यामध्ये जी अडचण आहे मिरा भाईंदर शहरातील आरक्षणे विकसीत करण्यासाठी हा जो विषय आहे खुप चांगला विषय आहे पण याच्यामध्ये छोटी अडचण अशी आहे की मिरा भाईंदरच्या भरपुर आरक्षणामध्ये आम्ही वारंवार महासभेमध्ये गेल्या महासभेमध्ये महापौर मॅडम तुम्ही विनंती केली होती की आरक्षामध्ये लग्नाचे हॉल चालू आहेत आरक्षणाच्या प्लॉटमध्ये टर्फ चालू आहे त्याच्यावर पण आपल्याला कारवाई करावी लागेल.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम, यांचे म्हणणे असे आहे की जिकडे अतिक्रमण झालेल आहे जे आपल्या ताब्यात आलेले आहे जे आरक्षण ऑलरेडी टीडीआर देवून आपल्या ताब्यात आहेत त्याच्या वरती अतिक्रमण झालेले आहेत त्यांना काढायचे आहे.

सुरेश खंडेलवाल :-

त्यावर पण कारवाई करुन घ्या.

मा. उपमहापौर :-

त्याच्यामध्ये आणखीन एक प्रश्न आहे समजा ह्या ४० टक्के जागेमध्ये समजा २० टक्के जागा एका महापालिकेची आहे आणि २० टक्के जागा एका माणसाची आहे आणि ह्याच्याकडे ६० टक्के आहे मग हा २० टक्केवाला पण करु शकत नाही आणि ही २० टक्के जागा महापालिकेची अशीच पडून आहे आणि ६० टक्के जागा हा डेव्हलप करु शकतो. जर महानगरपालिकेने मध्यस्थी कली समनवयाची भूमिका घेतली आणि त्या माणसाला बोलवले की २० टक्के जागा आहे ही गार्डन रिझर्व्हेशनची आहे तुला गार्डन बांधाव लागेल ती काही कामाची नाही तुला ही भुसंपादन करायची आहे जर समजा ह्या माणसाने सांगितले की मी भुसंपादन खर्च द्यायला तयार आहे तर तो खर्च हा माणूस महापालिका फंडात जमा करेल आणि महानगरपालिका ह्याची अॅक्वीझीशन प्रोसेस करेल आणि ही जागा घेईल आणि ह्या माणसाला देईल आणि पुन्हा ही जागा निविदा प्रक्रिया द्वारे करु आणि ह्याचे पैसे महापालिकेला भेटतील आणि संपुर्ण जागा डेव्हलप झाल्या नंतर पुर्ण ह्याच्यातली ७० टक्के जागा ही महापालिकेला मिळेल म्हणजे असा एक चांगला ठराव केलेला आहे.

दिनेश जैन :-

पालिकेला पैसे पण भेटतील आणि डेव्हलप करुन पण ठेटणार आहे डबल बेनिफीट आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब, टाऊन प्लॅनिंग मला फक्त एक सांगा १० ऐकरचा माझा प्लॉट आहे आणि तो गार्डन रिझर्व्हेशन आहे ४० टक्के महापालिकेकडे आम्ही तो नंतर त्यांच्याकडून विकत घेतला ४० टक्केचे पैसे पण दिले माझ्या जवळ आला शंभर टक्के १० ऐकरचा प्लॉट आणि मी उद्या रेसिडेंन्स साठी त्याठिकाणी प्लांट टाकला तर तुम्ही तो पास करणार ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

जे काही रिझर्व्हेशन आहे त्याचा युडीसीपीआर नुसार आम्ही तपासणी करु कार्यवाही करु.

अनिल सावंत :-

रिझर्व्हेशन युडीसीपीआर नुसार तुम्ही कारवाई करणार म्हणजे नेमके काय करणार ? त्याच्यामध्ये गार्डन आहे.

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

त्याच्यामध्ये परसेंटेज आहे त्यासाठी जे परसेंटेजची तरतुद आहे त्याच्यानुसार आम्ही कारवाई करणार.

अनिल सावंत :-

३० टक्के आहे म्हणजे तो ३० टक्यामध्येच फक्त रेसिडेन्शील करु शकतो ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

फक्त ३० टक्यामध्ये.

अनिल सांवत :-

७० टक्यामध्ये नाही करु शकत ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

७० टक्के कार्पोरेशनला हँडओव्हर करायची आहे.

अनिल सावंत :-

३० टक्यामध्येच करणार तेवढेच करणार त्याच्यामध्ये टीडीआर लोड वगैरे केला तरी नही करणार ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

१०० टक्केचा एफ.एस.आय. ३० टक्यामध्ये भेटतो आणि ७० टक्के कार्पोरेशनला हँडओव्हर करायची.

अनिल सावंत :-

१०० टक्केच्या एफ.एस.आय. ३० टक्केमध्ये त्याला मिळणार त्याच्यामध्ये ३७ खाली चेंजेस करण्यासाठी गरज नाही रेसिडेंन्शलसाठी ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

युडीसीपीआरच तरतुद आहे एआर पॉलिसीची त्याच्या नुसार कारवाई होईल.

अनिल सावंत :-

मला सांगा तुमच बऱ्याच आमच्या १० वर्षा पासून तो विषय महासभेपुढे होता मिरा रोड पुनम सागर समोरचा प्लॉट आरक्षण नविन प्लान मध्ये आरक्षण क्र.२१२ असे बगीचाचे आरक्षण होतं त्याठिकाणी नगरसेवक निधी लागला आमदार निधी लागला त्याठिकाणी एक समजा मंदिर बांधले गेले त्यानंतर ते तोडलं गेलं सर्व सामान हलवलं गेल त्याठिकाणी देवदेवतांचे फोटो आहेत ते रातोरात उचलले गेले पालिकेनेच कारवाई केली कोणी विकासकाने केली नाही आता त्या आरक्षणाची परिस्थिती ह्या तुमच्या २१२ आरक्षणाची परिस्थिती आता नविन याच्या प्रमाणे काय आहे? आपण ज्यावेळी पुनम सागरच्या इथून जातो पेंकरपाडा रोड शांतीनगर संपते तिथे लेफ्ट साईटला प्लॉट आहे तिथे जूना जाफरी खाळी ब्रिज आहे तिथे संध्याकाळच्या वेळेस बघायचे एवढे अतिक्रमण असते खाण्या पिण्याचा गाड्या लागलेल्या असतात त्याठिकाणी ते आरक्षण आहे.

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

मंजुर डीपी होता तो आता नविन रिव्हाईज झालेला आहे त्याच्यामध्ये मला चेक करावे लागेल काय रिझर्व्हेशन आहे.

अनिल सावंत :-

त्याला चेक करायला तुम्हाला किती वेळ लागतो ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

नविन प्लान वर बघावे लागेल.

अनिल सावंत :-

प्लान मागवा आणि सभा संपेपर्यंत उत्तर द्या आणि मगाशी सना मॅडम बोलत होत्या त्यांना बोलायला दिले नाही त्यांचा महत्वाचा प्रश्न आहे आणि तो बांगर साहेबांशी संबंधित आहे दोन मिनिटात तो प्रश्न संपलेल.

मा. महापौर :-

मी त्यांना नंतर बोलायला देते.

निला सोंस :-

महापौर मॅडम, मेरा प्रशासन से पहला सवाल है की क्या नया डेव्हलपमेंट प्लॅन पास हूवा है इम्प्लीमेंट हूवा है?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

सुधारीत मंजुर विकास योजना ही १६ एप्रिल २०२६ जा मंजुर झालेली आहे आणि १ महिन्या नंतर ती अंमलात आलेली आहे.

निला सोंस :-

मतलब इम्प्लीमेंट हो चुका है ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

इम्प्लीमेंट हो चूका है।

निला सोंस :-

तो हम जो बात कर हरे है आरक्षण की वह ॲसपर न्यु डीपी हम बात कर रहे है निविदा के लिये ?

पुरुषोत्तम शिंदे (सहा. संचालक, नगररचना) :-

एस.

निला सोंस :-

महापौर महोदय, मे आपसे कहना चाहुँगी जैसा पहला जो डीपी प्लान था २००० मै पास हूवा और आज २०२६ मै वह न्यू डीपी प्लान आया है तो जब डिपी प्लान बनाया जाता है तो २० साल शहर कैसा होगा उसको ध्यान मै रखते हूये बनाया जाता है प्रशासन की जिम्मेदारी होती है की वोजो आरक्षण है उसको अपने ताबे मै ले और हम क्या बात कर रहे है ७०-३० का रेशो तो तरतुद पे है कुछ नया नही है। ऑलरेडी कई स्कूल हॉस्पीटल आपकी बिल्डींग आपकी क्षेत्रो मै वो ७०-३० के रेशो मे बनी है तो यह कुछ नया नही है अब इसपे नया क्या है इस प्रस्ताव मै यह मे जानना चाहती हूँ क्यो अभी हम जो आरक्षण प्रशासन द्वारा ले लिया गया है अगर वो ४० परसेंट है ५० परसेंट तक नही पोहचा है तो हम उनकी सालो की मेहनत जोकी वो २० साल मै डेव्हलप नही कर पाये देखा जाये तो वो मेहनत मै खरे नही उतर पाये लेकीन आज वो डेव्हलप करने के बजाये फिर से हम क्यो दे रहे है ? ७०-३० रेशो है औलरेडी उसका लाभ विकासक को मिल रहा है हर प्रकारके रेशो है तो क्या हम सिर्फ आरक्षण जो डेव्हलप करना है तनी भी अगर हमारे पास राशी नही है तो हमारा वार्षिक जो बजेट है उसमे हमने आरक्षण डेव्हलपमेंट का ऐक्सपेन्स दिखाया है, रस्तो का ऐक्सपेंन्स दिखाया है, और सभी हम टीडीआर के माध्यम से या बिल्डरो के माध्यम से अपनी दाईत्व को वहापे दे रहे हो उसमे किस प्रकार से जनता का फायदा होगा और किस प्रकार से निधी बचेगी ? कहते है समजा कारण करीये राजनिकती करण करीये पर व्यापारीकरण नही होना चाहिये। ७०-३० के रेशो मे आज भी देने के बाद बिल्डींगे बन रही है लेकीन गार्डन नही बन रहा है। बिल्डींग का काम चालू है लेकीन गार्डन के लिये घास नही लगी है, चाहे क्षेत्र मै हॉस्पीटल गया है ७०-३० के रेशो पे और हॉस्पीटल का भूमिपूजन हूवा होगा लेकीन इट नही बनी है तो केहेने का माध्यम यह है की अगर हम ७०-३० के रेशो मै जाने के बाद भी डेव्हलप नही कर पा रहे है तो अभी हम क्या ऐसा नया कर रहे है ?

मा. उपमहापौर :-

आपकी बात समज गये ओ आपको खुलासा कर रहे है।

निला सोस :-

प्रशासन खुलासा करेंगी की जनप्रतिनिधी मुझे तो यही बात समज मै नही आती है।

मा. उपमहापौर :-

ठराव हमने रखा है महापौर ने विषय पत्रिका पे विषय लाया है तो इसका खुलासा भी हम करेंगे महापौर जभी जायेगी तभी प्रशासन खुलासा करेगा ऐसे आप नही कह सकते है।

निला सोंस :-

आप ठराव का खुला आप करीये शायद मेरे को अगर नही समज मै आया तो करीये लेकीन जो टेक्निकल है मै चाहूँगी वो प्रशासन उसके उपर अपनी भूमिका व्यक्त करे.

सुरेश खंडेलवाल :-

पहिला मे बता देता हूँ तो फिर आपको नही समज मै आया तो उसके बाद प्रशासन करेगी। महापौर मॅडम, मै दोन्हो ही चिजो का जो उनके डाऊट है उनका कहना यह है की युडीसीपीआर के अंदर यदी ऑलरेडी पहले प्रोव्हिजन है ७०-३० का है या बायबॅक का है ऑलरेडी पहले भी इस तऱ्हेके जो रिझर्व्हेशन बिल्डप नही हो सकते थे छोटे जो रिझर्व्हेशन कोने कोपचे मै बचे रहते थे मॅडम हमने पहले भीजो पैसा लेके विकासक को पुरा दिया हूवा है फरक सिर्फ इतना है आज यह दोन्ही विषय के अंदर जो मै समज पाया हूँ इसमे हमने प्रशासन को यह निवेदन किया है की हम महासभाने उनको आदेशीत किया है की यदी इस तऱ्हेकी जोभी चिजे हो वो चाहे लेटीगेशन मै हो चाहे वो आधे अधुरे हो उसको पुरा करने के लिये प्रशासन इनिशेटीव्ह ले। ७०-३० की जो पॉलिसी है वो तो ऑलरेडी है लेकीन अभी किसी के पास वो डेव्हलपमेंट करने के लिये उतना नही है ५० परसेंट के निचे है बाकी का बचाकूचा किसी और के तौर का है तो उसको प्रशासन इनिशेटीव्ह लेके पुरा करे। यह दोन्हो विषय जो लाये गेये है मॅडम उनका उद्देश सिर्फ इतना है की प्रशासन को यह हम निवेदन कर रहे है की इस तऱ्हे की जोभी चिजे होंगी चाहे वो किसी डेव्हलपर्क को बुला के क्लियर करना है चाहे वो कोई लेटीगेशन क्लियर करना है महापौर मॅडम हमने किया है हमारे वॉर्ड के अंदर एक रस्ता पिछले १५ सालो से नही बना था और कोर्ट मॅटर चल रहा था बाद मै इनिशेटीव्ह किया तो प्रशासनने दोन्हो पार्टीयो को बूलाया टेबल पे बिठा के बोला की कोर्ट का डिसीजन जब आयेगा तब आयेगा जिसके फेवर मै आयेगा प्रशासन उसको टीडीआर देंगी लेकीन आप कमसे कम रोड बनाने दिजीये उसी तऱ्हेसे गार्डन मै यहापे लेटीगेशन होगा तो प्रशासन दोन्ही पार्टीयो को बुला के रास्ता निकाल सकता है। हमारा आज दोन्हो विषय लाने के पिछेका कारन एकमात्र है की प्रशासन युडीसीपीआर सेही निर्णय लेगा लेकीन कमसे कम उनको बूला के इनिशेटीव्ह लेके रिझर्व्हेशन को डेव्हलप करने कि दिशा मै काम करें इसके लिये यह दोन्हो विषय लाये गये है।

मा. उपमहापौर :-

मॅडम, खुलासा होगया है आपसे विनती है की ठराव मंजुर है तो दुसरा विषय लिजीए।

निला सोंस :-

उपमहापौर महोदय, सन्मा. सदस्यने जो बताया इसका मतलब ७०-३० का जो पहले का नियम था वही नियम है सिर्फ यहा यह बात रखी जा रही है की जो विकासक का हमारे पास ४० परसेंट है और उनके पास ६० परसेंट है और सिर्फ झगडा चल रहा है क्यो की वो ७०-३० के रेशो मै डेव्हलप नही हो रहा है उनके उपर बिठा के उनसे बात की जाये और डेव्हलप किया जाये तो मुझे लगता है सबसे पहले तो हमे यह सोचना चाहिये की जीनको ७०-३० मै दिया था क्या उन्होने आज तक आरक्षण डेव्हलप किया है ? तो नही किया है महापौर महोदया आपही के प्रभाग मै २० साल से लोक वंचित है उस गार्डन फेज-१ के बाहर वहाकी सबसे पुरानी कॉलनी है लेकीन आजतक उनको उनके अधिकार का आरक्षीत गार्डन नही मिला और आज भी वो डेव्हलप नही हूवा है जब की बिल्डींग का कार्य कम्प्लीट होने आया है।

मा. उपमहापौर :-

ठिक है आप आयुक्त के पास जाईये हंडरेड परसेंट आपका आयुक्त साहब सोल्यूशन कर देंगे ऐसा निवेदन है मॅडम ६ बज गये है आपसे निवेदन है महापौर मॅडम अभी काफी खुलासा हो गया है सभी को डिटेल्स मै बता दिया है।

मा. महापौर :-

विषय किस का हो रहा है और आप मैरे प्रभाग के उधर जा रही है जो विषय है उसीपे बात किजीए मेरे प्रभाग का विकास हो जायेगा उसके लिये डोंटवरी लेकीन जो प्रस्ताव किया है उसके उपर आपका अगर ठराव है या कुछ है ?

शॉन कोलासो :-

मॅडम, माझ्या विषयामध्ये सुचना आहेत मॅडम, आपण शहर विकास योजनेतील आरक्षण करणे बाबत चर्चा करत आहोत ह्या विषयाशी संबंधित एक महत्वाचा मुद्दा मला सभागृहाच्या निदर्शनास आणायचा आहे आमची उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी ही गावे आज मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतली गावे आहेत प्रारुप विकास योजने वर आमच्या नागरीकांनी हरकती दाखल केल्या आहेत सुचना दिल्या आहेत पण अजुन सुनावणी झालेली नाही. ह्या क्षेत्राची विकास योजना अंतीम स्वरुपात मंजुर झालेली नाही प्रक्रिया अजुनही प्रलंबित आहे. विषेश म्हणजे आपल्या पहिल्या महासभेत आपण संपुर्ण शहरासाठी एक संघ विकास योजनेचा ठराव केला मात्र शासनाने आमची गावे वगळून मिरा भाईंदर शहराची विकास योजना मंजुर केली आहे. त्यामुळे आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की शहराच्या एका भागातील विकास योजना अंतीम म्हणून आरक्षण विकसीत करण्याची प्रक्रिया पुढे नेली जात आहे तर दुसऱ्या भागातील नागरीक अजुनही सुनावणी आणि अंतीम निर्णयाच्या प्रतिक्षेत आहेत. जेव्हा आपण सर्व जन एकच महानगरपालिकेचे नागरीक आहोत तेव्हा नियोजन प्रक्रियेमध्ये आणि प्रशासनिक प्राधान्यामध्ये समानता का असु नये. प्रभाग २४ येथील नागरीकांनी कायद्याने दिलेल्या अधिकारा नुसार हरकती व सुचना दाखल केल्या आहेत त्या

हरकती व सुचना होणे त्यांचा विचार होणे आणि अंतीम निर्णय होणे हे त्यांचा वैधानिक अधिकार आहे तो अधिकार अद्याप प्रलंबित असताना आजच्या विषयाच्या माध्यमातून आमच्या भागाला नियोजनाच्या मुख्य प्रक्रिये पासून प्रवाहा पासून लांब ठेवणे योग्य ठरणार नाही म्हणून महानगरपालिका सभागृहास माझी विनंती आहे की आमच्या भागाची जी प्रलंबित विकास योजना आहे त्याची सुचनावणी व पुढील कार्यवाही तातडीने पुर्ण करण्यासाठी शासनाकडे आपण पाठपुरावा करावा. तसेच ह्या सभागृहात त्या संदर्भात निश्चित कालमर्यादा आणि सध्यस्थितीची माहिती देण्यात यावी धन्यवाद.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब, ह्या विषयावर माझी विनंती राहणार आहे की सदस्यांनी जी मागणी केलेली आहे ती लवकरात लवकर शासनाकडे पाठपुरावा करायचा असेल ते लवकरात लवकर करण्यात यावे. लोकांचे विकासाची कामे आहेत ते लवकरात लवकर करायला पाहिजे ह्या ठिकाणी आपला जो ठराव आहे तो सर्वांनुमते मंजुर करण्यात येत आहे पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ४० :-

मिरा भाईंदर शहराच्या विकास योजनेतील आरक्षणे विकसीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ४२ :-

मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील विविध प्रकारची आरक्षणे अद्याप मोठ्या प्रमाणात विकसित झालेली नाहीत. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती व मर्यादित उत्पन्न यामुळे सर्व आरक्षणे स्वखर्चाने विकसित करणे शक्य होत नाही. अनेक ठिकाणी आरक्षणाच्या जागा अपूर्ण ताब्यात असून त्या रिक्त पडून असल्याने अतिक्रमणे होण्याची शक्यता वाढत आहे.

नवीन UDCPR नियमांनुसार उपलब्ध पर्याय असूनही मागील काही वर्षांत आरक्षण विकासाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. या पार्श्वभूमीवर, आरक्षणे जलद गतीने विकसित होण्यासाठी व महानगरपालिकेवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेणे आवश्यक आहे.

१. मार्केट, पार्कींग व बेघरांसाठी घरे - सदर प्रकारची आरक्षणे समावेशक आरक्षण अंतर्गत विकसित न करता महानगरपालिकेने स्वतः विकसित करावीत. यासाठी संबंधित जागा विकास हक्क प्रमाणपत्र (TDR), खाजगी वाटाघाटी किंवा भूसंपादनाद्वारे ताब्यात घेण्यात याव्यात.

२. महापालिकेकडे आराक्षणातील ५०% पेक्षा कमी जागा ताब्यात असल्यास - महापालिकेने शासन निर्णयानुसार सदर जागेची विक्री निविदा प्रक्रिये द्वारे करावी. निविदाधारकास सदर आरक्षण तीन महिन्यांच्या आत विकसित करण्याचे काम सुरु करण्याच्या अट टाकण्यात यावी. ठरावीक कालावधीत काम पुर्ण न केल्यास अटीचे उल्लघंन मानून जागा बांधकामसह असल्यास (असेल त्या स्थितीत / जैसे तेथे स्थितीत / वर्तमान परिस्थितील जागा) जप्त करावी व पालिकेला विक्रीच्या मोबदल्यात मिळालेल्या रक्कमेची ५०% रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम परत करावी.

३. विकासकाकडे ५०% पेक्षा जास्त जागा असल्यास - आरक्षणातील उर्वरित जागा महानगरपालिका व इतर खासगी मालकांकडे असल्यास, विकासकास या दोन्ही जागा आरक्षण विकसित करण्याकरीता आवश्यक आहे. विकासकाने भूसंपादन खर्च महापालिकेत भरण्याची तयारी दर्शविल्यास महानगरपालिकेनी आपली जागा नियमानुसार विक्री करून त्याची पूर्ण रक्कम मनपा निधीत जमा करावी. उर्वरित खासगी जागा भूसंपादनाद्वारे मिळवून त्याचा खर्च विकासकाकडून वसूल करावा. संपूर्ण जागा उपलब्ध झाल्यानंतर विकासकास आरक्षण विकसित करण्यास परवानगी द्यावी. ३ महिन्यांत काम सुरू करून ठराविक कालावधीत काम पूर्ण करण्याची अट घालावी. अटींचे उल्लंघन झाल्यास सदर जागा बांधकामासहित असल्यास (असेल त्या स्थितीत / जैसे तेथे स्थितीत / वर्तमान परिस्थितील जागा) पालिकेने जप्त करावी व पालिकेला विक्रीच्या मोबदल्यात मिळालेल्या रक्कमेची ५०% रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम परत करावी.

ज्या प्रकरणांमध्ये जागा ताब्यात येत नाही, त्या ठिकाणी महानगरपालिकेने वाटाघाटी, भूसंपादन व समन्वयाची भूमिका घेऊन विकासकांना सहकार्य करावे. त्यामुळे आरक्षण विकासाला गती मिळेल व मनपाला उत्पन्न प्राप्त होईल. विकास योजनेतील जास्तीत जास्त आरक्षण विकसित करणेकरीता आवाहन करून विकासकांना व इच्छुकांना सहकार्य केल्यास नागरीकांना जास्तीत जास्त विविध आरक्षणातील सेवासुविधांचा लाभ घेता येईल. या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव :-

प्रकरण क्र. ४१, बी.एस.यु.पी. योजनेतील उर्वरीत लाभार्थ्यांना पीपीपी तत्वावर पुर्नवसन करणेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक - खाजगी भागिदारी धोरण २०२६ अन्वये सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ञ/अनुभवी सल्लागार नेमणेबाबत.

जोत्सना हसनाळे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते आपण हा विषय पुन्हा महासभेमध्ये आणलेला आहे बीएसयुपी योजनेतील जे लाभार्थी आहेत त्यापैकी आपण १,२,६ इमारतीच्या लाभार्थ्यांना घर दिलेली आहेत परंतु ३,४,५,७ ज्या इमारती सध्या उभ्या आहेत त्या इमारतींच्या लाभार्थ्यांना अजुन घरे मिळालेली नाहीत. सध्य परिस्थितीमध्ये सदरचे रहिवाशी संक्रमण शिबीरामध्ये राहत आहेत आणि तिथे राहत असताना बऱ्याच अडचणींना त्यांना सामोरे जावे लागत आहे अशा वेळेला काही लोक लोढा, दर्वेश, एसके हाईट्स, मन ह्या इमारतींमध्ये राहत आहेत, परंतु त्या ठिकाणची परिस्थिती अतिशय नाजुक आहे. पाण्याची समस्या आहे, इतर समस्या आहेत त्या लोकांना भेडसावत आहेत. तर अशा प्रसंगी प्रशासनाच्या माध्यमातून त्या समस्या तातडीने सोडविण्यात यावे संबंधित अधिकाऱ्यांना आपण त्वरीत तशा सुचना देवून त्यावर योग्य की कार्यवाही करायला लावावी. तसेच आदिवशी जे बांधव आहेत जे २ नंबर इमारतींमध्ये राहत आहेत त्या लाभार्थ्यांचे अजुन रजिस्ट्रशेन झालेले नाही तर त्यांचे रजिस्ट्रेशन आपण लवकरात लवकर करुन घ्यावे तसेच १० व्या माळ्या पर्यंत इमारत क्र.२ ह्या ठिकाणी १० व्या माळ्या पर्यंत नागरीकांना आपण घरे दिलेली आहेत परंतू जे वरचे माळे रिकामे आहेत त्यांना आपण अजुन घरे दिलेली नाहीत तर बरेचशे लाभार्थी अजून वंचित आहेत त्यांना आपण ती घरं देवू शकतो ह्या साठी सुध्दा आपण निर्णय घेणे फार गर्जेचे आहे. ह्या विषयाच्या संदर्भामध्ये मा. आयुक्त साहेब आणि संबंधित विभागाचे व संबंधित सर्व प्रभागाचे नगरसेवक आयुक्त साहेब आपणास कळवू इच्छीते की आपल्या दालनामध्ये आमची मिटींग झाली होती परंतु त्या नंतर सुध्दा परिस्थिती जशी आहे तशीच आहे ठेकेदारा मार्फत अजुनही काही कार्यवाही केलेली नाही त्यामुळे तेथील नागरीक हे नगरसेवकांना दोषी समजून प्रत्येक वेळेला ह्या संदर्भामध्ये विचारणा करत आहेत. तर कृपया आपण ह्याकडे जातीने लक्ष द्यावे ठेकेदारांना त्वरीत आदेश देवून ह्या संदर्भात जी काही कारवाई बाकी आहे कामाची परिस्थिती पाहून त्यांना प्रगती पथावरती काम करण्यास लावावे अशी आपेक्षा सुध्दा आपणा कडून करते. आज ह्या विषया संदर्भामध्ये आपणास एक कळवू इच्छीते की त्याठिकाणी जे भाडोत्री राहत आहेत त्यांनी त्याठिकाणी अतिशय नाजूक परिस्थिती निर्माण केलेली आहे. कारण त्या ठिकाणी अवैध धंदे सुरु आहेत आणि अवैध रितीने त्या ठिकाणी बारबाला राहत आहेत तर त्यांच्या वरती त्वरित कारवाई करावी असे निवेदन आपल्या मिटींगमध्ये सुध्दा मी दिलेले होते परंतु त्यावर अजुन पर्यंत काही कारवाई झालेली नाही कृपया आपणास विनंती आहे की संबंधित विभागा मार्फत आपण त्वरित कारवाई करावी. आता गेल्या आठवड्या पुर्वी एक प्रसंग असा घडला की घरात त्या इमारतीमध्ये एक माणूस मृत अवस्थेत तीन दिवस तसाच राहिला होता परंतू सदर प्रसंगी अशा प्रसंगी प्रशासनाचं दुर्लक्ष त्याठिकाणी होत आहे आणि याबरोबर नागरीक नगरसेवकांना दोषी ठरवत आहेत म्हणून कृपया प्रशासनाने त्वरित याबाबत कारवई करावी आणि जे काही भाडोत्री आहेत त्यांचा सर्व्हे करुन असे ज्या अवैध धंदे करणारे लोक असतील जसे गांझा विक्रि करत आहेत तिथे अनैतीक धंदे होत आहेत तर ते थांबविले पहिजेत अशी आमची अपेक्षा आहे. कृपया आपण जातीने ह्याकडे लक्ष द्यावे कारण पुन्हा पुन्हा सांगुण जर त्यावर काही कार्यवाही होत नसेल तर नागरीक त्रस्त होऊन ह्याठिकाणी अनेक आंदोलण किंवा धरणे अशा प्रध्दतीचा व्यवहार ह्या पालिकेमध्ये होऊ शकतो अशी अपेक्षा नाकारता येत नाही म्हणून आपणास विनंती आहे की आपण ह्या विषयामध्ये आता जो कंसल्टंट नेमत आहात त्याबद्दल आम्ही आपले अंभिनंदनच करत आहोत कारण जे काही सदणीका बाकी आहेत १९७६ तर अशा नागरीकांना लाभार्थ्यांना घराची अपेक्षा आहे परंतू ह्या सदणीका जर पीपीपी तत्वावर केल्यास त्यांना घरे मिळतील म्हणून अतिशय चांगला उपक्रम आपण ह्या ठिकाणी करत आहात म्हणून आपणास धंन्यवाद देते. आणि ह्या संदर्भामध्ये मी माझा ठराव मांडत आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत "शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे" (BSUP) या उपक्रमा अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे काशी येथील सर्व्हे क्र. ९०,९४,१०७/१अ व मौजे. मिरा येथील सर्व्हे क्र.७८ व ८० चे एकुण ८१७८६.९१३ चौ. मीटर क्षेत्रावरील शासकीय जागेवर सदर योजना मंजूर करण्यात आली होती.

जनतानगर व काशीचर्च झोपडपट्टीमधील प्रकल्पाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	तपशील	लाभार्थी / सदनिका संख्या
१.	एकूण मंजूर घरांचा प्रस्ताव	४,१३६ लाभार्थी
२.	संक्रमण शिबिरात (Transit Camp) स्थलांतरित केलेले	२,३५० झोपडीधारक
३.	प्रत्यक्ष सदनिकांचे वाटप पूर्ण	४७३ लाभार्थी
४.	सद्यस्थितीत बांधकाम सुरू असलेल्या सदनिका	१,६८७ सदनिका
५.	अद्याप बांधकाम बाकी असलेल्या सदनिका	१,९७६ सदनिका

सद्यस्थितीत सदर प्रकल्पास केंद्र व राज्य शासनाचे अनुदान बंद झाल्याने बी.एस.यु.पी. प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या बंद झाला आहे. सध्या सुरू असलेले काही इमारतींचे बांधकाम महानगरपालिकेच्या निधीतुन व एम.एम.आर.डी.ए कडून घेतलेल्या कर्जातून केले जात आहे. यामुळे महानगरपालिकेवर प्रचंड आर्थिक भार पडत आहे.

पी.पी.पी. तत्वावर उर्वरित १९७६ झोपडीधारकांच्या सदनिकांचे बांधकाम केल्यास महानगरपालिकेस आर्थिक भुर्दंड बसणार नाही.

नवीन यु.डी.पी.सी.आर अन्वये एफ.एस.आय मध्ये वाढ झाली असल्याने पालिकेला सपूर्ण जागेत किती एफ.एस.आय मिळणार आहे, त्यापैकी किती एफ.एस.आय झोपडपट्टीधारकांना द्यावा लागेल या संपुर्ण प्रकल्पाकरीता येणारा खर्च वजा जाता पालिकेला मिळणारे महसूल/उत्पन्न या सर्व तांत्रिक बाबी तपासण्याकरीता तसेच शासन धोरणानुसार पी.पी.पी. तत्वावर / खाजगी विकासकाकडून सदर प्रकल्प राबविणेकरीता तज्ञ आर्किटेक्टची नियुक्ती करुन प्रशासनाने प्रकल्प सुरु करुन योजना लवकरात लवकर पुर्ण करणेकरीता प्रस्ताव ०१ महिन्यात महासभेत सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच काशीगाव मेट्रो ९ कामात विकास योजना रस्त्यांमधील जागा भुसंपादन करावयाचा प्रस्ताव प्रशासनाने जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे पाठविला आहे. सदर जागा भूसंपादनाव्दारे ताब्यात घेण्यास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या नविन धोरणानुसार केंद्र शासनाच्या जागेवरील वसाहतींची (झोपडपट्टया) जागा ताब्यात घेण्यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस, ही सभा मान्यता देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

अनिल भोसले :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो माझे गाव चोरी झाले आहे माझ्याकडे चायना गावा मध्ये एक आदिवाशी गाव होत पिढ्यान पिढ्या चार पिढ्यां पासून राहत होतं त्या मधून काही आदिवाशीचे घर त्याठिकाणी जे काही मँग्रोज होते त्याठिकाणी डबल माढ्याचे तिथून स्थलांतरित करायला घेतले आणि त्याठिकाणी मोठ त्याच बाड्या आणि गरीबाचं कारट एखाद्याचं रिपेअरचे असेल तर तोडायला जातो डबल माढ्याचे बंगलो टाईप ते आदिवाशीचे घरं स्थलांतरीत करुन चायन्याचा त्या मॅग्रोज भरलेल्या ठिकाणी डबल माढ्याचे घरं झाले आहेत आणि त्याच्यावर अनेक तक्रारी झाल्या कारवाई झाली नाही. आणि जो शासनाकडून ४.५ करोडचा निधी आणून जो रस्ता बनविला होता तो कुठल्या गावासाठी बनवला ? आदिवाशी वाड्याचा पाड्यावरी म्हणून तो रस्ता बनवला ते गावच स्थलांतरीत करायला घेतलं तिथून हटवून नविन घरं बांधायला घेतली आणि ते आदिवाशी पिढ्यान पिढ्या पासून ते आणले गेले की आदिवाशी राहत होती ते घरं आणली गेली होती मला प्रशासनाने ह्या बद्दल खुलासा करण्यात यावा चायना गावामध्ये ह्या ठिकाणी जो प्रोजेक्ट चालला आहे त्याठिकाणी आदिवाशी बांधव पिढ्यान पिढ्यापासून राहतात त्यांना तिथून हटवायला घेतले आणि रस्ता चोरी झाला आहे रस्ता चोरी झाला तो शेतावर गेला आता घरं चोरी व्हायला लागली आहेत याचा प्रशासनाने खुलासा करावा. दुसर आमच्याकडे एक बाईक कंपनी म्हणून आहे रिपीयर परमिशन घेतली दुसऱ्या नावाने जुने स्ट्रक्चर दाखवून आणि खालून वर पर्यंत.....

मा. महापौर :-

सर्व ठिकाणी सर्वांचे तेच विषय आहेत.

अनिल भोसले :-

मॅडम, माझा विषय संपलेला नाही परमिशन दुसऱ्याचा नावाने बांधकाम खालून तिसरंच केलं आहे बाईक कंपनी म्हणून आहे त्या बाईक कंपनी मध्ये जुन बांधकाम दाखवलं दुसरं आणि खालून वर पर्यंत तिसरच अनलिगल बांधकाम आहे डबल माढ्याचं तिसरं कावेरी कंपनी मध्ये रिपेयरच्या नावाने पुर्ण मोठ अनलिगल बांधकाम केले आहे, तिसरं गावठान मध्ये मारुती शोरुमच्या बाजूला जुनी कंपनी दाखवून आजू बाजूचं पुर्ण अनलिगल बांधकाम केले आहे त्याच्यावर कुठली कारवाई होत नाही.

मा. महापौर :-

पानपट्टे साहेब हे काय चालू आहे, ह्या विषयावर गंभीर पणे घ्यावा. आपले जे प्रभाग अधिकारी आहेत ते इथे उपस्थित होतच नाहीत.

श्रीप्रकाश सिंह :-

महापौर मॅडम आपने आधा घंटा हूवा घडीके हिसाब से सबको बूलाया कोई आया नही चार जन गये चार जन आये जब सत्ताधारी विरोधी जो चिल्लाते है वो सही है सत्ताधारी चिल्ला रहा है उनको कोई सुनवाई नही हो रहा है सभापती मॅडम बोल रहे है उनका कोई सुनवाई हो रहा है तो महासभा मै आके करने का क्या ?

मा. महापौर :-

जब तक वो नही आयेंगे तभी तक हम यहीपे बैठने वाले है।

श्रीप्रकाश सिंह :-

किसी का सुनवाई नही होता है कारवाई नही होता है तो इधर आके क्या करने का है ?

अनिल भोसले :-

अनलिगलच्या नावाने मोठे काम चालू आहेत आमदारांचे काम चालू आहेत त्यांच्यावर कारवाई होत नाही फेरीवाल्यांवर कारवाई होते ह्या शहरामध्ये एकच कायदा असवा मोठ्याला एक कायदा आणि बारक्याला एक कायदा एक जण गाव चोरी करुन अनलिगल मँग्रोजमध्ये बांधू शकतो तर गरीब घर रिपेरींग करु शकत नाही का ? याचं धोरण निश्चित करावे सगळ्यांसाठी मिरा भाईंदर शहरामध्ये झोपडपट्टी साठी पण गरीबांसाठी कायदा असायला पाहिजे मग झोपड्डीवाल्यांनी पण का घरे बांधू नये एक आदिवशीचे गावाचे गाव स्थलांतरीत केले जाते मँग्रोजमध्ये नेवून बांधले जाते त्याला परवानगी मिळते प्रशासन कारवाई करते ती गरीबांवर का कारवाई करते जे कोणी आदिवाशी घरे बांधत असतील ग्रामिन पिढ्यान पिढ्या पासून राहत असतील त्यांनी रिपेअर करु नये का ?

मा. महापौर :-

आपण सर्व अधिकाऱ्यांना टप्या टप्याने सांगितलेले आहे की जे नविन बांधकाम करत आहेत ते टप्या टप्याने आपल्याला करायचे आहे.....

अनिल भोसले :-

नविन बांधकामाला आमचा विरोध नही जे जुने लोग दोन फुट पत्रे वरती घेतले त्याचे जावून तोडतात आणि जे खाल पासून परमिशनच्या नावाने अनलिगल पुर्ण बांधकाम करतात ते बाईक कंपनीचे पुर्ण पणे अनलिगल

बांधकाम केले आहे दुसर परमिशन दाखवून तिसर बांधकाम केले गेल्या वेळी मी आरोप केला होता ते बोलले की मंत्र्यावर आरोप करायचा नाही त्यावेळेस आणि आपल्या काही नेत्यांनी म्हणजे विरोधकांनी आरोप केला होता. मॅडम त्या ठिकाणी आदिवाशी वाड्यापाड्याचे जे गांव आहे अख्ख गावच हटवायला घेतले आहे.

ज्योत्सना हसनाळे :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते गेल्या मिटींगमध्ये सुध्दा चेण्याचा विषय झाला होता मी म्हटलं होतं की जो कोणी तिथे बिल्डर अनधिकृत पणे काम करत असेल त्याच्या वरती कारवाई करावी आपण आदेश पण दिला होता त्या संदर्भामध्ये ह्याच महासभेमध्ये आणि प्रशासनाने त्याच्या वरती कुठल्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. तर मला हे म्हणायचे आहे की जेव्हा महापौरांनी इथे तीन चार महिन्या पुर्वी सांगितले होते की अनधिकृत बांधकाम ह्या शहरामध्ये जाले नाही पाहिजे प्रभाग अधिकाऱ्यांना वारंवार सुचना देण्यात आल्या आज मा. महासभा आहे आणि महासभेत हा विषय आहे आणि हा विषय असताना अधिकारी ह्या ठिकाणी उपस्थित नाहीत आणि मा. महापौरांनी एक तासा पुर्वी सांगितले की अधिकाऱ्यांना बोलवा तरी अधिकारी आले नाहीत हे चुकीचे आहे.

मा. महापौर :-

तूम्ही तुमचा विषय सांगा मी माझा विषय सांगते.

ज्योत्सना हसनाळे :-

परंतु मॅडम ही गोष्ट तर आहेतच ह्या साठी तर काही तरी करायला पाहिजे हे चुकीचे आहे.

अनिल भोसले :-

मॅडम गांव चोरी झाले आहे त्याचे उत्तर प्रशाासन देईल का ? माझ्याकडे आदिवाशीचे गाव चोरी झाले आहे त्याचे उत्तर मला प्रशासनाकडून पाहिजे.

ज्योत्सना हसनाळे :-

प्रभागात अनधिकृत बांधकाम होईल आम्ही दोषी राहणार नाहीत पहिला सांगतो.

जय ठाकूर :-

मा. महापौर मॅडम, सारे चमत्कार जो है इन्ही लोगो के साथ नही हूये कुछ चमत्कार हमारे साथ भी हूये है हमारे प्रभाग मै तो गटर के उपर घर बना कर के उनके बिल्डर के लेबर रह रहे है और अपना गोडाऊन भी बना रखा है । फोन कर के १० बार बोला हूँ की गटर के उपर बनाया है कही और बनाया ठिक है वहापे आपका उनके बिल्डर का स्टाफ रह रहा है वहापे उन्होने गोडाऊन बना दिया है लेकीन आज तक कभी वहापे कोई व्हिजीट नही किया और कोई कारवाई नही हूई । सिंगापुर प्लाझा देख लिजीये पुरा रोड भरा रहता है बानेकर गल्ली, लोधा रोड रिटन मै कम्प्लेंड किया हू लेकीन आज तक कभी कारवाई नही हूई । मांडवी गाव ले लिजीए, उत्तन ले लिजीये हर जगह अनधिकृत बांधकाम इतना हो रहा है और जहा गटर के उपर इतना बढा बना दिया है लोग रह रहा है आने जाने का रस्ता ब्लॉक है तो चमत्कार हर जगह है तो बहूत इमपॉर्टंट विषय है और जोभी अधिकारी होंगे उनको सस्पेंड करना चाहिये अगर कारवाई नही किये तो ।

मा. महापौर :-

यह सभी नगरसेवक अपने अपने वॉर्ड का बोल रहे है आयुक्त साहब आप यह गंभीरता से लिजीए क्यो की मुझे ऐसा लगता है सभीने अपना अपना विषय मांडा है जिसने नही मांडा है उनके भी बहूत सारे ऐसे विषय है वो अनधिकृत बांधकाम जबसे मैने यहापे पद ग्रहन किया है तब से हमने एक पॉलिसी निर्माण की है की झीरो टोल्डरेंस यह मिरा भाईंदर मै हम लागु करेंगे और जब तक मै यहापे हूँ और रहूँगी तब तक यह चलता रहेगा । मै चाहती हू की मुझे ऐसी बहूत सारी कंम्प्लेड आती है एक नगरसेवक यहापे कंम्प्लेंड की है की यहापे यह तोडक कारवाई करनी है लेकीन उसके ही प्रभाग के दुसरे नगर सेवक बोलते है की यह कारवाई नही करनी है ऐसे बहूत सारे प्रभाग मै ऐसा निर्माण हूवा है तो मै आपको यहासे पुरी छुट देती हूँ की जोभी अनधिकृत बांधकाम है कोईभी नगरसेवक का आप लोग सुनोगे नही यहा तक की हमारे आदरणीय नरेंद्र मेहताजी हो सेव्हन इलेव्हन हो, मंत्री महोदय अपने प्रताप सरनाईजी हो उपस्थित हमारे मुझ्झफर हूसेन किसी काभी फोन आप अटेंड नही करेंगे किसी का कोई भी बाद सुनेंगे नही अनधिकृत बांधकाम यह शहर मै बंद होना चाहिये । नगर सेवक तो दुरकी बात है मेने सब का नाम ले लिया है आप बोलते हो वो नगर सेवकने ना बोला है वो नगरसेवकने हा बोला है वो आमदारजी का कॉल आया है इसका आया है कोन देखने गया मुझे कब दिखाया किसका आया किसका नही आया आप लोगोने ? परस्पर ऐसेही बोल देते है ऐ फोन आया नही करना है वो फोन आया नही करना है इधर से बोला ऐ नही करना है यह आज यह शहर मै चल रहा है ऐ क्या चल रहा है किसी काभी नही सूनना है जो अनधिकृत बांधकाम के लिये बोल रहे है जो टपरी के लिये बोल रहे है अनधिकृत हम देते जा रहे है देते जा रहे है प्रशासन का कामकाज अब पुरा हो चुका है हम यहापे बॉडी मै आके आप लोगो को जो सच्चाई है वो यहाके नगरसेवक बोलने की कोशीश कर रहे है आप लोग सुन क्यो नही रहे हो कोई भी नगरसेवक अनधिकृत

बांधकाम के लिये कोई भी फोन नही करेगा की यह नही करना है आज मेरी यहासे सभी को विनती है अब हम लोग देखते है की यह लोग कैसा करते है जबी भी हम लोग बोलते है आप लोग बोलते है या कोईभी बोल देता है तो वो लोग बोल देते है की इसका फोन आया उसका फोन आया अब किसी की परवानगी फोन की नही है अब हम लोग देखते है आप कैसे कारवाई करते हो। अगली महासभा तक अगर सब लोगो का कुछ भी काम नही होता है जो अनधिकृत बांधकाम है वो नही तोड दिया जाता है तो अगली महासभा स्पेशल खाली यह विषय पे होने वाली है और आप लोगो को जवाब देना पडेगा आज भलेही यहापे वॉर्ड ऑफिसर नही है सभी को इधर आना पडेगा आज भले बैठे होगे मुझे पता है क्योकी यह सभी लोगो की कंम्प्लेंड कहीना कही है और मुझे पता है कोन नगर सेवक कहा जाता है क्या करता है सब कुछ मुझे पता है जो नही बोल रहे है जो बोल रहे है चाहे वो कोईभी पार्टी का रहे लेकीन आज मै यहा से सभी को निवेदन देती हूँ की आप लोगो का जो झीरो टोल्डरेंस निती हम लोगोने इस शहर मै अपनाई है तो वो चालू रहेगी और हम उसपे काम करते रहेंगे।

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, नियम के हिसाब से हमारी महासभा ७ बजे खतम हो जाती है मेरा एक निवेदन है। आपके संमती से हम १५-२० मिनिट समय की अवधी बढाने के लिये मै निवेदन करता हूँ और सभी की मंजुरी हो तो १५-२० मिनिट सभा का समय बढा कर के आजके विषय पुरे कर लेते है।

मा. महापौर :-

सभी लोगो की मंजुरी है क्या ? ठिक है अभी मैने क्लियर कर दिया है किसी काभी फोन अटेंड नही करना है कोई भी हो मैने सब के नाम ले लिये है ऐंड से लेके मंत्रीजी तक और यहा के नगर सेवकतक सब के नाम ले लिये है किसी काभी फोन अटेंड आप लोगो को अटेंड नही करना है कोईभी बात हो अब आप किस तऱ्हसे काम करते है वो हमे दखना है अगली महासभा तक अधिकारी नही करेंगे उसको निलंबन करने की हम लोगो की पुरी तयारी अगली महासभे तक रहेगी सचिव महाहोदय आगेका विषय लिजीये।

प्रकरण क्र.४२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत होणाऱ्या अनधिकृत बांधकामास जबाबदार असणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करणे आणि अनधिकृत बांधकाम रोखणेकरिता प्रशासनाने उपाययोजना करणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. ४४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकाम होऊ नये, याबाबत मा. महापौर यांनी अनधिकृत बांधकामाबाबत झिरो टॉलरंन्स पॉलिसी जाहिर केली होती. सर्व प्रभाग अधिकारी, उपायुक्त अतिक्रमण,अतिरिक्त आयुक्त अतिक्रमण, मा.आयुक्त या सर्वांना मा. महापौरांनी अनधिकृत बांधकामावर कडक कारवाई करणेबाबत निर्देश दिले होते.

याउपरही शहरामध्ये अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अनेक लोकप्रतिनिधी, शहरातील नागरिक वारंवार तक्रार करुनही प्रशासनातर्फे कारवाई अपेक्षेप्रमाणे होत नाही. अनधिकृत बांधकामावर नियंत्रण व कार्यवाही करणेस प्रशासनास अपयश आल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियंमाच्या तरतूदीनुसार तसेच शासन निर्णय दि.२८/०२/२००८, दि.०२/०३/२००९, दि.०६/०५/२०१६, दि.१०/०३/२०१७, दि.०३/०५/२०१८ व दि.२५/०४/२०२५ प्रमाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवणे, निष्काशित करणेची जबाबदारी, सर्व प्रभाग अधिकारी, उपायुक्त अतिक्रमण, अतिरिक्त आयुक्त अतिक्रमण, मा.आयुक्त यांची असून त्यावर अमंलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. याउपर अनधिकृत बांधकाम झालेल्या कार्यक्षेत्रातील जबाबदार अधिका-यांवर पालिका प्रशासनाने त्यांना व्यक्तीश जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करणे अपेक्षित असतानाही अद्यापपर्यंत अधिकां-यावर निष्काशित व निलंबनाची कार्यवाही केली नाही.

शासनाने पारित केलेल्या निर्णयानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनधिकृत बांधकामाबाबतच्या तरतुदीनुसार प्रशासनाने अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी संबधित अधिका-यांवर असून अंतिम जबाबदारी मा. आयुक्तांची आहे. त्यामुळे मा. आयुक्तांनी याबाबत कडक कारवाई करुन अहवाल महासभेत सादर करावा. तसेच यापुढे अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण निष्कासन, अनधिकृत फेरीवाले, विविध स्टॉल्स, गॅरेजेस इत्यादींवर केलेल्या कार्यवाहीबाबतचा मासिक अहवाल वेळोवेळी मा. महासभेस सादर करावा.

अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निष्काशित करण्याची मोहिम राबविणेकरीता मनुष्यबळ कमी असल्यास तात्पुरत्या स्वरुपात तीन महिन्यांच्या कालावधीकरीता मनुष्यबळ उपलब्ध करणेस व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदन :- श्री. मनोज दुबे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने सन्मा. सदस्या नीला सोन्स यांची पुरक घोषणा आहे. प्रकरण क्र.४३, सन्मा. सदस्या नीला सोन्स यांचा दिनांक १५/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महासभेचे थेट प्रक्षेपण (Live प्रसारण) सुरू करण्याबाबत.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम माझी विनंती आहे की सगळे "ज" चे प्रस्ताव एकत्र घ्यावेत.

निला सोंस :-

महापौर महोदया "ज" के प्रस्ताव पे ठराव होता है सभी विषय का ठराव एकसाथ नही हो सकता है। विषयानुसार ठराव होता है।

मा. महापौर :-

विषय वाचा.

महापालिका सचिव :-

सन्मा. सदस्या नीला सोन्स यांचे प्रस्ताव आहेत. प्रकरण क्र.४४,. सन्मा. सदस्या नीला सोन्स यांचा दिनांक १५/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- बी.ओ.टी. तत्त्वावर बांधलेल्या मार्केट पुन्हा बी.ओ.टी. तत्त्वावर देण्यात आलेले निविदा रद्द करण्याबाबत. प्रकरण क्र. ४५, सन्मा. सदस्या नीला सोन्स यांचा दिनांक १५/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- विकासकांना (बिल्डर्सना) पुनर्विकासाच्या माध्यमातून लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेच्या स्ट्रक्चरल ऑडिट विभागामार्फत धोकादायक नसलेल्या इमारतींनाही संशयास्पद पद्धतीने धोकादायक घोषित करून नोटिसा बजावणे, रहिवाशांवर घरे खाली करण्यासाठी दबाव निर्माण करणे, संभाव्य भ्रष्टाचार व संगनमतास प्रतिबंध करण्यासाठी निष्पक्ष चौकशी समिती गठित करणे, पुनर्निरीक्षण, अंतरिम स्थगिती तसेच थर्ड पार्टी स्ट्रक्चरल ऑडिट व्यवस्था लागू करण्याबाबत. सन्मा. सदस्य श्री. संजय थेराडे यांचा प्रस्ताव आहे. प्रकरण क्र.४६, सन्मा. सदस्य संजय थेराडे यांचा दिनांक १६/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- शहरातील खेळाची मैदाने, टर्फ (Turf) आणि उद्यानांमध्ये विविध संस्थांना व्यावसायिक / खाजगी कार्यक्रम आयोजित करण्यास परवानगी न देण्याबाबत.

भगवती शर्मा :-

"ज" अन्वये आलेले सर्व प्रस्ताव फेटाळण्यात येत आहेत. प्रशासनाने आलेल्या प्रस्तावाचे गांभिर्याने विचार विनिमय करून आवश्यक / अतिमहत्वाचे प्रस्ताव वाटल्यास रितसर मा. महासभेपुढे सादर करावेत, तसेच यापुढे महासभेकरीता "ज" अन्वये प्रस्ताव सदस्यांनी सादर केल्यास त्यातील अतिमहत्वाचा / आवश्यक वाटल्यास मा. महापौरांनी एकच प्रस्ताव मा. महासभेच्या विषयपत्रिकेवर घ्यावा, असा मी ठराव मांडत आहे.

मदन सिंह :-

माझे अनुमोदन आहे.

निला सोंस :-

महापौर महोदय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तहेत ज के प्रस्ताव जो लाता है उसे अपना ठराव रखने का अधिकार है। तो उस अधिनियम तहेत अधिकार जो सभागृह सन्मान है की मै ठराव लाई हू। ठराव पे फैसला करना नही करना सन्मा सदस्य वो महासभा का है। तो मै अपना ठराव रखना चाहती हूँ।

मा. महापौर :-

लेकीन अभी उन्होने चारो विषय के उपर ठराव किया है और उन्होन अपना प्रस्ताव रखा हूवा है की अती महत्वाचा वाटल्यास महापौरांचा एकच प्रस्ताव महासभेत विषय पत्रिकेवर द्यावा. सचिव महोदय त्याच्यात काय नियम आहे मला सांगा. करु शकतो की नाही रुल मध्ये आहे का ?

महापालिका सचिव :-

रुल मध्ये तशी तरतुद नाही.

मा. महापौर :-

ठिक आहे हा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ४३ :- महासभेचे थेट प्रक्षेपण (Live प्रसारण) सुरू करण्याबाबत.

प्रकरण क्र. ४४ :- बी.ओ.टी. तत्त्वावर बांधलेल्या मार्केट पुन्हा बी.ओ.टी. तत्त्वावर देण्यात आलेले निविदा रद्द करण्याबाबत.

प्रकरण क्र. ४५ :- विकासकांना (बिल्डर्सना) पुनर्विकासाच्या माध्यमातून लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेच्या स्ट्रक्चरल ऑडिट विभागामार्फत धोकादायक नसलेल्या इमारतींनाही संशयास्पद पद्धतीने धोकादायक घोषित करून नोटिसा बजावणे, रहिवाशांवर घरे खाली करण्यासाठी दबाव निर्माण करणे, संभाव्य भ्रष्टाचार व संगनमतास प्रतिबंध करण्यासाठी निष्पक्ष चौकशी समिती गठित करणे, पुनर्निरीक्षण, अंतरिम स्थगिती तसेच थर्ड पार्टी स्ट्रक्चरल ऑडिट व्यवस्था लागू करण्याबाबत.

प्रकरण क्र. ४६ :-

शहरातील खेळाची मैदाने, टर्फ (Turf) आणि उद्यानांमध्ये विविध संस्थांना व्यावसायिक / खाजगी कार्यक्रम आयोजित करण्यास परवानगी न देण्याबाबत.

ठराव क्र. ४५ :-

"ज" अन्वये आलेले सर्व प्रस्ताव फेटाळण्यात येत आहेत. प्रशासनाने आलेल्या प्रस्तावाचे गांभिर्याने विचार विनिमय करून आवश्यक / अतिमहत्वाचे प्रस्ताव वाटल्यास रितसर मा. महासभेपुढे सादर करावेत, तसेच यापुढे महासभेकरीता "ज" अन्वये प्रस्ताव सदस्यांनी सादर केल्यास त्यातील अतिमहत्वाचा / आवश्यक वाटल्यास मा. महापौरांनी एकच प्रस्ताव मा. महासभेच्या विषयपत्रिकेवर घ्यावा, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- श्री. मदन सिंग

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव :-

प्रकरण क्र.४७, के. अन्वये प्रस्ताव - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत विकास योजनेत ३० मीटर रुंदीचा रस्ता बनविण्याकरीता प्रस्ताव .

वर्षा भानुषाली :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत विकास योजनेत ३० मीटर रुंदीचा रस्ता एम.एम.आर.डी.ए. निधीतून बनविण्याचा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणाकडुन दि.१६/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस कळविण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने सदर काम हे एम.एम.आर.डी.ए. निधीतून करुन घेण्यास व त्याकामी निविदा मागविणेस मान्यता देण्याचा प्रस्तावास, ही सभा मान्यता देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

जयेश भोईर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र.४७ :-

के. अन्वये प्रस्ताव - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत विकास योजनेत ३० मीटर रुंदीचा रस्ता बनविण्याकरीता प्रस्ताव .

ठराव क्र. ४६ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत विकास योजनेत ३० मीटर रुंदीचा रस्ता एम.एम.आर.डी.ए. निधीतून बनविण्याचा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणाकडुन दि.१६/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस कळविण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने सदर काम हे एम.एम.आर.डी.ए. निधीतून करुन घेण्यास व त्याकामी निविदा मागविणेस मान्यता देण्याचा प्रस्तावास, ही सभा मान्यता देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली अनुमोदन :- श्री. संजय थरथरे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, विषय पत्रिका संपलेली आहे मगाशी सना मॅडम यांना त्या विषयावर बोलायचे होते बांगर साहेबांना एक मिनिट बोलवले तर बर होईल छोटा विषय आहे.

मा. महापौर :-

त्यांना स्व:ता भेटून घ्या तुमचा जो पण विषय असेल तो विषय महासभेमध्ये नाही. शोक प्रस्ताव असेल तर मांडा.

अनिल सावंत :-

मॅडम विषय महत्वाचा आहे त्यांच्या वॉर्ड मध्ये एका इमारतीच्या बाजूला रोड बनला रोड मोठा झाला बिल्डींग खालती गेली पावसाळ्यामध्ये पाणी भरणार त्या मोटरसाठी ज्यावेळी आमचे लोक प्रतिनिधी त्यांच्या कडे गेले तेव्हा त्यांनी स्पष्ट पणे नकार दिला आम्ही मोटर त्याठिकाणी लावणार नाहीत म्हणून.

मा. महापौर :-

मोटरचा विषय ज्या ठिकाणी आपात्कालिन विषय असतो त्याठिकाणी आपण प्रस्ताव दिलेला आहे तर ते करणार.

सना देखमुख :-

मॅडम तुम्ही सांगितले की त्यांना परसनली भेटा मी परसनली भेटायला गेले त्यांनी ते ऐकले नाही म्हणून आज जेव्हा ते येथे आले तेव्हा मला असं वाटलं.....

मा. महापौर :-

मी आता सांगत आहे तुमचा मोटरचे काम नाही केले तर माझ्याकडे जा त्यांनी ते केले पाहिजे. पावसामध्ये मोटरची सुविधा सर्व ठिकाणी लागणार आहे ज्यांचा ज्यांचा प्रस्ताव असतील त्या नगरसेवकांनी आपले प्रस्ताव द्यावेत पण असे व्हायला नको की ज्या ठिकणी गरज नाही त्याठिकाणी मोटर लावली पाहिजे असे दाखविण्या साठी लावण्यात येऊ नये ज्या ठिकाणी गरज आहे त्याठिकाणी लावण्यात यावी अशी माझी प्रशासनाला विनंती आहे. अशा प्रकारे ज्या मोटर लागतील त्या सर्व ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने सर्व ठिकाणी मोटर लावली पाहिजे शोक प्रस्ताव असतील तर मांडा.

शर्मिला बगाजी :-

मिरा भाईंदर महानगपालिके चे माजी नगरसेवक तथा माजी स्थायी समिती सभापती कै.दिनेश नलावडे यांच्या दु:खद निधनाबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा तीव्र शोक व्यक्त करते. कै. दिनेश दगडू नलावडे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून केली. सामाजिक, राजकीय व सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत राहून त्यांनी आपल्या कार्य कुशलतेचा प्रामाणिकपणाचा व जनसेवेच्या वृत्तीचा ठसा उमटवला. सर्वसामान्य नागरीकांशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्तापित करुन त्यांनी लोप्रतिनिधी म्हणून जनतेचा विश्वास व आदर संपादन केला. मिरा भाईंदर महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून कार्यरत असताना त्यांनी विविध विकास कामांमध्ये महत्वपुर्ण योगदान दिले. तसेच स्थायी समिती सभापती या सारखी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडून प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य केले. त्याची शांत, संयमी, अभ्यासू व लोकाभिमूख कार्यपध्दती सर्वांसाठी प्रेरणादायी होती. त्यांच्या निधनामुळे मिरा भाईंदर शहराच्या सामाजिक व राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली असून एक कर्तव्यदक्ष लोकाभिमूख व लोकप्रिय जननेता काळाच्या पडद्या आड गेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा दिवंगत कै. दिनेश दगडू नलावडे यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. तसेच ईश्वर चरणी प्रार्थना करते की त्यांच्या पुण्यात्म्यास चिरशांती लाभो व त्यांच्या दु:खी कुटूंबियांना हे दु:ख सहन करण्याचे बळ प्राप्त होवो. भावपुर्ण श्रध्दांजली.

महापालिका सचिव :-

कृपया दोन मिनिटे स्तब्धता पाळावी, ओम शांती, ओम शांती ओम शांती.

शोकप्रस्ताव क्र. ४६अ :-

मिरा भाईंदर महानगपालिकेचे माजी नगरसेवक तथा माजी स्थायी समिती सभापती कै.दिनेश नलावडे यांच्या दु:खद निधनाबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा तीव्र शोक व्यक्त करते. कै. दिनेश दगडू नलावडे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून केली. सामाजिक, राजकीय व सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत राहून त्यांनी आपल्या कार्य कुशलतेचा प्रामाणिकपणाचा व जनसेवेच्या वृत्तीचा ठसा उमटवला. सर्वसामान्य नागरीकांशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्तापित करुन त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून जनतेचा विश्वास व आदर संपादन केला. मिरा भाईंदर महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून कार्यरत असताना त्यांनी विविध विकास कामांमध्ये महत्वपुर्ण योगदान दिले. तसेच स्थायी समिती सभापती या सारखी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडून प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य केले. त्याची शांत, संयमी, अभ्यासू व लोकाभिमूख कार्यपध्दती सर्वांसाठी प्रेरणादायी होती. त्यांच्या निधनामुळे मिरा भाईंदर शहराच्या सामाजिक व राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली असून एक कर्तव्यदक्ष लोकाभिमूख व लोकप्रिय जननेता काळाच्या पडद्या आड गेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा दिवंगत कै. दिनेश दगडू नलावडे यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. तसेच ईश्वर चरणी प्रार्थना करते की त्यांच्या पुण्यात्म्यास चिरशांती लाभो व त्यांच्या दु:खी कुटूंबियांना हे दु:ख सहन करण्याचे बळ प्राप्त होवो. भावपुर्ण श्रध्दांजली.

सुचक :- श्रीम. शर्मिला बगाजी **अनुमोदन :- श्री. अनिल सावंत**

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर :-

सभा संपली असे मी जाहिर करत आहे.

(सभा संपण्याची वेळ सायं. ७.१५ वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा०महासभा दि. १६/१०/२०२६

प्रकरण क्र. ७६

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. परिवहन समिती सभा दि 05/10/2026

प्रकरण क्र. 04 :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रवासी तिकीट दर फेररचनेस मंजुरी देणेबाबत.

ठराव क्र. 03 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची परिवहन सेवा सन 2005 पासुन सूरू आहे. सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे 74 डिझेल बसेस (59 टाटा स्टॅन्डर्ड, 10 टाटा मिडी व 05 वोल्वो एसी) 57 ई-बसेस (15 स्टॅन्डर्ड नॉन एसी, 32 मिडी नॉन एसी व 10 स्टॅन्डर्ड एसी) आणि पीएम ई-बस सेवा अंतर्गत दाखल होणाऱ्या 100 बसेस (60 स्टॅन्डर्ड एसी, 40 मिडी एसी) अशा एकूण 231 बसेसचा समावेश आहे.

मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या बसेस चालविण्यासाठी 74 डिझेल बस करीता व 15 व्या वित्त आयोग "राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम" अंतर्गत अनुदानातून खरेदी केलेल्या ई-बससाठी Gross Cost Contract (GCC) तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केलेले आहेत. तसेच पीएम ई-बस सेवा अंतर्गत दाखल होणाऱ्या ई-बससाठी देखील Gross Cost Contract (GCC) तत्वावर बस ऑपरेटरची नियुक्ती केलेली आहे. सदरच्या बसेस Gross Cost Contract (GCC) तत्वावर चालवित असल्यामुळे तिकिटापासून मिळणारे उत्पन्न हे महानगरपालिकेकडे जमा होत आहे. त्याकरिता स्वतंत्र तिकीट संकलन एजन्सी नियुक्त करण्यात आलेली आहे.

सदरच्या बसेस Gross Cost Contract (GCC) तत्वावर चालवित असताना ठेकेदारामार्फत प्राति कि.मी. येणाऱ्या दराने देयके अदा करावी लागतात. तसेच तिकिट संकलन एजन्सीचे देयकही अदा करावे लागते. त्यामुळे तिकिट संकलनापासून मिळालेले उत्पन्न व बस ऑपरेटर, तिकिट संकलन एजन्सी, विभागाचे इतर प्रशासकीय खर्च यामध्ये येणारी तफावतीची रक्कम महानगरपालिकेकडून परिवहन उपक्रमाला हस्तांतरीत करून घ्यावी लागते. बसेसची संख्या यापुढे वाढविण्यात येणार असल्याने सदरची रक्कम देखील मोठ्या प्रमाणात महानगरपालिकेकडून हस्तांतरीत करून घ्यावी लागेल. तसेच सध्याचे डिझेलचे/इलेक्ट्रीसीटीचे दर, स्पेअर पार्टस व मनुष्यबळाचे वाढलेले दर पाहता दिवसेंदिवस खर्चात वाढ होणार आहे. त्यामुळे तिकिटाचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे जेणेकरून महानगरपालिकेकडून कमीत कमी रक्कम घ्यावी लागेल.

उक्त सर्व बाबी विचारात घेता व वाढलेले व भविष्यात वाढणारे खर्च विचारात घेता, परिवहन सेवा सुरळीत चालविणेसाठी प्रवासी तिकीटाचे दराबाबत विचार करणे आवश्यक आहे. सद्याचे प्रवासी तिकीटाचे सर्वसाधारण बसचे दर हे दि.19/09/2013 रोजी मुंबई महानगर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने मंजूर केलेले आहेत. तसेच वातानुकुलीत बसचे दर ऑगस्ट 2016 मध्ये मंजूर केलेले आहेत. त्यानंतर कोणतीही प्रवासी तिकीट दरवाढ अथवा दरफेररचना केलेली नाही. सन 2013 चे डिझेल, स्पेअर पार्टस व मनुष्यबळाचे दराच्या तुलनेत आजचे दर मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. त्यामुळे परिवहन उपक्रमाचा आर्थिक भार कमी करण्याच्या दृष्टीने प्रवासी तिकीटाचे दरामध्ये फेररचना करणे क्रमप्राप्त आहे.

बस भाडे प्रवासी तिकीट दर फेररचनेस मंजुरी मिळणे करिता प्रशासकीय ठराव क्र.336 दि.23/03/2023 अन्वये मंजुरी घेऊन प्रस्ताव मा. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मुंबई महानगरक्षेत्र, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. परंतु अद्यापपर्यंत सदर तिकीट दर फेररचनेस मंजुरी मिळालेली नाही.

मिरा भाईंदर शहरालगतच्या इतर परिवहन उपक्रमाचे ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, वसई विरार महानगरपालिका यांचे विद्यमान प्रवासी तिकीट दराची तुलना केली असता मिरा भाईंदर महानरगपालिका परिवहन उपक्रमाचे वातानुकुलीत बसचे दर थोडे जास्त आहेत व सर्वसाधारण बसचे प्रवासी तिकीट दर अत्यंत कमी आहेत. त्यानुसार तुलनात्मक तक्ता पाहता, तिकीट दर फेररचना प्रस्तावित करण्यात आली असता, मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दि.18/09/2026 रोजी विभागाची बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली आहे. दि.18/09/2026 रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेमध्ये मा.आयुक्त महोदय यांनी टप्पानिहाय तिकीट दर एकसमान पद्धतीने फेररचना करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार सुधारीत तक्ते खालीलप्रमाणे आहेत.

परिशिष्ट अ

वातानुकुलीत बसेस (तुलनात्मक तक्ता व प्रस्तावित दर)

कि.मी.		मिरा भाईंदर महानगरपालिका प्रचलीत भाडे(ऑगस्ट 2016 पासुन) (रु.)	नवी मुंबई महानगरपालिका (दि.23/08/2021 पासुन) (रु.)	ठाणे महानगरपालिका (दि.22/04/2023 पासुन) (रु.)	मिरा भाईंदर महानगरपालिका प्रस्तावीत भाडे मागणी (रु.)
पासुन	पर्यंत				
0	2	20.00	10.00	10.00	15.00
2	4	30.00	12.00	12.00	15.00
4	6	35.00	15.00	15.00	20.00
6	8	40.00	18.00	18.00	20.00
8	10	40.00	20.00	20.00	25.00
10	12	50.00	22.00	25.00	25.00
12	14	50.00	25.00	25.00	30.00
14	16	55.00	27.00	25.00	30.00
16	18	60.00	30.00	30.00	35.00
18	20	60.00	32.00	30.00	35.00
20	22	70.00	35.00	35.00	40.00
22	24	70.00	40.00	40.00	45.00
24	26	75.00	45.00	45.00	45.00
26	28	80.00	50.00	50.00	50.00
28	30	80.00	50.00	50.00	50.00
30	32	90.00	55.00	55.00	55.00
32	34	90.00	55.00	55.00	55.00
34	36	100.00	60.00	60.00	60.00
36	38	100.00	60.00	60.00	60.00
38	40	100.00	65.00	65.00	65.00
40	42	110.00	****	****	65.00
42	44	115.00	****	****	70.00
44	46	115.00	****	****	70.00
46	48	120.00	****	****	75.00
48	50	120.00	****	****	75.00

टीप :- 0 ते 4 कि.मी. साठी रू.15/- 4.1 ते 8 कि.मी. साठी रू.20/- याप्रमाणे प्रत्येकी 4 कि.मी. साठी रू.5/- चे टप्प्यात तिकीट दर फेररचना एकसमान पद्धतीने करणे योग्य होईल.

सर्वसाधारण बसेस (तुलनात्मक तक्ता व प्रस्तावीत दर)

परिशिष्ट ब

सर्वसाधारण बसेस (प्रचलित दर, तुलनात्मक तक्ता व प्रस्तावीत दर)

कि.मी.		मिरा भाईंदर महानगरपालिका प्रचलीत भाडे (दि.13/09/2013 पासुन) (रु.)	ठाणे महानगरपालिका (दि.17/07/2015 पासुन) (रु.)	वसई विरार महानगरपालिका (दि.07/10/2021 पासुन) (रु.)	नवी मुंबई महानगरपालिका (दि.23/08/2021 पासुन) (रु.)	मिरा भाईंदर महानगरपालिका प्रस्तावीत प्रौढ भाडे मागणी (रु.)
पासुन	पर्यंत					
0	2	6.00	7.00	10.00	7.00	08.00
2	4	8.00	10.00	10.00	9.00	10.00
4	6	11.00	13.00	15.00	11.00	12.00
6	8	13.00	15.00	20.00	13.00	14.00
8	10	15.00	17.00	20.00	15.00	16.00
10	12	17.00	21.00	25.00	17.00	18.00
12	14	18.00	21.00	25.00	19.00	20.00
14	16	19.00	22.00	25.00	21.00	22.00
16	18	20.00	23.00	25.00	23.00	24.00
18	20	21.00	23.00	30.00	25.00	26.00
20	22	22.00	25.00	30.00	27.00	28.00
22	24	23.00	25.00	35.00	29.00	30.00
24	26	24.00	26.00	35.00	31.00	32.00
26	28	25.00	30.00	40.00	33.00	34.00
28	30	26.00	30.00	40.00	35.00	36.00
30	32	28.00	33.00	45.00	37.00	38.00
32	34	29.00	33.00	45.00	39.00	40.00
34	36	30.00	33.00	45.00	41.00	42.00
36	38	31.00	36.00	45.00	43.00	44.00
38	40	32.00	36.00	50.00	45.00	46.00
40	42	****	****	50.00	****	48.00
42	44	****	****	55.00	****	50.00
44	46	****	****	55.00	****	52.00
46	48	****	****	60.00	****	54.00
48	50	****	****	60.00	****	56.00

टीप :- 0 ते 2 कि.मी. साठी रू.8/- 2.1 ते 4 कि.मी. साठी रू.10/- याप्रमाणे प्रत्येकी 2 कि.मी. साठी रू.2/- चे टप्प्यात तिकीट दर फेररचना एकसमान पद्धतीने करणे योग्य होईल.

वातानुकुलीत व सर्वसाधारण बससेवा भाडेटप्पा पत्रक तयार केले असून खालीलप्रमाणे दर व सवलत प्रस्तावित करण्यात येत आहे.

परिशिष्ट क

टप्पा क्र.	कि.मी.		महाराष्ट्र शासन राजपत्र चार अ 08 जुलै 2019 नुसार	सर्वसाधारण बसचे तिकिट भाडे	वातानुकुलीत बसचे तिकिट भाडे	सर्वसाधारण व वातानुकुलीत बसचे 50% सवलतीचे तिकिट भाडे	
	पासुन	पर्यंत	कमाल भाडे			सर्वसाधारण	वातानुकुलीत
1	0	2	13	08.00	15.00	4	8
2	2	4	17	10.00	15.00	5	8
3	4	6	23	12.00	20.00	6	10
4	6	8	30	14.00	20.00	7	10
5	8	10	30	16.00	25.00	8	13
6	10	12	37	18.00	25.00	9	13
7	12	14	37	20.00	30.00	10	15
8	14	16	43	22.00	30.00	11	15
9	16	18	43	24.00	35.00	12	18
10	18	20	50	26.00	35.00	13	18
11	20	22	50	28.00	40.00	14	20
12	22	24	56	30.00	45.00	15	23
13	24	26	56	32.00	45.00	16	23
14	26	28	63	34.00	50.00	17	25
15	28	30	63	36.00	50.00	18	25
16	30	32	69	38.00	55.00	19	28
17	32	34	69	40.00	55.00	20	28
18	34	36	76	42.00	60.00	21	30
19	36	38	76	44.00	60.00	22	30
20	38	40	82	46.00	65.00	23	33
21	40	42	82	48.00	65.00	24	33
22	42	44	89	50.00	70.00	25	35
23	44	46	89	52.00	70.00	26	35
24	46	48	95	54.00	75.00	27	38
25	48	50	95	56.00	75.00	28	38

टिप :-

1) महाराष्ट्र शासन राजपत्र चार अ दि.31 मार्च 2019 नुसार सर्वसाधारण बससेवेच्या तिकीट भाड्यापेक्षा वातानुकूलित बस सेवेसाठी 150% पर्यंत जादा तिकीट भाडे आकारता येईल.
2) वातानुकूलित बससेवेसाठी 50 किमी पेक्षा जास्त अंतरासाठी प्रत्येकी 4 किमी किंवा त्याच्या अंश भागास रु.5 नुसार भाडे आकारण्यात येईल.
3) सर्वसाधारण बससेवेसाठी 50 किमी पेक्षा जास्त अंतरासाठी प्रत्येकी 4 किमी किंवा त्याच्या अंश भागास रु.4 नुसार भाडे आकारण्यात येईल.
4) शालेय, महाविदयालयीन विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना तिकीटांमध्ये 50% सवलत दिली जाईल.
5) परिवहन उपक्रमाच्या बसचा वापर करणाऱ्या 40% व त्यावरील दिव्यांग व्यक्तींना प्रवासात 100% सवलत दिली जाईल.
6) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बस मधून प्रवासाची मोफत सुविधा (100% सवलत) दिली जाईल.

सध्यस्थितीत परिवहन विभागामध्ये एकूण 131 बसचा ताफा असून त्यापैकी 15 बसेस या वातानुकूलित प्रकारच्या आहेत. तसेच भविष्यात पीएम ई-बस सेवेअंतर्गत येणाऱ्या 100 बस गाड्या या वातानुकूलित प्रकारच्या असल्यामुळे वातानुकूलित बस सेवेचे तिकीट दर कमी केल्यास शहराबाहेर व शहरांतर्गत मार्गावर मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना माफक दरामध्ये वातानुकूलित बससेवेचा लाभ देणे शक्य होईल.

मिरा भाईंदर परिवहन सेवेच्या सर्वसाधारण आणि वातानुकूलित बससेवेच्या तिकीट दरात परिशिष्ट "अ" आणि परिशिष्ट "ब" प्रमाणे फेररचना केल्यास परिवहन उपक्रमाच्या उत्पन्नात वाढ होऊन प्रवासी संख्येत वाढ होऊ शकते. तसेच परिवहन सेवेच्या बस तिकीट दरामध्ये फेरबदल केल्यास आणि भविष्यात बस ताफ्यात होणाऱ्या वाढीमुळे मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना अधिक उत्तमरित्या परिवहन सेवा देणे शक्य होईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रवासी तिकीट दर फेररचनेस मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मुंबई महानगर क्षेत्र, महाराष्ट्र शासन यांची मंजुरी आवश्यक असून त्याकरिता सदर प्रवासी तिकीट दर फेररचना प्रस्ताव मा.परिवहन समितीच्या मंजुरीने मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

तरी, उक्तप्रमाणे प्रवासी तिकीट दर फेररचनेस ही सभा मंजुरी देत असून मा. महासभेच्या मंजूरीस शिफारस करीत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- Kuldip J. Singh

अनुमोदक :- Suresh Chandra Dubey

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचुन कायम करण्यात आला.

सभापती
परिवहन समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मा.महासभा दि. १६ / १० /2026

(गोषवारा)

प्रकरण क्र. :- ८० मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत...

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमाक मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28 मे, 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर, 2021 मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार प्रशासकीय अधिकारी (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

पदनाम व श्रेणी	नेमणुकीची पध्दत व टक्केवारी	नेमणुकीकरता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती
प्रशासकीय अधिकारी (सेवा-1 प्रशासकीय सेवा)	पदोन्नती 100%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यालय अधिक्षक या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार प्रशासकीय अधिकारी या संवर्गातील 10 पदे मंजूर आहेत व मिरा भाईदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 नुसार प्रशासकीय अधिकारी (गट-ब) ची 09 पदे 100% पदोन्नतीने भरावयाची आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट, 2019 नुसार शासकीय अधिकारी कर्मचारी याना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र उ(3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्याची अ.क्र i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक बीसीसी 2018/प्र.क्र.366/16- व, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यानी याचिका

क.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग सहाराष्ट्र शासन याचेकडील पत्र क्र.दिव्यांग-2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुबंई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

प्रशासकीय अधिकारी या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.12/12/2025 रोजी आयोजित करण्यात आली होती.

प्रशासकीय अधिकारी या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्याचे पद	पदोन्नतीचे पद	नेमणुक प्रवर्ग	पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी
1.	श्रीम.लॉरेटा घाडगे S-14 38600-122800	कार्यालय अधिक्षक	प्रशासकीय अधिकारी	खुला	S-15 41800-132300
2.	श्री.जितेंद्र कांबळे S-14 38600-122800	कार्यालय अधिक्षक	प्रशासकीय अधिकारी	खुला	S-15 41800-132300
3.	श्रीम.अन्सेलमा चिंचक S-14 38600-122800	कार्यालय अधिक्षक	प्रशासकीय अधिकारी	खुला	S-15 41800-132300
4.	श्री.प्रभाकर म्हात्रे S-14 38600-122800	कार्यालय अधिक्षक	प्रशासकीय अधिकारी	खुला	S-15 41800-132300
5.	श्रीम.रुतुजा पिंपळे S-14 38600-122800	कार्यालय अधिक्षक	प्रशासकीय अधिकारी	खुला	S-15 41800-132300
6.	श्री.दत्तात्रय वरकुटे S-14 38600-122800	कार्यालय अधिक्षक	प्रशासकीय अधिकारी	खुला	S-15 41800-132300

प्रशासकीय अधिकारी (गट-ब) संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

सबब वरील अधिकारी यांना नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा आईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे.

त्यामुळे वरील अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट, 2019 नुसार शासकीय अधिकारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करून मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. 28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दि.12/12/2025 रोजी पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) अन्वये अधिकारी/कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित आहेत. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम 51 अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्या वेळी अमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

त्याअनुषंगाने वरील अधिकारी यांना दिलेल्या पदोन्नत्या हया तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा.आयुक्त यांनी मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश देण्यात आलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी (गट-ब) या पदावर पदोन्नती देणेकरिता दि.12/12/2025 रोजीच्या पदोन्नती निवड समितीने शिफारस केली असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार सदर पदोन्नतीस मा.महासभेची मंजूर मिळणे आवश्यक आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मा.महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मा. महासभा दि. १६/ १० /2026

(गोषवारा)

प्रकरण क्र. :- ८९ मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील महापालिका सचिव (गट-अ) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28 मे, 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर, 2021 मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार महापालिका सचिव या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

सेवा व संवर्ग	पदनाम	नेमणुकीची पद्धत व टक्केवारी 1. नामनिर्देशन 2. पदोन्नती 3. प्रतिनियुक्ती	नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती
श्रेणी-1 प्रशासकीय सेवा	महापालिका सचिव	पदोन्नती 100%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील महापालिका उपसचिव या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व विधी शाखेची पदवी धारण करणाऱ्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार महापालिका सचिव या संवर्गातील 01 पद मंजूर आहे व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 नुसार महापालिका सचिव या संवर्गाचे 01 पदे 100% पदोन्नतीने भरावयाचे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट, 2019 नुसार शासकीय अधिकारी कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात

आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र ३(3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्याची अ.क्र i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यानी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये, असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन याचेकडील पत्र क्र.दिव्यांग-2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुबंई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

महापालिका सचिव (गट-अ) या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.10/08/2026 रोजी आयोजित करण्यात आली होती.

महापालिका सचिव (गट-अ) या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती समितीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्याचे पद	पदोन्नतीचे पद	नेमणुक प्रवर्ग	पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी
1.	श्री.दिनेश कैलास कानगुडे S-15 41800-132300	महापालिका उपसचिव	महापालिका सचिव	खुला	S-20 56100-177500

महापालिका सचिव (गट-अ) संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील

शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा आईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता वरील अधिकारी यांनी धारण केली आहे.

त्यामुळे वरील अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट, 2019 नुसार शासकीय अधिकारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करून मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दि.10/08/2026 रोजी पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) अन्वये अधिकारी/कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित आहेत. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम 51 अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्या वेळी अमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

त्याअनुषंगाने वरील अधिकारी यांना दिलेल्या पदोन्नत्या हया तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा.आयुक्त यांनी मा.महासभा व शासन मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश देण्यात आलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील महापालिका सचिव (गट-अ) या पदावर पदोन्नती देणेकरीता दि.10/08/2026 रोजीच्या पदोन्नती निवड समितीने शिफारस केली असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार सदर पदोन्नतीस मा.महासभेची मंजूर मिळणे आवश्यक आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील महापालिका सचिव (गट-अ) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मा.महासभेची मंजूरी मिळणेस व त्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 45 नुसार शासनास प्रस्ताव पाठविणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मा. महासभा दि. १६ / १० /2026

(गोषवारा)

प्रकरण क्र. :-८२ मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर दिलेल्या तदर्थ पदोन्नतीस (Ad hoc Promotion) मान्यता मिळणेबाबत

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:-मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार शाखा अभियंता (स्थापत्य) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

पदनाम व श्रेणी	नेमणुकीची पध्दत व टक्केवारी	नेमणुकीकरता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती
शाखा अभियंता (स्थापत्य) (श्रेणी-2, अभियांत्रिकी सेवा)	पदोन्नती 100%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या व कनिष्ठ अभियंता व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार शाखा अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील एकुण 16 पदे मंजूर आहेत व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 नुसार शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) ची एकुण 16 पदे 100% पदोन्नतीने भरावयाचे आहे. सद्यस्थितीत 10 शाखा अभियंता (स्थापत्य) कार्यरत आहेत. त्यामुळे 06 रिक्त असलेल्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचे प्रस्तावित आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि 01 ऑगस्ट 2019 नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी याना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात

आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३(3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्याची अ.क्र i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमाक बीसीसी 2018/प्र.क्र.159/16- व, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यानी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन याचेकडील पत्र क्र. दिव्याग2015/प्र.क्र.171/ 16-अ. दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनानी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुबंई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

शाखा अभियंता (स्थापत्य) या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर तदर्थ पदोन्नती (Ad hoc Promotion) देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.10/08/2026 रोजी आयोजित करण्यात आली होती.

शाखा अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा तदर्थ पदोन्नती (Ad hoc Promotion) देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने दि.15/12/2017 रोजीच्या शासन निर्णयानुसार श्री.श्रीकृष्ण मोहिते यांना 11 महिन्यासाठी किंवा न्यायालयीन कार्यवाही अंतिम होईल यापैकी जे अगोदर होईल तेवढया कालावधीसाठी शासन निर्णयतील अटीशर्तीच्या अधिन राहून तदर्थ पदोन्नती (Ad hoc Promotion) पदोन्नती देणेकरीता देणेकरीता शिफारस केली आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्याचे पद	पदोन्नतीचे पद	नेमणुक प्रवर्ग	पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी
1.	श्री.श्रीकृष्ण सदाशिव मोहिते S-13 35400-112400	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	शाखा अभियंता (स्थापत्य)	खुला	S-15 41800-132300

शाखा अभियंता (स्थापत्य) गट-ब संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

सबब वरील अधिकारी यांना नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा आईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार वरील अधिकारी यांनी पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे.

त्यामुळे वरील अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट, 2019 नुसार शासकीय अधिकारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करून मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. 28306/2017 मधील निर्णयाच्या व दि.15/12/2017 रोजीच्या शासन निर्णयानुसार श्री.श्रीकृष्ण मोहिते यांना 11 महिन्यासाठी किंवा न्यायालयीन कार्यवाही अंतिम होईल यापैकी जे अगोदर होईल तेवढया कालावधीसाठी शासन निर्णयतील अटीशर्तीच्या अधिन राहून दि.12/08/2026 रोजीच्या आदेशान्वये तदर्थ पदोन्नती (Ad hoc Promotion) देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) अन्वये अधिकारी/कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित आहेत. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम 51 अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्या वेळी अमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

त्याअनुषंगाने वरील अधिकारी यांना दिलेली पदोन्नती ही तदर्थ पदोन्नती (Ad hoc Promotion) असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार सदर पदोन्नतीस मा.महासभेची मंजूर भिळणे आवश्यक आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील शाखा अभियंता (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस (Ad hoc Promotion) मा.महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मा. महासभा दि. १६/१० /2026

(गोषवारा)

प्रकरण क्र. :- ८३ मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप मुख्य स्वच्छता अधिकारी या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत...

महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28 मे, 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार उप मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

पदनाम व श्रेणी	नेमणुकीची पध्दत व टक्केवारी	नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती
उप मुख्य स्वच्छता अधिकारी	पदोन्नती 100%	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्वच्छता अधिकारी या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार उप मुख्य स्वच्छता अधिकारी या संवर्गातील 02 पदे मंजूर आहेत व मिरा भाईदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 नुसार उप मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब) ची 2 पदे 100% पदोन्नतीने भरावयाचे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2018/प्र.क्र./159/कार्यासन-12, दि 01 ऑगस्ट 2019 नुसार शासकीय अधिकारी कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. उ (3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्याची अ.क्र i) ते xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमूद आहे.

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यानी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. दिव्यांग2015/प्र.क्र.171/16-अ. दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनानी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुबंई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

उप मुख्य स्वच्छता अधिकारी या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.10/08/2026 रोजी आयोजित करण्यात आली होती.

उप मुख्य स्वच्छता अधिकारी या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्याचे पद	पदोन्नतीचे पद	नेमणुक प्रवर्ग	पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी
1.	श्री.अरविंद सुरेश चाळके (S-14 38600-122800)	स्वच्छता अधिकारी	उप मुख्य स्वच्छता अधिकारी	खुला	S-15 41800-132300

उप मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब) संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन याचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या

आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28 मे, 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 करीता मान्यता दिल्यानुसार पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे.

त्यामुळे वरील अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट, 2019 नुसार शासकीय अधिकारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करून मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दि.10/08/2026 रोजी पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) अन्वये अधिकारी/कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित आहेत. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम 51 अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्या वेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

त्याअनुषंगाने वरील अधिकारी यांना दिलेल्या पदोन्नत्या हया तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा.आयुक्त यांनी मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश देण्यात आलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब) या पदावर पदोन्नती देणेकरीता दि.10/08/2026 रोजीच्या पदोन्नती निवड समितीने शिफारस केली असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार सदर पदोन्नतीस मा.महासभेची मंजूर मिळणे आवश्यक आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मा.महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मा.महासभा दि. १६/१०/2026

(गोषवारा)

प्रकरण क्र. ८४ महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त बळीराजाच्या मदतीसाठी "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मध्ये आर्थिक मदत म्हणून अदा करण्यात आलेल्या रक्कम रु.1 कोटी च्या कामास मा.महासभेची कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत तसेच "आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था निधी" या लेखाशिर्षात रक्कम रु.1 कोटी महानगरपालिकेच्या अखर्चिक निधीतून पुनर्विनियोजन करणेकरिता पुनर्विनियोजन प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

सोमवार दि.28/09/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता तसेच बुधवार दि.30/09/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त बळीराजाच्या मदतीसाठी "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मध्ये आर्थिक मदत जमा करण्याबाबत चर्चा व विनिमय करणेकरिता मा.महापौर महोदया यांच्या अध्यक्षतेखाली व मा.आमदार, 145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघ यांच्या उपस्थितीत मुख्य कार्यालयात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस मा.आयुक्त, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा.विरोधी पक्ष नेता, मा.सभागृह नेता, मा.सभापती (विविध समिती), मा.गट नेता तसेच महानगरपालिकेचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये राज्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीचा आढावा घेण्यात आला व सदर आढाव्याअंती दुष्काळग्रस्त बळीराजाच्या मदतीसाठी "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मध्ये रक्कम रु.1 कोटी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक मदत म्हणून अदा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच सदर रक्कमेस मा.महासभेच्या कार्योत्तर मंजुरीकामी प्रस्ताव दाखल करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून दुष्काळग्रस्त बळीराजाच्या मदतीसाठी रक्कम रु.1 कोटी महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या "आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था निधी" या लेखाशीर्षातून अदा करणेत आलेले आहेत.

सद्यस्थितीत आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या "आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था निधी" या लेखाशिर्षात आर्थिक वर्ष 2026-27 करिता करण्यात आलेल्या तरतुदीपैकी रक्कम रु.1,35,000/- इतकी तरतूद शिल्लक आहे. तरी "आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था निधी" या लेखाशिर्षात रक्कम रु.1 कोटी महानगरपालिकेच्या अखर्चिक निधीतून पुनर्विनियोजन करणेकरिता पुनर्विनियोजन प्रस्तावास मान्यता मिळणेस तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून दुष्काळग्रस्त बळीराजाच्या मदतीसाठी रक्कम रु.1 कोटी "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मध्ये महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या "आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था निधी" या लेखाशीर्षातून अदा करणेत आल्याने सदर कामास मा.महासभेची कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा गोषवारा मा.महासभेपुढे सविनय सादर.

(डॉ.सचिन बेंगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मंजुरीने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.06/10/2026 वेळ 3.2.30
रजिस्टर नोंद अ. क्र. 83 वर्ष 26-27

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

(9)

मा.महासभा दि.१६/१०/2026

// गोषवारा //

प्रकरण क्र (८५) :- केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत सुरु असलेल्या केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारित वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था कामास मुदतवाढ देणेबाबत... (E- 3075197)

केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारित वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेच्या कामास दि.30/06/2023 रोजी कार्यादेश देण्यात आले असून कामाचा मुळ विहीत कालावधी 24 महिन्यांचा असून तो दि.29/06/2025 रोजी संपृष्टात येत आहे. सदरच्या कामास कंत्राटदाराने 1 वर्षाची मुदतवाढ अपेक्षीलेली होती. त्यास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे शिफारशीस अनुसरुन मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने 1 वर्षासाठीची मुदतवाढ भाववाढ कलमासह मंजुर करण्यात आलेली आहे.

तद्नंतर सदर मुदतवाढीस SLTC ची मान्यता घेणे आवश्यक असलेबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्याने सदरचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर केलेला आहे. सदर प्रस्तावावर दि.04/06/2026 रोजीच्या SLTC च्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा झालेली आहे.

१. सदर प्रकल्पाचा कार्यादेश 30 जून, 2023 रोजी निर्गमित करण्यात आला असून सदर करारनाम्यानुसार प्रकल्पाच्या कार्यपूर्णत्वाचा दिनांक 29 जून, 2025 होता.

२. सदर प्रकल्पाची भौतिक प्रगती 74% एवढी असून रु. 276.93 कोटी एवढा खर्च झालेला असल्याचे आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी समितीसमोर सांगितले.

३. सदर प्रकल्पास विशेषतः राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) कडील VUP संबंधित बांधकाम कामांमुळे काही ठिकाणी कामे प्रलंबित राहिली. तसेच मान्सून कालावधीत उत्खननावर लागू असलेल्या निर्बंधांमुळे पाईपलाईन व इतर घटकांच्या कामांमध्ये व्यत्यय आला. याशिवाय वन विभागाकडून आवश्यक परवानग्या मिळण्यास झालेला विलंब तसेच 6 ESR साठीच्या जागांचे हस्तांतरण उशिराने होणे ही कारणे देखील कामाच्या प्रगतीत अडथळा ठरली. तसेच जमिनीच्या मर्यादांमुळे काही ESR च्या डिझाइनमध्ये बदल करावे लागल्यामुळे कामात अतिरिक्त वेळ लागला. वरील सर्व कारणांमुळे योजनेतील काही कामे प्रलंबित राहिल्याने प्रकल्प निर्धारित मुदतीत पूर्ण होऊ शकलेला नसल्याचे आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी समितीसमोर सांगितले. सदर प्रकल्पास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्तरावर 12 महिने म्हणजे 28 जून, 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून सदर प्रथम मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्याची आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी विनंती केली.

४. उपरोक्त बाबी विचारात घेता आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या विनंतीस अनुसरून तसेच सदर प्रकल्प अभियान कालावधीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने दिनांक 29 जून, 2025 पर्यंतचे भाववाढीचे निर्देशांक गोठवून सदर प्रकल्पास दिनांक 28 जून 2026 पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्याची समितीने शिफारस केली.

५. सदर प्रकल्पास मुदतवाढ देतांना सर्वसाधारण सभेचा ठराव घेऊनच संबंधित कंत्राटदारास मुदतवाढ देण्याबाबत आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी खातरजमा करावी असे देखील समितीने सूचित केले.

उपरोक्त प्रमाणे SLTC ने सदर कामासाठी 1 वर्षाच्या मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

तथापी सदर प्रथम मुदतवाढीच्या कालावधीत योजनेचे काम पुर्ण होऊ शकलेले नाही. सद्यस्थितीत कामाची भौतिक प्रगती 74% व आर्थिक प्रगती 60% इतकी झालेली आहे.

कामे पुर्ण न होण्याची कंत्राटदाराने व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने केलेली कारणमिमांसा थोडक्यात खालीलप्रमाणे.

- Pending Work due to NHAI Construction Activities of VUP.
- Restriction on Excavation During Monsoon Season.
- Internal Pipe laying of Distribution Network is Halted due to election
- Delay in Permission from Forest Department.
- The work of transmission main of 1.2 km length along NH-48 is getting delayed due to finalization of alignment from NHAI.
- Laying of transmission main in private land is getting delayed due to MMRDA.

यास अनुसरुन व्दितीय मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास विहीत नमुन्यात सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाच्या विहीत नमुन्यामध्ये मुदतवाढीसाठीचा मा. महासभेचा ठराव जोडणे आवश्यक आहे.

यास्तव उपरोक्त प्रमाणे सदर कामास दि.28/06/2027 रोजीपर्यंत मुदतवाढीच्या प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी आवश्यक असल्याने प्रस्तावास मान्यता देणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. २०/०७/२०२६ वेळ दु. १२.२० वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ३८ वर्ष २०२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१६/ १० /२०२६

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्र (८६) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनि:सारण केंद्र क्र.2, 4, 5 व 8 ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत... (E- ४१०४०६)

मिरा भाईंदर क्षेत्रात भुयारी गटार योजनेअंतर्गत मलनि:सारण केंद्र क्र.२,४,५ व ८ बांधण्यात आलेली आहेत. सदर मलनि:सारण केंद्रांच्या परिसरातील इमारतींच्या सांडपाण्यावर योग्यरितीने प्रक्रिया होणेकरीता सदर मलनि:सारण केंद्रांची देखभाल दुरुस्ती करणेकरीता संदर्भिय पत्रान्वये मे. ARW इन्फ्रा. प्रोजेक्टस् प्रा. लि. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामास दोन महिने मुदतवाढ व मा. विशेष महासभा दि. २७/०३/२०२६, ठराव क्र. ३२ अन्वये सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामाची नविन निविदा प्रक्रिया सुरु असून महाराष्ट्र विधान परिषदेव्दारे ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची व्दिवार्षिक निवडणूक 2026 च्या आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रियेसाठी विलंब होऊन निविदा प्रकिया पुर्ण होणेस ऑगस्ट २०२६ पर्यंतचा कालावधी अपेक्षित आहे.

सदर वाढीव कालावधीकरीता मंजुर दराने रु.३६,९२,९७३/- इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार मंजुर व होणाऱ्या एकूण वाढीव खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

मुळ मंजुर खर्च	मंजुर सुधारीत खर्च	वाढीव खर्च	सुधारीत खर्च
रु.३५५.०९ लक्ष	रु.३८३.५० लक्ष	रु.३६.९२ लक्ष	रु.४२०.४२ लक्ष

उपरोक्त कामाची तरतुद "मलनि:सारण केंद्र देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेली आहे. सदर मलनि:सारण केंद्रांची देखभाल दुरुस्तीची कामे नियमित सुरु ठेवणेकरीता सदर कामास दि.३१/०८/२०२६ पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी सदर कामास मुदतवाढ व वाढीव खर्चासह सुधारीत खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१६/१०/२०२६

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्र (८७) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, पाली, लाईट हाऊस, चवळी, काशी जनता नगर, शांतीनगर सेक्टर 07, शांतीनगर सेक्टर 11, काशी, धावगी डोंगर, मिरा (एम.आय.डी.सी.) व घोडबंदर येथील पाणी पुरवठा पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत... (E- ३१४२४८)

मिरा भाईंदर क्षेत्रातील विविध ११ ठिकाणी पंपिंग स्टेशन बांधण्यात आलेले आहेत. सदर पंपिंग स्टेशनच्या परिसरातील वितरण व्यवस्था सुरळीत राहणेकरीता सदर पंपिंग स्टेशनची देखभाल दुरुस्ती करणेकरीता संदर्भिय पत्रान्वये मे. ARW इन्फ्रा. प्रोजेक्टस् प्रा. लि. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामास दोन महिने मुदतवाढ व मा. विशेष महासभा दि. २७/०३/२०२६, ठराव क्र. ३२ अन्वये सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामाची नविन निविदा प्रक्रिया सुरु असून महाराष्ट्र विधान परिषदेव्दारे ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची व्दिवार्षिक निवडणूक २०२६ च्या आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रियेसाठी विलंब होऊन निविदा प्रकिया पुर्ण होणेस ऑगस्ट २०२६ पर्यतचा कालावधी अपेक्षित आहे.

सदर वाढीव कालावधीकरीता मंजुर दराने रु.५४,३६,३२४/- इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार मंजुर व होणाऱ्या एकूण वाढीव खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

मुळ मंजुर खर्च	मंजुर सुधारीत खर्च	वाढीव खर्च	सुधारीत खर्च
रु.५२२.७२ लक्ष	रु.५६४.५४ लक्ष	रु.५४.३६ लक्ष	रु.६१८.९० लक्ष

उपरोक्त कामाची तरतुद "पंपिंग स्टेशन देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेली आहे. सदर पंपिंग स्टेशनची देखभाल दुरुस्तीची कामे नियमित सुरु ठेवणेकरीता सदर कामास दि.३१/०८/२०२६ पर्यत मुदतवाढ व वाढीव खर्चास मान्यता देणे आवश्यक आहे.

तरी सदर कामास मुदतवाढ व वाढीव खर्चासह सुधारीत खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १६/१० /२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक (८८) :- "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०" अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या Construction & Demolition Waste या प्रकल्पास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत...

"स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.०" अंतर्गत बांधकाम व पाडकाम कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या प्रकल्पास मा. राज्य अभियान संचालक, यांनी NO.MUDMD/SMM/६३७/२५-२६ DT.२८/०५/२०२५ रोजीच्या पत्रांन्वये रु.७,५०,००,०००/- ची मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामाचा वित्तिय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

Construction & Demolition Waste Plant Capacity (MT)	प्रकल्पाची एकुण रक्कम	केंद्रशासनाचा हिस्सा ३३%	राज्यशासनाचा हिस्सा ३७%	महानगरपालिकेचा हिस्सा ३०%
१२५	७,५०,००,०००	२,४७,५०,०००	२,७७,५०,०००	२,२५,००,०००

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत Construction & Demolition Waste या प्रकल्पाची रु.८,२२,२८,९०६/- अंदाजपत्रकीय रक्कमेचा सविस्तर अहवालास (DPR) तांत्रिक मान्यता मिळणेकरीता जा.क्र.मनपा/घ.व्या./७५/२०२६-२७ दि.२९/०४/२०२६ अन्वये मा. मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे पाठविण्यात आला होता.

त्यानुसार मा. मुख्य अभियंता (घ.व्य.) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र. No.Ch.E/९९७/ SWM/Project दि.२९/०६/२०२६ अन्वये रु.८,२२,२८,९०६/- अंदाजपत्रकीय रक्कमेस तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता "स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.०" अंतर्गत बांधकाम व पाडकाम कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या रु.८,२२,२८,९०६/- या कामास शासन निर्णय क्र.स्वमअ-२०२६/प्र.क्र.१४७(३)/नवि-३४ दि.०५ ऑगस्ट २०२६ आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच "स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.०" अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका जि. ठाणे च्या घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) या कामास शासन निर्णय क्र.स्वमअ-२०२६/प्र.क्र.१५(३)/नवि-३४ दि.२६ फेब्रुवारी २०२६ अन्वये रु.४३,२७,८२,०००/ रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असुन त्यामधील अतिरिक्त रक्कम रु.२२,४२,११३/- ही सदर प्रकल्पाकरीता वापरण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामाचा वित्तिय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

Construction & Demolition Waste Plant Capacity (MT)	प्रकल्पाची एकुण रक्कम	केंद्रशासनाचा हिस्सा ३३%	राज्यशासनाचा हिस्सा ३७%	महानगरपालिकेचा हिस्सा ३०%
१२५	८,२२,२८,९०६	२,५४,८९,८९७	२,८५,७९,५८२	२,८१,५९,४२७

सदर कामासाठी अंदाजे रू.८,२२,२८,९०६/- वार्षिक खर्च अपेक्षित आहे. सदर कामी होणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या "स्वच्छ भारत /महाराष्ट्र अभियान/ योजना राबविणे /स्वच्छता पारितोषिक (मनपातुन खर्च)" या लेखाशीर्षातून करण्यात येणार आहे.

तरी "स्वच्छ महाराष्ट्र नागरी अभियान (नागरी २.०)" मा. अभियानाअंतर्गत बांधकाम व पाडकाम कचऱ्यावर प्रक्रिया करणे कामाची निविदा मागविण्यास व सदर कामी होणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. २५/०८/२०२६ वेळ ३.३०
रजिस्टर नोंद अ. क्र. ५८ वर्ष २०२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १६/ १० /२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक (८९) :- "स्वच्छ महाराष्ट्र नागरी अभियान (नागरी २.०)" मा. अभियानाअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनअंतर्गत (Bioremediation of legacy Waste) या कामाच्या अतिरीक्त मोजमाप १३२००० MT यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत...

उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्याचे (Legacy Waste) (Bio - Mining) सर्वेक्षण करुन मोजमाप घेण्यात आलेले आहे. सदर मोजमाप कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे यांच्याकडुन प्रमाणित करण्यात आलेले आहे. सदर कचऱ्याचे मोजमाप ७,५६,१२५.४८ घन मिटर असुन ९,०९,६३०.२ MT वजन अंदाजे होते. त्यानुसार केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान नागरी २.०" अंतर्गत शासन निर्णय क्रमांक:- स्वमअ-२०२२/प्र.क्र.९३/नवि-३४ दि.१० ऑगस्ट, २०२२ नुसार रक्कम रु.४०,६६,००,०००/- मंजुरी देण्यात आली होती.

शासन निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ठाणे यांच्याकडुन उत्तन येथील घनकचऱ्याचे (Legacy Waste) मोजमाप करुन मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर कामाचा तांत्रिक मंजुरी आदेश प्रपत्र नमुना क्र.४८, बाब क्र.२१ क्र.मजिप्रा/मु.अ./ठाणे/मिरा भाईंदर महानगरपालिका (Bioremediation Of Legacy Watste)/तांशा-२/५२५ दि.०३/०३/२०२५ अन्वये ९०९६३०.२० MT करीता रु.६६,४२,७४,७३७/- सुधारीत रक्कमेस तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे.

दि.१०/०६/२०२५ रोजी सदर कामाची निविदा मागविण्यात आली असुन सदर निविदेतील पात्र निविदाधारकांना दि.२२/०९/२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आलेली असुन ठेकेदारांमार्फत कामास सुरुवात करण्यात आली आहे व सद्यस्थितीत ठेकेदारामार्फत २,९९,४१९.१५ MT बायोसॉईल, RDF व इनर्ट मटेरीयल इ. ची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे.

"स्वच्छ महाराष्ट्र नागरी अभियान (नागरी २.०)" मा. अभियानाअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनअंतर्गत (Bioremediation of legacy Waste) या कामाच्या अतिरीक्त मोजमाप १३२००० MT यास मा. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडील पत्र क्र./राअस/स्वमअ/६२१/२०२५-२६ दि.२७/०५/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे व त्यास मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांचेकडील क्र.मजीप्रा/मु.अ.ठाणे/मिभाम (बायोमायनिंग प्रकल्प संदर्भ ७)/तांशा-१/१९३५ दि.१५ सप्टेंबर २०२५ अन्वये तांत्रिक मान्यता देण्यात आलेली असून सदर कामाचा वित्तिय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

प्रकल्पाची एकुण रक्कम	केंद्रशासनाचा हिस्सा	राज्यशासनाचा हिस्सा	महानगरपालिकेचा हिस्सा
८,५९,३९,४४५/-	२,३९,५८,०००/-	२,६८,६२,०००/-	३,५१,१९,४४५/-

सदर कामासाठी अंदाजे रू.८,५९,३९,४४५/- वार्षिक खर्च अपेक्षित आहे. सदर कामी होणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या "बायोमायनिंग" या लेखाशीर्षातून करण्यात येणार आहे.

तरी "स्वच्छ महाराष्ट्र नागरी अभियान (नागरी २.०)" मा. अभियानाअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनअंतर्गत (Bioremediation of legacy Waste) या कामाच्या अतिरीक्त मोजमाप १३२००० MT या कामाची स्वतंत्र निविदा मागविण्यास व सदर कामी होणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(डॉ. सचिन बांगर)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 02/09/2025 वेळ 3.09.00 वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. 82 दि. 2-9-25

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक.(८०) भूमी अभिलेख कार्यालयाकरीता भाडयाने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख यांचेकडून उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय मंजूर करण्यात आलेले असून सदर कार्यालयासाठी जागा उपलब्ध कुरुन देणेस मागणी करण्यात आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भूमापनाची कामे सुरु असल्याने सदर कार्यालयाकरीता जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

भाईंदर पश्चिम प्रभाग कार्यालय क्र.01 इमारत, शुभम आर्केड, येथे तळ मजल्यावर 277.20 चौ. मीटर जागा उपलब्ध असून सदर जागेचे रु.86,523/- प्रति महीना हे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी कळविलेले आहे. मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली गठीत भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीने सदर भाडे निश्चित केले आहे. तरी सदर जागा करारानामा करुन भाडयाने उपलब्ध करुन देण्यासाठी मा. महासभेच्या मान्यतेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

PC-6/2026-27/DK/MG-04

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१६/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र (९१) :- मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा योजने अंतर्गत साकेत व कापूरबावडी ठाणे तसेच फाटक रोड व मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पंपगृहांचे नुतनीकरण व अदयावतीकरण करणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी मिळणेबाबत...(E-3459424)

मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा योजने अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मिरा भाईंदर महानगरपालिकेस साकेत व कापूरबावडी येथे 125 द.ल.ली. पाणी मंजूर आहे.

सदरचे पाणी मिरा भाईंदर शहरापर्यंत पोहचण्यासाठी साकेत येथे 100 द.ल.ली. क्षमतेचे व कापूरबावडी येथे 25 द.ल.ली. क्षमतेचे पंपगृह (Inline Boosting Pumping Station) बांधण्यात आलेले आहे.

सदरचे पंपगृह सुमारे 10 ते 15 वर्षापासून कार्यान्वीत आहेत. सदरच्या पंपगृहाची स्थापत्य विषयक कामे, विद्युत व यांत्रिकी कामांची नुतनीकरण व अदयावतीकरण करणे आवश्यक आहे.

याकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या कामाचा आवाका खालीलप्रमाणे ठरविणे उचित राहील.

- स्थापत्य कामांचे तांत्रिक लेखापरिक्षण (Structural Audit) करुन त्यांचे मजबूतीकरण करणेबाबत अहवाल तयार करणे.
- विद्युतीकामांचे लेखापरिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल तयार करणे.
- यांत्रिकी कामांचे लेखापरिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल तयार करणे.
- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 11 पंपगृहाचे स्थापत्य विषयक कामे, विद्युत व यांत्रिकी कामांची नुतनीकरण व अदयावतीकरण करणे आवश्यक आहे.
- साकेत येथील पंपगृहासाठी नवीन पंप प्रस्तावीत करण्यात आला आहे.
- साकेत व कापूरबावडी ठाणे तसेच फाटक रोड तसेच मिरा भाईंदर क्षेत्रातील विविध पंपगृहांचे पाच वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणे.

त्यानुसार मे. यश इंजिनियरींग कन्सलटंट प्रा.लि., यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून सविस्तर प्रकल्प अहवाल रु.140,07,67,652/- किंमतीचा आहे.

सदर सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मंजूरी घेऊन त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राज्यात जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (MUWREP) अतंर्गत / नगरोत्थान / अमृत किंवा शासनाच्या इतर योनजेतून निधी उपलब्धतेसाठी शासनास सादर करावयाचा आहे.

तरी सदर प्रस्तावित काम जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (MUWREP) अतंर्गत / नगरोत्थान / अमृत किंवा शासनाच्या इतर योनजेतून करण्यास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१६/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र (९२) :- भुयारी गटार योजना टप्पा-II (भाग-III) कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजुरीबाबत....(E- 3204139)

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील मुळ भुयारी गटार योजना ही De-Centralized पध्दतीवर आधारीत आहे. त्यानुसार शहराची विविध 10 भागात विभागणी केलेली असून प्रत्येक विभागात टप्पे निहाय लोकसंख्येनुसार मलनि:सारण केंद्रे प्रस्तावीत आहेत. त्यापैकी टप्पा-1 म्हणजेच सन 2025 च्या लोकसंख्येसाठीचे आवश्यक असणारी मलनि:सारण केंद्रे बांधून कार्यान्वीत करण्यात आलेली आहेत. त्यांच क्षमता आता अपुरी पडत असल्याने पुढील 2040 च्या लोकसंख्येनुसार आवश्यक असणारी मलनि:सारण केंद्रांची क्षमता वाढविणे आवश्यक आहे.

त्यानुसार टप्पा-2 भाग- 1 व 2 अंतर्गत 5 मलनि:सारण केंद्रांची क्षमता वाढविण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

भुयारी गटार योजनेतील उर्वरीत कामांचा तपशील -

i. नव्याने विकसनशील असलेल्या भागात (महाजनवाडी, गितानगर) नव्याने भुयारी गटार योजना व मालमत्ता जोडणीची कामे.

ii. ग्रामीण भागात भुयारी गटार योजना व मालमत्ता जोडणीची कामे.

उपरोक्त कामे ही भुयारी गटार योजना टप्पा-II, भाग-III प्रकल्पा मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करावयाचे आहे.

याकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे. यश इंजिनियरींग कन्सलटंट प्रा.लि. यांची संदर्भ क्र. 1 नुसार नियुक्ती करण्यात आली होती.

त्यानुसार मे. यश इंजिनियरींग कन्सलटंट प्रा.लि. यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून सदर प्रकल्प अहवालामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे.

- नव्याने विकसनशील असलेल्या भागात महाजनवाडी परिसरात 5.3 कि.मी. मलवाहिनीचे जाळे, 16.10 द.ल.ली. चे Sewage Pumping Station व 11 द.ल.ली. क्षमतेचे मलनि:सारण केंद्र.
- 5 द.ल.ली. क्षमतेचे पुर्न:प्रक्रिया केंद्र.
- गितानगर परिसरात 17.5 द.ल.ली. चे Sewage Pumping Station व 11.5 द.ल.ली. क्षमतेचे मलनि:सारण केंद्र व अनुषंगिक कामे.
- ग्रामीण भागात (चेना, काजूपाडा, उत्तन, धावगी, डोंगरी, मोर्वा, राई, मुर्धा, इ.) भुयारी गटार योजना व मालमत्ता जोडणीची कामे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

मे. यश इंजिनियरींग कन्सलटंट प्रा.लि. यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल रु.476,72,74,055/- किंमतीचा आहे.

सदर सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मंजूरी घेऊन त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राज्यात जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (MUWREP) अतंर्गत / नगरोत्थान / अमृत किंवा शासनाच्या इतर योनजेतून निधी उपलब्धतेसाठी शासनास सादर करावयाचा आहे.

तरी सदर प्रस्तावित काम जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (MUWREP) अतंर्गत / नगरोत्थान / अमृत किंवा शासनाच्या इतर योनजेतून करण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरीता मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
ठेवणेस प्राप्त दि. ०६/१०/२०२६ वेळ ६.३.४५ वा.
सिस्टम बोर्ड अ. क्र. ०९ दि. २०२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१६/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र (९३) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आधुनिक जलमापकांची (वॉटर मिटर्स) रचना, पुरवठा बसवणे व कार्यान्वीत करणे, तसेच जलमापक बिलिंग सॉफटवेअरची रचना, पुरवठा, होस्टिंग व कार्यान्वीत करणे आणि SCADA व गळती शोधण्याच्या प्रणालीसह 24 X 7 पाणी पुरवठा यंत्रणेची रचना व अंमलबजावणी करणे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी मिळणेबाबत... (E- 3275434)

मिरा भाईंदर महानगरपालिकेस सद्यस्थित दररोजचा सुमारे 200 द.ल.ली. पाणी पुरवठा होत आहे.

त्यासाठीचा जलकुंभापर्यंतच्या सुमारे 23 कि.मी. लांबीच्या मुख्य जलवाहिन्या , 33 उंच जलकुंभ, 8 पपिंग स्टेशन व 391 कि.मी. लांबीची वितरण व्यवस्था कार्यान्वीत आहे.

सद्यस्थित दैनंदिन देखभाल दुरुस्ती व परिचलनाची कामे महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी आस्थापनेवरील कर्मचारी वर्गाकडून (In-house) करण्यात येतो.

भविष्यातील 2046 पर्यंतची शहराची पाण्याची मागणी पुर्ण होण्यासाठी अमृत 2.0 अभियानांतर्गत सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था बळकटीकरण / विस्तारीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.

या योजने अंतर्गत सुमारे 41 कि.मी. लांबीच्या मुख्य जलवाहिन्या, 25 नवीन जलकुंभ / भुमिगत पाण्याची टाकी (संप), 176 कि.मी. लांबीची वितरण व्यवस्था अंथरणे तसेच पाणी पुरवठा वितरण व्यवस्थे अंतर्गत येणारे अस्तित्वातील तसेच प्रस्तावीत तसेच, तसेच इत्यादी अनुषगिक कामांसाठी खालीलप्रमाणे भाग-अ व भाग-ब मध्ये कामांचा अंतर्भाव आहे.

भाग -अ

अ.क्र.	कामाचा तपशील
१	सर्व जलकुंभांच्या ठिकाणी SCADA प्रणाली राबविणे, 8 पपिंग स्टेशनच्या ठिकाणी Automation करणे, सर्व जलकुंभांच्या ठिकाणी जलमापक यंत्र बसविणे
२	गळती शोधण्याच्या प्रणाली व अनुषंगिक कामे.
३	देखभाल व दुरुस्तीची कामे

भाग-ब

अ.क्र.	कामाचा तपशील
१	आधुनिक जल मापक व कंट्रोल व्हॉल्व्ह पुरवठा, बसविणे व क्षेत्र चाचणी
२	RF गेटवे डिझाईन, पुरवठा, बसविणे व कमिशनिंग
३	सर्व्हर हार्डवेअर व सॉफ्टवेअर प्रणाली
४	HDPE चेंबर, UPVC पाईप, झडप चेंबर व संलग्न घटक
५	मीटर डेटा मॅनेजमेंट सिस्टीम (MDMS) – डिझाईन, लायसन्स
६	GIS मॅपिंग (उपग्रह प्रतिमा, डिजिटायझेशन, सर्वेक्षण)
7	देखभाल व दुरुस्तीची कामे

मा. आयुक्त सो. यांनी पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे अदयावत आधुनिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती तसेच परिचलन करणेबाबत आवश्यक असणाऱ्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

जेणे करुन वितरण व्यवस्थेतील दैनंदिन पाण्याचे परिक्षण, परिचलन, व्यवस्थापन इत्यादी तंत्रज्ञानाच्या वापराने केल्यास मनुष्यबळ कमी लागेल तसेच कामामध्ये अचुकता देखील राखता येईल.

त्यानुसार मे. फोरस्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून सविस्तर प्रकल्प अहवाल रु.224,24,10,130/- किंमतीचा आहे.

सदर सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मंजूरी घेऊन त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राज्यात जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (MUWREP) अतंर्गत / नगरोत्थान / अमृत किंवा शासनाच्या इतर योनजेतून निधी उपलब्धतेसाठी शासनास सादर करावयाचा आहे.

तरी सदर प्रस्तावित काम जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (MUWREP) अतंर्गत / नगरोत्थान / अमृत किंवा शासनाच्या इतर योनजेतून करण्यास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. ०६ / १० / २०२६ वेळ दु. ३.४५ वा
रजिस्टर नोंद अ. क्र. ८० वर्ष २०२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१९/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र (९४) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एकूण 107 द.ल.ली. क्षमतेचे अस्तित्वातील मलनि:सारण केंद्राचे नुतनीकरण करणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी मिळणेबाबत...(E- 3459313)

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील मुळ भुयारी गटार योजना ही De-Centralized पध्दतीवर आधारीत आहे. त्यानुसार शहराची विविध 10 भागात विभागणी केलेली असून प्रत्येक विभागात लोकसंख्येनुसार मलनि:सारण केंद्राची क्षमता निश्चित करुन मलनि:सारण केंद्रे बांधण्यात आलेली आहेत.

सदरची भुयारी गटार योजना टप्पा-1 मधील बांधण्यात आलेली मलनि:सारण केंद्रे ही MBBR तंत्रज्ञानावर आधारीत असून ती सुमारे 7 ते 10 वर्षापासून कार्यान्वीत आहेत.

सदरच्या मलनि:सारण केंद्रातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता ही सद्याच्या महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने विहीत केलेल्या मापदंडानुसार येण्यासाठी अस्तित्वातील मलनि:सारण केंद्रांची अदयावतीकरण व नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

याकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या कामाचा आवाका खालीलप्रमाणे ठरविणे उचित राहील.

- स्थापत्य कामांचे तांत्रिक लेखापरिक्षण (Structural Audit) करुन त्यांचे मजबूतीकरण करणेबाबत अहवाल तयार करणे.
- विद्युतीकामांचे लेखापरिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल तयार करणे.
- यांत्रिकी कामांचे लेखापरिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल तयार करणे.
- सद्यस्थित सांडपाण्यावर करण्यात येणाऱ्या प्रक्रियेचा अभ्यास करुन प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ / राष्ट्रीय हरित दल (NGT) च्या विहीत केलेल्या मापदंडानुसार राखण्यासाठी आवश्यकत्या सुधारणा करणे.
- मलनि:सारण केंद्रांचे Automation, SCADA तसेच OCEMS प्रणाली राबविणेबाबतचा अहवाल तयार करणे.

त्यानुसार मे. यश इंजिनियरींग कन्सलटंट प्रा.लि., यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून सविस्तर प्रकल्प अहवाल रु.188,60,48,122/- किंमतीचा आहे.

सदर सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मंजूरी घेऊन त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राज्यात जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (MUWREP) अतंर्गत / नगरोत्थान / अमृत किंवा शासनाच्या इतर योनजेतून निधी उपलब्धतेसाठी शासनास सादर करावयाचा आहे.

तरी सदर प्रस्तावित काम जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (MUWREP) अतंर्गत / नगरोत्थान / अमृत किंवा शासनाच्या इतर योनजेतून करण्यास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका
शिक्षण विभाग
मा. महासभा दि.१६/१०/२०२६
// गोषवारा //

प्रकरण क्र. ९५ :- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत विविध विकासात्मक व लोककल्याणकारी घेतलेल्या कामांना मंजूरी मिळणेबाबत.

दि. 23 जानेवारी 2026 रोजीच्या शासन निर्णयान्वये **हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत** विविध विकासात्मक व लोककल्याणकारी कामे हाती घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना व निकष निश्चित करण्यात आले आहेत. तसेच शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-2026/प्र.क्र.12/नवि-16 (ई-1536270) अन्वये दि. 25/06/2026 रोजी प्राप्त झालेल्या परिपत्रकानुसार शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता सुधारणा विषयक कामे हाती घेण्यासाठी आवश्यक ती सर्व पूर्वतयारी करण्यात आली आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

1. वाचनालय सुविधा
2. प्रयोगशाळा व व्हर्च्युअल लॅब
3. खेळ व व्यायाम सुविधा
4. प्रगत प्रशिक्षण
5. सुंदर व स्वच्छ शाळा
6. पर्यावरण जतन
7. शाळांचे ब्रँडिंग

वरील बाबींची आवश्यकता व निकड, विद्यार्थ्यांची संख्या, शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा तसेच शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याची आवश्यकता विचारात घेऊन दि. 25/06/2026 शासन निर्णयानुसार खालील 7 शाळांची निवड करण्यात आली आहे.

निवड करण्यात आलेल्या शाळांचा तपशील

अ.क्र.	शाळेचे नाव	विद्यार्थी संख्या	इयत्ता
1	काशी उर्दू शाळा क्र. 5	379	1 ते 8
2	गोडदेव शाळा क्र. 8	266	1 ते 7
3	घोडबंदर शाळा क्र. 9	244	1 ते 10
4	चेणा शाळा क्र. 10	279	1 ते 10
5	मिरे मराठी शाळा क्र. 20	226	1 ते 7
6	नवघर शाळा क्र. 29	419	1 ते 10
7	मिरे उर्दू शाळा क्र. 32	380	1 ते 8

एकूण विद्यार्थी संख्या : 2,193

वरीलप्रमाणे निवड करण्यात आलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्याच्या उद्देशाने खालीलप्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	वैशिष्ट्ये	अंदाजित रक्कम
1	वाचनालय	1) वाचनालयासाठी आवश्यक उपकरणे 2) प्रत्येक वर्गात एक वाचन कोपरा 3) जुनी, दानातून प्राप्त अथवा नवीन पुस्तके उपलब्ध करून वाचनालय समृद्ध करणे 4) शनिवार हा वाचन उपक्रमासाठी निश्चित करणे	रु. 28 लाख
2	प्रयोगशाळा	आधुनिक प्रयोगशाळा तसेच आभासी (व्हर्च्युअल) प्रयोगशाळा सुविधा	रु. 98 लाख
3	प्रगत प्रशिक्षण	1) शिक्षकांसाठी AI प्रशिक्षण 2) मानसशास्त्र विषयक शिक्षक प्रशिक्षण 3) प्रेरणादायी (Motivational) शिक्षक कार्यशाळा 4) कर्मयोगी व दीक्षा ॲपद्वारे उपलब्ध असलेल्या मोफत ऑनलाइन प्रशिक्षणाचा उपयोग	रु. 4.80 लाख
4	खेळ व व्यायाम	इनडोअर खेळ, वैयक्तिक व सांघिक खेळ, कवायत तसेच शारीरिक तंदुरुस्ती व स्नायू विकासासाठी आवश्यक व्यायाम साहित्य	रु. 21 लाख
5	सुंदर व स्वच्छ शाळा	1) स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा 2) मुलांच्या व मुलींच्या शौचालयांचे नूतनीकरण 3) नवघर शाळेतील तिसऱ्या मजल्यावरील वर्गखोल्यांचे नूतनीकरण 4) समुपदेशन कक्ष / किशोरी कक्षाची निर्मिती 5) शाळांची रंगरंगोटी व बोलक्या भिंतींचे चित्रांकन	रु. 91.20 लाख
6	शाळांचे ब्रँडिंग	1) "माझी शाळा, माझा अभिमान" उपक्रम 2) "आमची शाळा, आमचा अभिमान" उपक्रम 3) शाळांच्या गुणवत्तापूर्ण कामकाजाचे तसेच गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांच्या उल्लेखनीय कामगिरीचे प्रसारण व प्रसिद्धी	रु. 3 लाख
7	पर्यावरण जतन	1) हर्बल कॉर्नरची निर्मिती 2) प्लास्टिकमुक्त शाळा उपक्रमांतर्गत संकलित प्लास्टिक वस्तूंची वाहतूक करून केशवसृष्टी येथे पाठविणे 3) पावसाच्या पाण्याचे संकलन व साठवण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना	रु. 4 लाख

सदर प्रस्तावामार्फत निवड करण्यात आलेल्या शाळांमध्ये दर्जेदार शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, सामाजिक व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे तसेच शाळांचा एकूण शैक्षणिक दर्जा उंचावणे हा प्रमुख उद्देश आहे.वाचनालय सुविधेमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची

आवड व सवय विकसित होण्यास मदत होईल. प्रयोगशाळा व व्हर्च्युअल लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होऊन प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षणास प्रोत्साहन मिळेल.

सदर प्रस्तावास शासन नियम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करून आवश्यक साहित्य, उपकरणे व सेवा खरेदी/कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांची दि. 29/09/2026 रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. शासन नियम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रियेचा अवलंबून करुन आवश्यक साहित्य, उपकरणे व सेवा खरेदी/ कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडे पाठविण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे. उक्त तक्त्यानुसार सदरचे साहित्य खरेदी करणेकामी रु २ करोड ५० लाख इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर कामी येणारा खर्च शासन निधीमधून अदा करण्यात येईल.

तरी सदरचा विषयाबाबत मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(कविता बोरकर)
उपायुक्त (शिक्षण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
सार्वजनिक आरोग्य विभाग
मा. महासभा दि. १६/१०/ २०२६
//गोषवारा//

प्रकरण क:-(९६) हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांर्गत मंजूर निधीमधून आरोग्य केंद्र/ रुग्णालयाकरीता आवश्यक, साहित्य व उपकरणे खरेदी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील दि.२३.०१.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत रु. २,५०,००,०००/- निधी विषयांकित कामासाठी मंजूर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील दि. २५/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत मंजूर निधी मधून आरोग्य संस्थाकरीता वैद्यकीय साहित्य व उपकरणे, क्षयरोग विभागाकरीता आवश्यक उपकरणे व साहित्य खरेदी तसेच, महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील १२ खाटांच्या SNCU (Sick Newborn Care Unit) उभारणीकरीता आवश्यक वैद्यकीय उपकरणे व साहित्य खरेदी करणेकामाचा या प्रस्तावात समावेश करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांची दि. ०९.१०.२०२६ रोजी मंजूरी प्राप्त झाली आहे.

एकूण अंदाजित खर्चाचा तपशिल

अ.क्र.	तपशिल	अंदाजित खर्च रक्कम रु.
१	SNCU उभारणी व क्षयरोग विभागाकरीता वैद्यकीय साहित्य व उपकरणे खरेदी	१,०७,९९,३६४/-
२	आरोग्य संस्थांसाठी वैद्यकीय साहित्य व उपकरणे खरेदी	१,१०,९९,६४०/-
३	Sanitary Napkin Vending Machine & Incinerator Machine Specification with one year of AMC & Installation Charges along with Training cost	३१,००,९९६/-
एकूण		२,५०,००,०००/-

सबब, उपरोक्त प्रस्तावित कामासाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करून खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सदरचा निधी महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास या योजनेतंर्गत राज्य शासनामार्फत मंजूर करण्यात येणार असल्याने मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे. सबब सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सादर करणेसाठी मा. महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

(कविता बोरकर)
उपायुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

शिक्षण विभाग

मा. महासभा दि.१६/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक : ८७ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या गुजराती माध्यमाच्या ४ शाळा व मनपा शाळा क्र. 1 उत्तन मराठी व मनपा शाळा क्र. 12 डोंगरपाली या शाळांचे मनपा शाळा क्र. 11 चौक मराठी येथे स्थलांतर करण्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत विविध माध्यमांच्या महानगरपालिका शाळा कार्यरत आहेत. सन २०२६-२७ मध्ये गुजराती माध्यमाच्या ४ शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी झाल्याने सदर शाळांमधील विद्यार्थ्यांचे त्याच इमारतीतील अथवा जवळच्या महानगरपालिका शाळांमध्ये समायोजन करण्यात आलेले आहे.त्याचप्रमाणे, मनपा शाळा क्र. 1 उत्तन मराठी या शाळेत सध्या २१ विद्यार्थी व १ शिक्षक, तसेच मनपा शाळा क्र. 12 डोंगरपाली या शाळेत २३ विद्यार्थी व १ शिक्षक कार्यरत आहेत. सदर दोन्ही शाळांमध्ये विद्यार्थी संख्या अत्यल्प असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने त्यांचे एका सक्षम व सुविधायुक्त शाळेत समायोजन करणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मनपा शाळा क्र. 1 उत्तन मराठी व मनपा शाळा क्र. 12 डोंगरपाली या दोन्ही शाळांचे मनपा शाळा क्र. 11 चौक मराठी येथे स्थलांतर करण्याचे प्रस्तावित आहे.मनपा शाळा क्र. 11 चौक मराठी शाळेची इमारत तीन मजली असून एकूण १२ वर्गखोल्या उपलब्ध आहेत. त्यापैकी २ वर्गखोल्या प्रयोगशाळा व संगणक लॅबसाठी प्रस्तावित आहेत. त्यामुळे सदर शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा, प्रयोगशाळा, संगणक शिक्षण तसेच इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देता येणे शक्य आहे.तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार बस सुविधा उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थ्यांची शाळेत ये-जा सुलभ व सुरक्षित होण्यास मदत होईल. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक समृद्ध व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध होऊन त्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासास चालना मिळेल.सदर शाळांचे स्थलांतर करण्यासाठी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनंतर शासन स्तरावर आवश्यक शाळा स्थलांतराची प्रक्रिया सुरू करता येईल. त्यासाठी मा. महासभेची मान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे.तसेच नोंदवहीतील संबंधित अधिकारी यांच्या अभिप्रायानुसार सदर विषय हा प्रशासकीय स्वरूपाचा असून, प्रस्तावित शाळा स्थलांतराबाबत मा. महासभेसमोर गोषवारा सादर करण्यास हरकत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.त्यामुळे मनपा शाळा क्र. 1 उत्तन मराठी व मनपा शाळा क्र. 12 डोंगरपाली या दोन्ही शाळांचे मनपा शाळा क्र. 11 चौक मराठी येथे स्थलांतर करण्यास तसेच त्यानुषंगाने आवश्यक प्रशासकीय व शासनस्तरीय कार्यवाही करण्यास मा. महासभेची मान्यता मिळणेस सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने

(सुलभा वटारे)
शिक्षणाधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. १६/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक (९८) मिरा भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालय अंतर्गत कार्यालयीन वापरासाठी दिलेली इमारत, वाहतुक विभागास जप्त वाहने ठेवण्यासाठी दिलेली जागा, इतर वास्तु यांचे भाडे वसूली करणे, पोलिस उप आयुक्त कार्यालयासाठी इमारत हस्तांतर करणे, वाहतुक विभागास जप्त वाहने ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे बाबत विचार विनियम करुन निर्णय घेणे.

मिरा भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तलयाचे कामकाज दि.०१/१०/२०२० पासून सुरु झालेले आहे. पोलिस आयुक्तालय अंतर्गत कार्यालयीन वापरासाठी तसेच पोलिस ठाणे, पोलिस चौक्या, जप्त केलेली वाहने ठेवण्यासाठी जागा ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिल्या आहेत.

अ)	**इमारतीमधील जागा**		
अ.क्र.	**इमारतीचे ठिकाण**	**वापर**	**भाडे रक्कम**
१	मिरारोड (पुर्व) शांतीगार्डन, श्री पदमसागर सुरीजी भवन	पोलिस आयुक्तालय	रु.२,८४,९२,९५६/- रु.२,४२,८६,७७०/-
२	मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२४९ इमारत	पोलिस उपआयुक्त (परिमंडळ-१/ गुन्हे प्रकटीकरण)कार्यालय	रु.१०,९२,१९२/- रु.४७,६२,२६४/- रु.८,९२,११५/-
३	मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.१८१ इमारत	नयानगर पोलिस ठाणे	रु.८३,२४,२५३/- रु.१४,८४,६०४/-
४	काशिगांव, आरक्षण क्र.३१८ इमारत	काशिगांव पोलिस ठाणे	रु.३१,५९,५७३
		एकुण	**रु.७,२४,९४,७२७/-**
		भरलेले भाडे	**रु.३,८९,५८,४५६/-**
		थकीत भाडे	**रु.३,३५,३६,२७१/-**
ब)	**आरक्षणाची मोकळी जागा**		
५	मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२५१	वाहतुक शाखेस जप्त केलेली वाहने ठेवण्यासाठी	रु.४,३८,८२,५३०/-
६	घोडबंदर आरक्षण क्र.३२६	काशिमिरा पोलिस ठाणे अंतर्गत जप्त केलेली वाहने ठेवण्यासाठी	रु.९७,६९,१०५/-
७	काशिगांव, आरक्षण क्र.३२१	काशिमिरा पोलिस ठाणे अंतर्गत जप्त केलेली वाहने ठेवण्यासाठी	रु.६४,४४,३७२/-
		एकुण थकीत भाडे	**रु.६,००,९६,००७/-**

क)	विविध पोलिस चौक्या भाडे	रु.१०,२२,१७९/-
ड)	पोलिस आयुक्तालय फर्निचर साठी झालेला खर्च	रु.१,१४,८९,०७०/-
ई)	पोलिस उपआयुक्त कार्यालय, फर्निचर झालेला खर्च	रु.६७,३३,८६२/-
	एकुण थकीत भाडे रक्कम	रु.९,४६,५४,४५७/-
	फर्निचरसाठी केलेला खर्च	रु.१,८२,२२,९३२/-
	एकुण थकीत रकम	रु.११,२८,७७,३८९/-

२) मिरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयातंर्गत नविन मागण्या

अ) घोडबंदर जुने आरक्षण क्र.२९० व आरक्षण क्र.१२२ ड या ठिकाणी असलेली मोकळी जागा जप्त केलेली वाहने ठेवण्यासाठी वाहतुक विभागास उपलब्ध करुन देणे.

ब) मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२४९ मधील पोलिस उपआयुक्त कार्यालयासाठी भाड्याने दिलेली इमारत कायम स्वरुपी हस्तांतर करणे.

सदर इमारत ही वाचनालय आरक्षणाची असून आरक्षणा व्यतिरिक्त इतर वापरासाठी आरक्षणाचा वापर करावयाचा असल्यास त्यास UCDPR मधील विनिमय ४.२७ मधील तरतुदीनुसार शासनाची पुर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे.

३) मिरा भाईंदर वसई – विरार पोलिस आयुक्तालयाने दि.०१/०१/२०२० पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेस अतिक्रमण बंदोबस्त, शहर पथ विक्रेता बंदोबस्त, निवडणूक बंदोबस्त तसेच इमारत निष्काशित करणेसाठी देण्यात आलेल्या पोलिस बंदोबस्ता पोटी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे रु.५,२०,६६,९११/- (अक्षरी रुपये पाच कोटी वीस लक्ष सहासष्ट हजार नऊशे अकारा मात्र) रकमेची मागणी केली आहे. तसेच महानगरपालिकेस उर्वरित रक्कम पोलिस आयुक्तालयाकडे जमा करणेस कळविलेले आहे.

सदर मागणीच्या अनुशंगाने पोलिस आयुक्तालयास खालील प्रमाणे कळविण्यात आले आहे.

Section 483 of the Maharashtra Municipal Corporation Act provides as under:
Co-operation of Police etc.

(१) The District Magistrate and the District Superintendent of the Police having jurisdiction in the City shall, as far as may be, co-operate by themselves and through their subordinates with the Commissioner for carrying into effect and enforcing the provisions of this Act and for the maintenance of good order in the City.

(२) It shall be duty of every police officer in the city to communicate without delay to the proper municipal officer any information which he receives of a design to commit or of the commission of any offence against this Act or against any rule, regulation or bye-law and to assist the Commissioner or any municipal officer or servant reasonably demanding his aid for the lawful exercise of any power vesting in the Commissioner or in such municipal officer or servant for this Act.

On perusal of this provision, it emphatically clear that no fees can be charge for maintenance of good order in the city.

The Bombay High Court has consistently ruled that municipal corporations have the authority and the binding obligations to demolish unauthorised constructions. The court has explicitly directed that local police must provide adequate and immediate protection to civic authorities during demolition drives to ensure the law is enforces without hindrance.

सदर तरतुदीनुसार पोलिस बंदोबस्तासाठी मागितलेली रक्कम देणे लागत नाही.

वरील सर्व वस्तुस्थिती भाडे रकमेची वसूली करणे, वाहतुक विभागास जागा उपलब्ध करुन देणे, पोलिस उप आयुक्त कार्यालयासाठी इमारत हस्तांतरण करणे या मागणीच्या अनुशंगाने व पुढील निर्णयासाठी सादर करण्यात येत आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

PC-09/VP/2026-27/DK-03

मिरा भाईंदर महानगरपालिका

समाजविकास विभाग

मा. महासभा दि.१६/१० /2026

(गोषवारा)

प्रकरण क्रं.११:- दिव्यांग कल्याणकारी योजनांचे "दिव्यांग धोरण" निश्चित करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका समाजविकास विभागा मार्फत दिव्यांग कल्याण योजना राबविण्यात येत आहे. दिव्यांगाना सर्व योजनांचा लाभ मिळावा व कोणताही दिव्यांग लाभापासुन वंचित राहू नये व विविध योजनांमध्ये सुसुत्रता यावी यासाठी दि.09/06/2025 रोजी दिव्यांग कल्याण समिती स्थापन करण्यात आलेली होती. सदर समिती मध्ये 05 दिव्यांग संस्थेचे सदस्यांची नेमणूक करण्यात आलेली होती. मा.आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली दि.14/05/2026 रोजी दिव्यांग कल्याणकारी योजनांचे धोरण निश्चित करणेकामी दिव्यांग समिती सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकी दरम्यान दिव्यांगांचे धोरण निश्चित करण्यासाठी विविध योजनांवर चर्चा करून दिव्यांग कल्याणकारी योजना महानगरपालिका क्षेत्रात राबविणे कामी दि.04/08/2026 रोजी मा.आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर योजना खालील प्रमाणे,

अ.क्र.	तपशिल	घेण्यात आलेले निर्णय
1.	**योजनेचे नाव**	➢ **40% ते 100% दिव्यांग व्यक्तींना पेन्शन स्वरुपात वार्षिक अनुदान देणे**
	योजनेचे पात्रतेचे निकष :-	1. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी 3 वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा (शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा Society Noc.) 2. 40% ते 100% अपंगत्व असल्याचा टक्केवारी नमुद केलेला सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (UDID कार्ड साठी अधिकृत असलेले हॉस्पिटल) 3. जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला 4. आधार कार्डची छायांकित प्रत, बँक पासबुक झेरॉक्स / कॅन्सल चेक

2.	योजनेचे नाव	➢ दिव्यांग विदयार्थ्यांना शिक्षणासाठी वार्षिक शिष्यवृत्ती देणे
	योजनेचे पात्रतेचे निकष :-	

अ.क्र.	शिक्षण	यापुर्वी देण्यात येत असलेली शिष्यवृत्ती	नव्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिष्यवृती
1	नर्सरी ते इयत्ता 4 थी	8000/-	10,000/-
2	इयत्ता 5 वी ते 7 वी	10000/-	14,000/-
3	इयत्ता 8वी ते 10 वी	12000/-	16,000/-
4	इयत्ता 11वी ते 12 वी	14000/-	18,000/-
5	इयत्ता 12वी ते पदवी (कला,वाणिज्य, विज्ञान शाखा)	20000/-	40,000/-
6	पदव्युत्तर पदवी (कोणतीही)	25000/-	50,000/-
7	एम.बी.बी.एस / इंजिनियरींग डिग्री / फार्मसी इ.	-	60,000/-

1. 40% ते 100% अपंगत्व असल्याचा टक्केवारी नमुद केलेला सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (UDIDकार्ड साठी अधिकृत असलेले हॉस्पीटल)
2. जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला
3. अर्जदाराने मागील शैक्षणिक वर्षात शिक्षण पूर्ण केलेले असावे, सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. किंवा नविन प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश अर्जाची सत्यप्रत जोडावी.
4. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी 3 वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा (शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा Society Noc.)
5. शैक्षणिक फी संबंधी मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे कडून शाळा/कॉलेजमध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.
6. बँक पासबुकची छायांकित प्रत/कॅन्सल चेक
7. आधार कार्डची छायांकित प्रत.

3.	**योजनेचे नाव :-**	➢ **दिव्यांगांना कृत्रिम अवयव व साधन पुरविणे**
	योजनेचे पात्रतेचे निकष :-	1. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी 3 वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा (शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा Society Noc.) 2. 40% ते 100% अपंगत्व असल्याचा टक्केवारी नमुद केलेला सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (UDID कार्डसाठी अधिकृत असलेले हॉस्पिटल) 3. जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला 4. आधार कार्डची छायांकित प्रत. 5. कर्णबधिर दिव्यांगांसाठी कानाच्या मशिनसाठी रु.25000/- (3 वर्षांतुन एकदा देण्यात येतील) त्याकरिता अली यावर जंग या संस्थेकडून निर्गमीत केलेला (कर्णबधिर असल्याचा) दाखला असणे बंधनकार आहे.
4.	**योजनेचे नाव :-**	➢ **व्यवसायासाठी कर्ज योजना**
	योजनेचे पात्रतेचे निकष :-	1. 40% ते 100% अपंगत्व असल्याचा टक्केवारी नमुद केलेला सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (UDID कार्ड साठी अधिकृत असलेले हॉस्पिटल) 2. स्वयंरोजगारासाठी रु.50000/- ते रु 200000/- पर्यंत कर्ज 3. संबंधित बँकेने मंजुर केलेल्या कर्जाच्या रक्कमेवरील 50% रक्कम बँकेत जमा करण्यात येईल. 4. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी 3 वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा (शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा Society Noc.) 5. मान्यता प्राप्त बँकेकडून कर्ज मंजुर केलेले पत्र. 6. जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला 7. शिधापत्रकाची सत्यप्रत (रेशनकार्ड) 8. आधार कार्डची छायांकित प्रत 9. बँक पासबुक झेरॉक्स/ कॅन्सल चेक 10. वयोमर्यादा 18 ते 60 वर्षे. 11. वार्षिक उत्पन्न रु. 3 लाखापेक्षा कमी असलेले तहसीलदार कार्यालय यांचा दाखला.
5.	**योजनेचे नाव :-**	➢ **दिव्यांगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे.**
	योजनेचे पात्रतेचे निकष :-	**दिव्यांग-विवाहास रु.50,000/- ते 1,00,000/- पर्यंत अनुदान** 1. एक दिव्यांग-एक अव्यांग-रु.50,000/-

		2. दोन्ही दिव्यांग- रु.1,00,000/- 3. विवाह नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक 4. दोघांचेही UDID कार्ड आवश्यक 40% ते 100% अपंगत्व असल्याचा टक्केवारी नमुद केलेला सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (UDID कार्ड साठी अधिकृत असलेले हॉस्पिटल) 5. लग्नानंतर जास्तीत जास्त 1 वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक. 6. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी 3 वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा (शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा Society Noc.) 7. आधार कार्डची छायांकित प्रत 8. बँक पासबुक झेरॉक्स/ कॅन्सल चेक
6.	**योजनेचे नाव :-**	➢ **दिव्यांग दिन साजरा करणे**
	योजनेचे पात्रतेचे निकष :-	1. 5% राखीव निधीतून खर्च करणे. 2. जनजागृती कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, सहाय्यक साधन वाटप करणे.
7	**योजनेचे नाव**	➢ **दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण करणे**
	योजनेचे पात्रतेचे निकष:-	1. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी 3 वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा (शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा Society Noc.) 2. 40% ते 100% अपंगत्व असल्याचा टक्केवारी नमुद केलेला सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (UDID कार्ड साठी अधिकृत असलेले हॉस्पिटल) 3. जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला 4. आधार कार्डची छायांकित प्रत
8.	**योजनेचे नाव**	➢ **दिव्यांगांना बस संवा मोफत करणे (चलो कार्ड उपलब्ध करुन देणे.**
	योजनेचे पात्रतेचे निकष :-	1. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी 3 वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा (शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा Society Noc.) 2. 40% ते 100% अपंगत्व असल्याचा टक्केवारी नमुद केलेला सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (UDID कार्ड साठी अधिकृत असलेले हॉस्पिटल) 3. जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला 4. आधार कार्डची छायांकित प्रत

9	**योजनेचे नाव**	➢ **दिव्यांगांना प्रशिक्षण देऊन (TALLY,MSCIT,DTP TYPING MARATHI & ENGLISH) क्षमता प्रमाणे रोजगार उपलब्ध करुन देणे.**
	योजनेचे पात्रतेचे निकष	1. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी 3 वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा (शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा Society Noc.) 2. 40% ते 100% अपंगत्व असल्याचा टक्केवारी नमुद केलेला सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (UDID कार्ड साठी अधिकृत असलेले हॉस्पिटल) 3. जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला 4. आधार कार्डची छायांकित प्रत 5. वयोमर्यादा 18 ते 40 वर्ष
10	**योजनेचे नाव**	➢ **दिव्यांगांना साहित्य वाटप करणे. (विजेवर चालणारी शिलाई मशिन, कंप्युटर, घरघंटी इ.)**
	योजनेचे पात्रतेचे निकष	1. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी 3 वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा (शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा Society Noc.) 2. 40% ते 100% अपंगत्व असल्याचा टक्केवारी नमुद केलेला सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (UDID कार्ड साठी अधिकृत असलेले हॉस्पिटल) 3. जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला 4. आधार कार्डची छायांकित प्रत 5. वयोमर्यादा 18 ते 40 वर्ष

दिव्यांग व्यक्तींना एकावेळी एकाच योजनेचा लाभ देण्यात येईल.

वरील प्रमाणे दिव्यांग कल्याणकारी योजनांचे धोरण निश्चित करणेबाबत मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयार्थ सादर.

(कविता बोरकर)
उप-आयुक्त (समाजविकास)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. १६/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक (१००) हिन्दु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालन इमारतीचे दैनंदिन संचालन देखभाल व दुरुस्ती बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील महापालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजनेतंर्गत विशेष निधी या लेखाशिर्षातंर्गत मंजुर निधीतुन व मनपा निधीतुन भाईदर (पुर्व) येथे हिन्दु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे कला दालनाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर कला दालनात खालील सुविधा तयार करण्यात आल्या आहेत.

	Amenities	
1.	**Ground Floor**	
	Entrance lounge, Reception, Grand Staircase	५०८.५० S.MT
	Souvenir shop	१८.०० S.MT
	Cafe	९२.५३ S.MT
	Book cafe	२२.९३ S.MT
	Kitchen, Pantry	५८.७४ S.MT
	Administration office	१०७.७१ S.MT
	Children zone	२५७.८२ S.MT
	Science centre	२९१.८६ S.MT
	Senior citizen zone	२९४.६० S.MT
	Green Room-२ Nos	३०.४५ S.MT
	Auditorium	२५४.३४ S.MT
	Hologram theatre	१५१.२० S.MT
	Operating room	१८.०१ S.MT
	Security cabin, ticket booth	१३.४० S.MT
2.	**First Floor**	
	Lobby/cafe	८४.३५ S.MT
	B.T exhibition hall	३९८.४० S.MT
	Painting sculpture hall	२५७.८७ S.MT
	Library	२०४.५५ S.MT
	Suites	४३.०० S.MT
3.	**Others**	
	Toilet	१२३.५१ S.MT

सदर कला दालनाचे दैनंदिन संचालन, देखभाल व दुरूस्तीसाठी सदर ठिकाणी सुरक्षा रक्षक, हाऊस किपिंग, टेक्नॉलॉजी संबंधित मनुष्यबळ, व्यवस्थापन, टिकीट काऊंटरसाठी कर्मचारी, कार्यालयीन कामासाठी मनुष्यबळ, उद्यानासंबंधित कामासाठी मनुष्यबळ यासह वातानुकूलित यंत्रणा, डि.जी. सेट, सी.सी.टी.व्ही यंत्रणा, उदवाहक,

इमारतीमधील स्थापत्य व विद्युत विषयक दुरुस्त्या करणेसाठी सक्षम यंत्रणा नेमाव्या लागणार असून त्याकरीता मोठ्या प्रमाणावर खर्च अपेक्षित आहे. फक्त दैनंदिन संचलनाकरीता मासिक सुमारे 15.00 लक्ष एवढा खर्च येणार असून दुरुस्त्यासाठी दोष दायित्व कालवधी संपल्यानंतर वेगळा खर्च येणार आहे. तरी सदर कला दालनाच्या जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडील रू.१४,६३,९०९/- प्रति महिना ठरवुन देण्यात आलेले असून सदर भाडे हे "भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण" या गठीत समितीने निश्चित केलेले आहे. सदर कला दालनाचे दैनंदिन संचालन, देखभाल व दुरूस्ती बाबत धोरण ठरविणेसाठी मा.महासभेपुढे गोषवारा देण्यात आलेला होता तथापी धोरण निश्चित करण्यात आलेले नाही. दरम्यानच्या काळात मा.मंत्री महोदय, परिवहन यांनी दि.१५/०६/२०२६ रोजी मा.उपमुख्यमंत्री महोदय तथा मा.नगरविकास मंत्री यांच्याकडे पत्र देऊन सदर कला दालनाची दुरूस्ती देखभाल महानगरपालिकेकडून होत नसल्याने सदर कला दालनाचे व्यवस्थापन सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) अथवा संबंधित क्षेत्रातील सक्षम संस्थेकडे हस्तांतरीत करण्याची विनंती केली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने मा.उपमुख्यमंत्री तथा मा.नगरविकास मंत्री यांच्या निर्देशानुसार नगरविकास विभागाने महानगरपालिकेस स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करण्याची विनंती केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार महानगरपालिकेच्या मालमत्ता विनियोग / हस्तांतरणाचे अधिकार मा.महासभेस आहेत.

वरील वस्तुस्थिती पहाता कला दालनाचे दैनंदिन संचालन, देखभाल दुरूस्ती करणे बाबत धोरण निश्चित होणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

PC-08/2026-27/MG/DK-09

मा. महासभा / ~~स्थायी समिती सभा~~
गोषवारा प्राप्त दि. 22/06/2026 वेळ स. 11:24 वा
ठराव सूचना क्र. 66 वर्ष 2026-27

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती व तंत्रज्ञान विभाग

मा. महासभा दि.१६/१०/2026

// गोषवारा //

प्रकरण क्र. :- १०१

विषय :- **Video Conferencing Setup करणेकामी ई-निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत (E-३१२०५४१)**

भारत सरकारचे तसेच महाराष्ट्र शासनाचे विविध विभाग उदा. जनगणना विभाग, SBM, P.M. गतिशक्ती व इतर विभाग, महाराष्ट्र शासनाचे माझी वसुंधरा, सफाई मित्र, शासनाचे नगरविकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, महिला व बालविकास विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय अशा शासनाच्या विविध विभागांच्या बैठकीसाठी वेळोवेळी Video Conferencing चे आयोजन केले जाते. मा.आयुक्त सो. यांनी Video Conferencing room तयार करणेबाबत विभागप्रमुखांच्या बैठकीत निर्देश दिलेले आहेत. सदर Video Conferencing setup द्वारे शासनाच्या वरील सर्व विभागांशी संभाषण करणे शक्य होणार असून वेळेची मोठी बचत होणार आहे. त्याचप्रमाणे मनपाचे प्रभाग अधिकारी व विभागीय कार्यालये यांना वारंवार बैठकीसाठी न बोलावता Video Conferencing द्वारे बैठक आयोजित करुन संवाद साधणे शक्य होणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात मा. आयुक्त सभागृहात Video Conferencing setup (3 वर्ष Comprehencive AMC सह) करणे कामाची आवश्यकता आहे. सदरकामी अंदाजे रु.4236010/- (अधिक GST) (3 वर्ष Comprehencive AMC सह) खर्च अपेक्षित आहे.

याकामी संगणक खरेदी/संगणक साहित्य या लेखाशिर्षाखाली सन 2026-27 च्या अर्थसंकल्पात 2 कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. मनपा मुख्य कार्यालय, मा. आयुक्त सभागृह येथे Video Conferencing setup (3 वर्ष Comprehencive AMC सह) करणेकामी ई-निविदा मागविणेस मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

मा.आयुक्त सो.यांचे मान्यतेने

(स्वप्निल सावंत)
उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. महासभा दि१६/१२/२०२६
//गोषवारा//

प्रकरण क्र. १०२

विषय :- सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता औषध फवारणी कामगारांचे वेतन व भत्ते यांस कायोत्तर मंजुरी देणेबाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता औषध फवारणी कामगार पुरवठा करणेकामी मा. महासभेने दि.23/06/2021, ठराव क्र.20 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली होती. तसेच मा. आयुक्त यांनी दि.14/11/2022 रोजी फेरनिविदा 3 वर्षाकरीता मागविण्यास मंजुरी दिलेली होती. या अनुषंगाने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून ई-टेंडरद्वारे दि.20/12/2022 रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तसेच मा. प्रशासकीय ठराव क्र.290, दि.08/03/2023 रोजी कमी दराच्या निवदेस मंजुरी देण्यात आली व दि.20/03/2023 रोजी मे. स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. यांना दि.01/04/2023 पासून एकूण 120 औषध फवारणी कामगारांचा पुरवठा करणेकरीता कार्यादेश देण्यात आला. तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक यांची दि.26/07/2024 रोजीच्या मान्यतेनुसार व मा. प्रशासकीय ठराव क्र.102, दि.08/08/2024 रोजीच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेनुसार दि.25/09/2024 पासून 30 औषध फवारणी कामगारांचा पुरवठा करणेस कार्यादेश देण्यात आला होता.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील 24 प्रभागात एकूण 150 औषध फवारणी कामगार स्प्रे-पंप व भाडेतत्त्वावरील मिनी औषध फवारणी टेम्पोद्वारे त्या प्रभागाच्या सुक्ष्मकृती आराखड्यानुसार नियमित औषध फवारणी, वेळोवेळी घरभेटी देऊन डासांची पैदास रोखण्यासाठी पाणीसाठे तपासणी, डासआळ्या आढळल्यास पाणीसाठे रिकामे करणे, ॲबेट्टींग करणे, इत्यादी कामे करतात, याद्वारे स्वच्छ पाण्यात पैदास होणाऱ्या व डेंग्यु आजार पसरवणाऱ्या डासांच्या अळ्यांचा वेळीच नायनाट करणे, शक्य होऊन नागरिकांच्या डेंग्यु, मलेरिया व इतर साथींच्या आजारांपासून बचाव होण्यास मोलाची मदत मिळत आहे.

"एकात्मिक डास निर्मूलन योजना - ठेका कर्मचारी, भाडेतत्त्वावरील मिनी टेंम्पो व औषध खरेदी" या लेखाशीर्षांतर्गत सन 2025-26 या आर्थिक वर्षातील तरतूद माहे नोव्हेंबर-2025 ला संपल्याने पुनर्विनियोजन करणेकरीता दि. 05/12/2025 रोजी प्रस्ताव पाठविण्यात आला होता. परंतु त्यास मंजुरी न मिळाल्याने विभागास तरतूद उपलब्ध झाली नाही. सदर निविदेचा कालावधी 31/03/2026 रोजी पर्यंत होता. विभागाकडे नवीन निविदा मागवणेकरीता तरतुद उपलब्ध नसल्याने नवीन निविदेचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला नव्हता.

त्यामुळे दि. 18/02/2026 रोजी सदर निविदेस मुदत वाढ मिळणेकरीताचा प्रस्ताव विभागामार्फत सादर करण्यात आला होता. त्यास दि. 17/03/2026 रोजी मा. आयुक्त सो यांनी मंजुरी दिली होती. पण सदर प्रस्ताव विभागात दि. 24/03/2026 रोजी प्राप्त झाला होता. मा. विशेष महासभा सूचना दि. 18/03/2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली असल्याने मुदत वाढीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात आला नव्हता. तसेच मा. आयुक्त यांनी मुदतवाढीस मंजुरी दिल्यानंतर मे. श्री स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. यांना कामगारांस पगार न दिलेबाबत, मुद्रांक शुल्क न भरलेबाबत एकूण तीन नोटीस देण्यात आलेल्या होत्या. नोटीसीची मुदत संपून देखील संबंधित ठेकेदाराने उपरोक्त नोटीसीनुसार पुर्तता न केल्याने तसेच, कामगारांना वेतन प्रत्येकवेळी उशीराने अदा करणे, सुरक्षा साहित्य तसेच युनिफॉर्म न देणे, कामामध्ये अनियमितता तसेच, काम समाधानकारक नसल्याने 16 नोटीस अश्या एकूण 19 नोटीस सदर ठेकेदारास देण्यात आल्या होत्या.

मे. स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. यांचे काम समाधानकारक नसल्याने त्यांना देण्यात आलेला 150 औषध फवारणी कामगार पुरवठा करणेच्या कामास मुदतवाढ देणे योग्य नसल्याने व नवीन निविदा काढली नसल्याने नवीन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत ठेका चालवणेसाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक होते त्यामुळे सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेकेदार यांचेकडून आवश्यकतेनुसार ठेका कर्मचारी पुरवठा करण्यात येत होते. त्यापैकी आस्थापना विभागामार्फत मे. ओम साई सिक्युरिटी ॲण्ड फॅसिलिटी मॅनेजमेंट यांचेमार्फत संगणक चालक व उद्यान अधीक्षक यांच्या पुरवठा करण्यात येत आहे. सबब, मे. स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. यांना मुदतवाढ न देता औषध फवारणी कामगार ठेका पद्धतीने पुरवठा करणेकरीता नवीन निविदा काढून कार्यादेश देईपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची "ड" प्रकरण 5(2)(2) अन्वये मे. ओम साई सिक्युरिटी ॲण्ड फॅसिलिटी मॅनेजमेंट यांना दि. 01/04/2026 पासून 150 औषध फवारणी कामगार ठेका पद्धतीने पुरवठा करणेकरीता कार्यादेश देऊन ठेका चालवणेसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून नियुक्ती करणेस मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस्तव गोषवारा ठेवणेसाठीचा प्रस्ताव (E-३०७७३८९) दि. 20/04/2026 रोजी सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि.26/06/2026 रोजी व मा. स्थायी समिती सभेने दि. 03/07/2026 रोजी ठराव क्र. 79 अन्वये मंजुरी दिलेली होती. सदरकामी मा. आयुक्त यांच्या मान्यतेने मे. ओम साई सिक्युरिटी अॅण्ड फॅसिलिटी मॅनेजमेंट यांना जा.क्र.मिभामनपा/1067/2026-27 दि. 31/08/2026 रोजी नुसार कार्यादेश देण्यात आला असून. त्यांनी दि.02/09/2026 रोजी पासून काम सुरु केलेले आहे.

त्यादरम्यान औषध फवारणी कामगार पुरवठा करणेकामी तरतुद उपलब्ध झालेनुसार निविदा मागवणे कामाचा प्रस्तावास मा. प्रस्ताव समितीने दि.03/02/2026 रोजी मान्यता दिलेली होती. त्यानुसार सन 2026-27 या आर्थिक वर्षाची तरतुद प्राप्त झाल्यापासून म्हणजेच, दि. 02/03/2026 पासून नवीन निविदेची प्रक्रिया सुरु करून दि. 22/05/2026 रोजी सचिव विभागात गोषवारा सादर करण्यात आला होता. या दरम्यान महाराष्ट्र विधानपरिषदेच्या निवडणुकीची आचार संहिता लागू झाल्याने व तद्नंतर विशेष महासभा लागल्याने व त्यानंतर झालेल्या मा. महासभा दि. 13/08/2026 रोजीचा ठराव क्र. 55 अन्वये एकात्मिक डास निर्मूलन योजनेकरीता औषध फवारणी कामगार ठेका पद्धतीने पुरवणेकरीता द्विवार्षिक निविदा काढणेस मंजुरी दिली असून दि.27/08/2026 रोजी निविदा जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत पावसाळा सुरु असल्याने डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया व इतर साथीचे आजार पसरून मनुष्यहानी होण्याची शक्यता आहे. सबब सदरची सेवा ही Maharashtra Essential Services Maintenance Act २०२३ नुसार अत्यावश्यक सेवा/ Public Health Service, असल्याने विभागामार्फत औषध फवारणीचे काम चालू ठेवण्यात आलेले होते. त्यामुळे विभागाने आजपर्यंत केलेली कार्यवाही त्या-त्या वेळी असलेल्या परिस्थितीनुसार व नागरिकांचे आरोग्यहित विचारात घेऊन करण्यात आलेली आहे.

तथापि दि. 01/04/2026 ते दि. 31/08/2026 या 5 महिन्यांच्या कालावधीत काम केलेल्या कंत्राटी कामगारांचे वेतन अदा करणे आवश्यक असल्याने या कालावधीतील वेतन कशाप्रकारे अदा करावे याबाबत विभागाने मार्गदर्शनाचा प्रस्ताव सादर केला होता. कामगारांचे वेतन रु.1,32,71,559/- महानगरपालिकेमार्फत कामगारांच्या बँक खात्यावर जमा करण्यास व होणाऱ्या खर्चास मा. महासभेच्या कायोत्तर मान्यतेसाठी सादर करणेस व कामगारांच्या वैधानिक कपाती उदा. EPF, ESIC व इतर भत्तेकरीताची रक्कम रु. 50,63,472/- भरणा याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी EPF सल्लागार/ विधी विभाग यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करणेकरीता मा. आयुक्त यांनी दि. 17/09/2026 रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कामगारांना दि.01/04/2026 ते दि.31/08/2026 पर्यंतचे वेतन महानगरपालिकेतर्फे अदा करण्यात आलेले आहे.

त्यामुळे कामगारांचे अदा करण्यात आलेले वेतन रु.1,32,71,559 यारक्कमेस कायोत्तर मंजुरी व कामगारांच्या. EPF, ESIC व इतर भत्तेकरीता रु.50,63,472/- या रक्कमेच्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस्तव शिफारस आहे.

(कविता बोरकर)
उपायुक्त (सार्व.आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 23/०९/२०२६ वेळ सायं. ०६.००
रजिस्टर नोंद अ. क्र. 602 वर्ष २६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(१)

मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

मा.महासभा दि. १६ / १० २०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र. :-१०३ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलातील धोकादायक/विकास कामातील वृक्ष काढणे/पुर्न:रोपण करणे/झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलातील धोकादायक/विकास कामातील वृक्ष काढणे/पुर्न:रोपण करणे/झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी मा.सभापती-स्थायी समिती, श्री. हसमुख एम. गहलोत यांचे दि.०४/०८/२०२६ रोजी पत्र प्राप्त झालेले असुन 'मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध गृहसंकुलांच्या आवारामध्ये मोठ्या प्रमाणात झाडे असून, सदर झाडांच्या फांद्या वाढल्यामुळे इमारती, वीजवाहिन्या, रस्ते तसेच नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत आहे. काही ठिकाणी झाडांच्या फांद्या धोकादायक पद्धतीने वाढलेल्या असून पावसाळ्यात व जोरदार वाऱ्याच्या वेळी त्या तुटून अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच, गृहसंकुलातील झाडांची वेळोवेळी योग्य पद्धतीने छाटणी न झाल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखून, झाडांची अनावश्यक कत्तल न करता आवश्यक त्या झाडांची व फांद्यांची नियमानुसार छाटणी करण्याची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात यावी. याबाबत गृहसंकुलातील झाडांची पाहणी करून धोकादायक व वाढलेल्या फांद्यांची आवश्यकतेनुसार छाटणी करण्यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करणे, तसेच गृहसंकुलांना याबाबत आवश्यक मार्गदर्शन करून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. याकरीता सदर विषयावर चर्चा विनिमय करून योग्य तो निर्णय घेण्याकरीता व धोरण निश्चित करणे करीता पुढील मा. महासभेच्या विषयपत्रिकेवर विषय घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी, असे पत्रात नमूद केले आहे.

त्यानुसार, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलातील धोकादायक / विकास कामातील वृक्ष तोडणे व वृक्ष पुर्नरोपण करणेकामी वृक्षारोपण करण्याप्रित्यार्थ अनामत रक्कम घेणे, वृक्षारोपणास जागा उपलब्ध नसल्यास त्याप्रित्यार्थ वृक्ष रोपे व वृक्षारोपांचे जतन करण्या प्रित्यार्थ ना परतावा वृक्ष निधी रक्कम जमा करूण घेणे तसेच पाहणी फ़ी, वृक्ष तोडणे, वृक्ष पुर्न:रोपण करणे व वृक्षांची छाटणी करणेकामी धोरण ठरविणे आवश्यक आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलातील धोकादायक/विकास कामातील वृक्ष काढणे/पुर्न:रोपण करणे/झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती करणे आवश्यक आहे.

अ. गृहसंकुलातील / घरांच्या परिसरातील झाडे तोडणे / पुर्नरोपण / छाटणी करणे.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>तपशिल</th><th>करावयाची कारवाई</th></tr>
<tr><td rowspan="2">१.</td><td rowspan="2">वृक्ष तोडणे</td><td>१) १ झाड तोडण्याच्या बदल्यात अंदाजित केलेल्या वया प्रमाणे भारतीय प्रजातीची ६ फुट उंचीच्या रोपांची लागवड करण्यात यावी.</td></tr>
<tr><td>२) मात्र वृक्षरोपणासाठी जागा नसेल तर वृक्ष प्राधिकरणाकडे वृक्ष रोपे लावणे व वृक्षरोपांचे जतन करण्या प्रित्यर्थ नापरतावा वृक्षनिधी रक्कम रु.१,५००/-प्रति वृक्ष प्रमाणे जमा करुन घेणे.</td></tr>
<tr><td rowspan="3">२.</td><td rowspan="3">वृक्ष पुन:रोपण</td><td>१) १ झाड पुर्न:रोपण करण्याच्या बदल्यात ०१ नग भारतीय प्रजातीचे ६ फुट उंचीच्या रोपांची लागवड करण्यात यावी.</td></tr>
<tr><td>२) नव्याने १ वृक्ष पुर्न:रोपण करण्याप्रित्यार्थ रु.५,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे. पुर्नरोपणाच्या दिनांकापासून तीन वर्षापर्यंत नित्यनियमाने दर सहा महिन्यानी वृक्ष स्थिती (Tree Status) अहवाल महानगरपालिकेस सादर करणे. तदनंतर वृक्ष सुस्थितीत असल्याची खातरजमा केल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>३) १ वृक्ष पुर्न:रोपण करण्यासाठी सोयायटी / अर्जदाराकडे पुर्न:रोपण करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यास व महानगरपालिका जागा उपलब्ध करुन देत असल्यास रु.५,०००/- सुरक्षा अनामत ऐवजी रु.५,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे वृक्षनिधी जमा करणे व महानगरपालिकेकडुन झाड पुर्न:रोपण करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>३.</td><td>वृक्षाची छाटणी करणे व उचलणे.</td><td>परवानगी देण्यात आलेल्या खाजगी जागेतील वृक्षाची छाटणी करणे व छाटणी उचलुन मनपा वाहनाद्वारे घोडबंदर प्रकल्प येथे टाकणेकामी प्रती वृक्ष प्रमाणे रु.१,०००/- वृक्ष निधी जमा करुन घेणे.</td></tr>
<tr><td>४.</td><td>वृक्षांची छाटणी (फांद्या) उचलणे.</td><td>परवानगी देण्यात आलेल्या खाजगी जागेतील झाडांची छाटणी सोसायटी/नागरिक यांनी केलेली छाटणी उचलणेकामी प्रती वृक्ष याप्रमाणे रु. ५००/- जमा करुन घेणे.</td></tr>
<tr><td>५.</td><td>धोकादायक झाडे मुळासहित काढणे.</td><td>महानगरपालिकेची झाडे काढणेकामी परवानगी सोसायटीधारकांनी प्राप्त करुन घेतल्यानंतर मनपा कर्मचारी यांच्या मार्फत धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी नागरीक / को.ऑ.हौ.सो.लि. सोसायटी यांची विनंती असेल तर प्रती वृक्ष खालील प्रमाणे जमा करुन घेणे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>झाडांचा तपशिल</th><th>परीमाण</th><th>दर</th></tr>
<tr><td>१</td><td>उंची (Height) - २० फुटापर्यंत
बुंध्याची जाडी (Girth) - १ फुटापर्यंत</td><td>प्रती झाड</td><td>रु.२,४००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>उंची (Height) - २० ते ३५ फुटापर्यंत
बुंध्याची जाडी (Girth) - १ ते २.५० फुट</td><td>प्रती झाड</td><td>रु.५,४००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>उंची (Height) - ३५ ते ५० फुट किंवा त्यापेक्षा जास्त
बुंध्याची जाडी (Girth) - २.५० फुटापेक्षा जास्त</td><td>प्रती झाड</td><td>रु.११,२००/-</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

ब. विकासकामातील झाडे तोडणे/ पुर्नरोपण करणे.

अ.क्र.	तपशिल	करावयाची कारवाई
१.	वृक्ष तोडणे	१) १ झाड तोडण्याच्या बदल्यात अंदाजित केलेल्या वया प्रमाणे भारतीय प्रजातीची ६ फुट उंचीच्या रोपांची लागवड करण्यात यावी.
		२) नव्याने १ वृक्ष रोपण करण्याप्रित्यर्थ रु.१०,०००/- प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे.
		३) मात्र वृक्षरोपणासाठी जागा नसेल तर वृक्ष प्राधिकरणाकडे वृक्ष रोपे लावणे व वृक्षरोपांचे जतन करण्या प्रित्यर्थ नापरतावा वृक्षनिधी रक्कम रु.२५,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे जमा करुन घेणे.
२.	वृक्ष पुनःरोपण	१) १ झाड पुर्न:रोपण करण्याच्या बदल्यात ०१ नग भारतीय प्रजातीचे ६ फुट ते ८ फुट उंचीच्या रोपांची लागवड करण्यात यावी.
		२) नव्याने १ वृक्ष पुर्न:रोपण करण्याप्रित्यार्थ रु.१०,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे. पुर्नरोपणाच्या दिनांकापासून तीन वर्षापर्यंत नित्यनियमाने दर सहा महिन्यानी वृक्ष स्थिती (Tree Status) अहवाल महानगरपालिकेस सादर करणे. तदनंतर वृक्ष सुस्थितीत असल्याची खातरजमा केल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात येईल.
		३) विकास जागेवर नव्याने वृक्षरोपण करण्यास जागा उपलब्ध नसल्याने त्याप्रित्यर्थ रु.२५,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे वृक्षनिधी जमा करणे.

क. पाहणी फी

अ.क्र.	तपशिल	करावयाची कार्यवाही
१	वृक्ष तोडणे	वृक्ष तोडणे / वृक्ष पुर्न:रोपण / वृक्ष छाटणी करणेकामी पाहणी फी प्रती झाड रु.३००/- या प्रमाणे जमा करुन घेणे.
२	वृक्ष पुर्न:रोपण	
३	वृक्ष छाटणी	

उपरोक्त प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलातील धोकादायक / विकास कामातील वृक्ष काढणे/पुर्न:रोपण करणे/झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती करणेकामी मा.महासभेची मान्यता मिळणेकामी नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करणेकामी मा.आयुक्त यांनी दि.२४/०९/२०२६ रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलातील धोकादायक/विकास कामातील वृक्ष काढणे/पुर्न:रोपण करणे/झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती करणेकामी धोरणात्मक निर्णयास्तव सादर.

(कविता बोरकर)
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १६/१०/2026

// गोषवारा //

प्रकरण क्र. (१०४) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या सहा गावांची प्रारुप सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 30 अन्वये शासनास सादर करणेकामी मुदतवाढ मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावासह बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गोराई व मनोरी या 02 गावासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन शासनाने क्र.टिपीबी-4307/108/प्र.क्र.29/07/नवि-11 दि.01/12/2007 च्या अधिसुचनेव्दारे नियुक्ती केली होती. उक्त अधिसुचित एकत्रित क्षेत्राची (गोराई-मनोरी-उत्तन अधिसुचित क्षेत्र) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी तयार केलेली विकास योजना शासनाने उक्त विकास योजना कलम 31(1) अन्वये अनुक्रमे दि.13/05/2013 व दि.03/06/2016 च्या अधिसुचनेव्दारे मंजुर केलेली आहे.

उक्त अधिसुचित क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट होते. तथापि, शासानाने गोराई-मनोरी-उत्तन या अधिसुचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणुन असलेली नियुक्ती क्र.टिपीबी-4316/प्र.क्र.257/2016/नवि-11 दि.16/03/2017 रोजीच्या अधिसूचनेद्वारे रद्द करुन सदर मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची "नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 अन्वये, 20 वर्षातुन किमान एकदा विकास योजना सुधारीत करणे आवश्यक असल्याने शासनाने दि.02/02/2012 रोजीच्या शासन निर्णयाव्दारे दिलेले निर्देश तसेच शासनाने शासन निर्णय क्र.टिपीएस-1818/1489/प्र.क्र.303/18/नवि-13 दि.25/01/2019 व त्यानंतरचे दि.17/06/2019 रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या विकास योजना, भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) संगणक प्रणालीचा वापर करुन (GIS Platform वर) तयार करणेकामी कलम 154(1) अन्वये सर्व नियोजन प्राधिकरणांना निर्देश दिले होते.

त्यानुसार महानगरपालिकेने सदर गावांची विकास योजना तयार करणेकामी M/s. Techcomm Urban Management Consultant & Service Providers, Thane या संस्थेची निवडपत्र क्र. कामाचा कार्यादेश क्र.मनपा/नर/1855/2023-24 दि.11/09/2023 अन्वये नियुक्ती करुन त्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे व इतर आवश्यक

कार्यवाही करणेस मा. आयुक्त सो., यांना प्राधिकृत करुन मा. महासभेने प्रशासकीय ठराव क्र.134 दि.05/07/2023 नुसार मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गांवांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम अधिनियम 1966 चे कलम 38 सह कलम 23(1) अन्वये विकास योजना सुधारीत करणेबाबतचा इरादा सर्वसाधारण सभा (प्रशासकीय ठराव) क्र.460 दि.23/01/2024 पारीत करुन त्याबाबतची सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.13/03/2024 रोजी प्रसिध्द करुन तदनंतर सदर विकास योजनेसाठी मा. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्या पूर्व मान्यतेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये दि.25/04/2024 रोजीच्या आदेशान्वये सहायक संचालक, नगररचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक केली आहे

नगर रचना अधिकारी यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील उक्त 6 गावांचे सर्वेक्षण करून, अस्तित्वातील जमीन वापर नकाशा (ELU) तयार करुन तो पत्र क्र.मिभा/मनपा/नर/2398/2024-25 दि.07/10/2024 अन्वये अहवालासह मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे हस्तांतरीत केलेला आहे.

सदरच्या क्षेत्राची (6 गावांची) प्रारुप प्रसिद्ध विकास योजना ही महानगरपालिकेने ठराव क्र.237 दि.23/09/2025 अन्वये दि.24/09/2025 रोजी शासन राजपत्रात नागरीकांच्या सुचना / हरकतीसाठी उक्त अधिनियमाद्वारे कलम - 26 अन्वये प्रसिद्ध् केली असून महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डवर दि. 25/09/2025 रोजी प्रसिद्ध केली आहे. सदर प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेवर प्राप्त सुचना / हरकतदारांना सुनावणी ही नियुक्त नियोजन समितीमार्फत देणे आवश्यक असून दरम्यानच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक कालावधी दि. 15/12/2025 ते 17/01/2026 हा होता.

उपरोक्त महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक व तदनंतर नियुक्त करावयाच्या नियोजन समितीमध्ये स्थायी समितीचे तिन सदस्य व तज्ञ 4 सदस्य यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेने उक्त अधिनियमाचे कलम 28(2) अन्वये मा. संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे मान्यता मिळणेकामी दि.14/05/2026 रोजी प्रस्ताव सादर केला होता.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.08/06/2026 व दि.15/06/2026 च्या आदेशान्वये चार तज्ञ व्यक्तींची उक्त अधिनियमाचे कलम 28(2) अन्वये समितीमधील सदस्याकरीता मान्यता दिली आहे.

दरम्यानच्या कालावधीमध्ये (दि.18/05/2026 ते दि.05/06/2026) कोकण विभागीय पदवीधर मतदार संघाची निवडणूक आचारसंहिता तसेच विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) च्या अनुषंगाने सुनावणी घेता आली नाही.

उक्त अधिनियमाचे कलम 30 अन्वये प्रारुप विकास योजना ही उक्त अधिनियमाचे कलम 26 अन्वयेच्या प्रसिद्धीकरणापासूनच्या दिनांकापासून आचारसंहितेचा कालावधी वगळून 12

महिन्यांमध्ये किंवा तदनंतर 6 महिन्यांचे मुदतवाढीमध्ये प्रारुप विकास योजना सुनावणीअंती शासनास सादर करणे आवश्यक असून 12 महिन्यांची मुदत विचारात घेता ती दि.16/11/2025 पर्यंत असून, नगररचना अधिकारी यांचेसह विभागामधील अधिकारी व कर्मचारी यांना SIR संबंधित कामकाजासाठी नियुक्ती असल्याने व त्यांचे देखील सुनावणी घेणे आवश्यक असल्याने सदर कालावधीमध्ये सुनावणीअंती शासनास विकास योजना सादर करणे शक्य नसल्याने उक्त अधिनियमाचे कलम 30(1) अन्वये 10 लक्ष लोकसंख्येपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या महानगरपालिका क्षेत्रासाठी 6 महिन्यांची मुदत अनुज्ञेय असल्याने सदर 12 महिने व त्यापासून पुढे 6 महिने या प्रमाणे एकत्रित मुदत ही दि.15/05/2027 पर्यंत असून सदर मुदतवाढ देणेचे अधिकार हे मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासनाने प्रत्यायोजित केले असल्याने 6 महिन्यांची मुदतवाढ मिळणेकामी प्रस्ताव मा. संचालक, नगररचना, पुणे यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सबब सदर मुदतवाढीच्या प्रस्तावास मा. महासभेची मान्यता मिळणेस गोषवारा सादर करण्यात येत आहे.

(मा.आयुक्त सो.यांच्या मान्यतेने.)

(पु. म. शिंदे)
सहायक संचालक, नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. १६/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक (१०५) मौजे घोडबंदर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळया जवळील ६० मीटर रुंद रस्त्यालगत (६० मीटर व १८ मीटर रुंद रस्ता जंक्शन वेस्टर्न हॉटेल शेजारील वळणावरील) सर्व्हे क्र. १३२/१३ ही खाजगी जागा भुसंपादनाद्वारे ताब्यात घेणेसाठी वाढीव रकमेसह खर्चास सुधारीत मान्यता देणे.

मौजे घोडबंदर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळया जवळील ६० मीटर रुंद रस्त्यालगत (६० मीटर व १८ मीटर रुंद रस्ता जंक्शन वेस्टर्न हॉटेल शेजारील वळणावरील) सर्व्हे क्र. १३२/१३ मधील ३४० क्षेत्राची जागा बाधित होत असून जागा मालकाने विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात सदर जागा हस्तांतर करण्यास नकार दिल्याने तसेच सदर जागा ही रस्ता रुंदीकरणासाठी अति आवश्यक असल्याने मा. प्रशासकिय ठराव क्र. ४४ दि.२१/०४/२०२५ अन्वये भुसंपादनाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर जागेच्या भुसंपादनासाठी उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी कळविल्यानूसार रु.१,९९,६६,१६०/- रकमेपैकी ३०% रक्कम रु.५९,८९,८४८/- चा भरणा करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत मा. उपविभागीय अधिकारी ठाणे यांनी सदर जागेकरीता एकूण रु.२,३७,६६,२४१/- एवढी रक्कम होत असल्याने सदर रकमेपैकी जमा केलेली रु.५९,८९,८४८/- रक्कम वगळता उर्वरीत ७०% रक्कम तात्काळ जमा करणेबाबत कळविलेले आहे. मा. प्रशासकिय ठराव क्र. ४४ दि.२१/०४/२०२५ अन्वये रु.१,९९,६६,१६०/- रकमेस प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्राप्त असून सदर रकमेत रु.३८,००,०८१/- एवढी वाढ झालेली आहे. तरी सदर वाढीव रकमेसह रु.२,३७,६६,२४१/- एवढया रकमेच्या खर्चास सुधारीत प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणेस व सदर उर्वरीत रक्कम रु.१,७७,७६,३९३/- भूसंपादनासाठी जमा करणेस मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मा.महासभा दि. १६/१०/2026

(गोषवारा)

प्रकरण क्र.१०६:- अग्निशमन विभागासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी 100 अग्निशामक ठेका पद्धतीने पुरवठा करणेकरीता जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत.

ब) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी 50 मजूर ठेका पद्धतीने पुरवठा करणेकरीता फेर जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करणेबाबत

अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी ठेका पध्दतीने 100 अग्निशामक पुरवठा करणेकरीता दि.19/01/2024 अन्वये फेर जाहीर निविदा सुचना ई-टेंडरींग संकेतस्थळावर व जाहीर वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने M/s Secure 1 Security Service यांचे दर L1 दर असल्याने मा.प्रशासकीय सभा दि.12/03/2024, ठराव क्र.452 अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून, दि.14/03/2024 अन्वये 01 वर्षाकरीता 100 अग्निशामक पुरवठा करणेकरीता कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरची मुदत दि.13/03/2025 रोजी संपुष्टात आलेली आहे. तसेच सदर कामासाठी मा.प्रशासकीय दि.08/04/2025 ठराव क्र.22 अन्वये नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा महानगरपालिकेमार्फत अग्निशामक या पदाकरीता भरती प्रक्रिया सुरु असल्याने भरती प्रक्रियेद्वारे कर्मचारी उपलब्ध होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत M/s Secure 1 Security Service यांना मुदतवाढ कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार अग्निशमन विभागात 100 अग्निशामक कामकाजकरीत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी ठेका पध्दतीने 100 अग्निशामक पुरवठा करणेकरीता 01 वर्षाकरीता जाहीर निविदा सूचना संकेतस्थळावर व जाहीर वृत्तपत्रात प्रसिध्द करणेस व त्याकामी किमान वेतन कायदयानुसार प्रति ठेका कर्मचारी रु.27,436/- इतके आहे. त्यानुसार 100 अग्निशामक (ठेका) पुरवठा करणेकरीता मासिक खर्च रु.27,43,600/- व वार्षिक खर्च रु.3,29,23,200/- (अक्षरी रु. तीन कोटी एकोणतीस लाख तेवीस हजार दोनशे मात्र) इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन 2026-27 या अंदाजपत्रकामधील रु.11 कोटी तरतुद अग्निशमन अस्थायी आस्थापना सुरक्षा रक्षक या लेखाशिर्षकात करण्यात आलेली आहे.

सबब अग्निशमन विभागाने केलेल्या मागणीनुसार व शिफारशीनुसार त्यांना आवश्यक असलेल्या 100 अग्निशामक ठेका पध्दतीने घेणेकरीता व या कामाकरीता 01 वर्षाकरीता रु.3,29,23,200/- (अक्षरी रु. तीन कोटी एकोणतीस लाख तेवीस हजार दोनशे मात्र) इतक्या रक्कमेस मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस व निविदा प्रक्रिया करणेस मंजूरीकरीता सादर.

ब) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात ठेका पध्दतीने 150 मदतनीस (मजुर) पुरवठा करण्याकामी मा.प्रशासकीय सभा दि.02/11/2023 ठराव क्र.247 अन्वये मे.सर्वस्व एन्टरप्रेनर्स या

कंपनीला दि.28/06/2022 रोजी व दि.18/08/2022 रोजी 01 वर्षाकरीता ठेका देण्यात आलेला होता. दि.30/06/2023 रोजी मुदत संपुष्टात आल्याने मा.प्रशासकीय सभा दि.02/11/2023 ठराव क्र.247 अन्वये निविदा प्रक्रियेची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मे.सर्वस्व एन्टरप्रेनर्स यांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

त्यानुसार अग्निशमन विभागात 50 मजूर कामकाजकरीत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी मजूर यांचा प्रती कर्मचारी मासिक किमान वेतन रु.25,721/- इतके असून 50 मजूर यांचे मासिक वेतनावरील खर्च रु.12,86,050/- मात्र इतका आहे तसेच 01 वर्षाकरीता रु.1,54,32,600/- असून 02 वर्षाकरीता रु.3,08,65,200/- (अक्षरी रु. तीन कोटी आठ लाख पासष्ट हजार दोनशे मात्र) अंदाजित इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब अग्निशमन विभागाने केलेल्या मागणीनुसार व शिफारशीनुसार त्यांना आवश्यक असलेल्या 50 मजूर ठेका पध्दतीने घेणेकरीता व या कामाकरीता 02 वर्षाकरीता रु.3,08,65,200/- (अक्षरी रु. तीन कोटी आठ लाख पासष्ट हजार दोनशे मात्र) इतक्या रक्कमेस मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस व निविदा प्रक्रिया करणेस मंजूरीकरीता सादर.

त्यानुसार अग्निशमन विभागासाठी मनष्यबळ पुरवठा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत उपरोक्त अ) व ब) करीता मंजूरी मिळणेबाबतचा गोषवारा मा.महासभेपुढे ठेवणेस शिफारस आहे.

(प्रणाली घोंगे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 98/90/२०२६ वेळ ४१५.०४.४०
रजिस्टर नोंद अ. क्र. ८८० वर्ष २६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक.(१०९) मिरा भाईंदर शहरातील पशु-पक्षी व प्राण्यांना होणारे आजार तसेच त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांचा विचार करुन पशुवैदयकीय रुग्ण्यालय (हॉस्पिटल) उभारण्याबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना 16 एप्रिल 2026 रोजी मंजूर झालेली असून सदर विकास योजनेत आरक्षण क्र.308 (ईपी-12) पशुवैदयकीय रूग्णालय व प्राण्यांची दफनभूमी करीता दर्शविण्यात आली आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र हे 2083.00 चौ.मीटर असून सदर जागा राज्य / केंद्रशासनाची आहे. सदर जागेवर जिल्हा परिषदेचे पशु उपचार केंद्र आहे.

सदर आरक्षणाची जागा ताब्यात घेणे, तसेच पर्यावरण विभागाच्या दृष्टीने आवश्यक परवानग्या घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. सदर माहीती मा. महासभेपुढे पुढील निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

PC-6/2026-27/DK/MG-05

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १६/१०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र. ११० :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ३० अन्वये स्थापन केलेल्या विशेष समितींना निधी व अधिकार देण्याबाबत निर्णय घेणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून [महिला व बालकल्याण समितीसह] विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत अशी तरतूद आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम ३०(२) अन्वये महानगरपालिकेस, तिच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यापैंकी कमीत कमी दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देऊन पारित केलेल्या विशिष्ट ठरावाद्वारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल. तसेच आपले अधिकार व कर्तव्ये यापैंकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील अशी तरतूद आहे.

तद्अनुषंगाने मा. महासभा दि. ०६/०५/२०२६, ठराव क्र. ०७ अन्वये विशेष समित्या गठित करुन कामकाजाचे क्षेत्र व अधिकार प्रदान करण्यात आलेले असून, विशेष समित्यांनी केलेले कामकाज, ठराव, शिफारशी इत्यादी सर्व बाबी प्रथमतः मा. स्थायी समिती / मा. महासभेपुढे शिफारस करणेस मान्यता दिलेली आहे.

मा. महासभा ठराव क्र. ७, दि. ०६/०५/२०२६ अन्वये गठित केलेल्या विशेष समित्या पुढीलप्रमाणे :-

१) पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती

२) शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती

३) आरोग्य व वैदयकिय आरोग्य, पर्यावरण, उदयान व शहर सुशोभिकरण समिती

४) समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार समिती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम ३०(६) अन्वये, प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन असेल;

परंतु पोट-कलम (२) अन्वये आपले अधिकार व कर्तव्ये यांपैकी कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये विशेष समित्यांकडे सोपवताना महानगरपालिकेने अशा समितीचा निर्णय अंतिम असेल असा निदेश दिला असेल तर, अशा समितीच्या कामकाजापैकी असे अधिकार व कर्तव्ये या संबंधीचे कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन राहणार नाही. मात्र, अशा निर्णयास अशा समितीच्या एकूण सदस्यांपैकी निदान दोन तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दिलेला असला पाहिजे अशी तरतूद आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम ३०(६) अन्वये विशेष समितींना अधिकार व कर्तव्ये प्रत्यायोजित करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

(मा. आयुक्त यांचे मान्यतेने.)

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका